मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी

युगवाणी / मे-जुलै १९८२



युगवाणी [Yugwani] Regd No. NGP 207

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ
पुरस्कृत : विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक शरद कोलारकर
कार्यकारी संपादक : प्रकाश देशपांडे

यु ग वा णी

संपादक मंडळ सु. श्री. पांढरीपांडे, म. रा. जोशी, वृंदावन देशमुख, रूपा कुळकर्णी, शंकर बडे, श्रीपाद मुंजे

वर्ष ३८ अंक २६–२८ □ मे–जुलै १९८२ □ ग्रीष्म–वर्षा □ ज्येष्ठ–श्रावण □
शके १९०४ □ मूल्य तीन रुपये □

लेख

कविता

नोंदी

पुस्तकें

प्रकाशक : अ. ल. लिमये, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर–१२
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर–१२

अनुक्रमणिका

साभार पोच

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह १ ला । लेखसंग्रह । मूल्य १५०–०० । पृ. ६०० । श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे ३०.

काळोखाचे थेंब । कथा । प्र. ना. परांजपे । मूल्य १८–०० । पृ. १११ । सुपर्ण प्रकाशन, पुणे ३०.

निळ्या पहाडाच्या कविता । काव्यसंग्रह । बापूराव जगताप । मूल्य १५–०० । पृ. ५५ । कला प्रकाशन, औरंगाबाद.

अस्तोदय । कविता । संपा. वि. शा. काळे । मूल्य ५–०० । पृ. ५९ । काळे ब्रदर्स पब्लिकेशन 'शामसदन' ६० सोमवार पेठ, पुणे ४११०११.

अंधारघर । कविता । बि. मा. सुरंगे । मूल्य १०–०० । पृ. ३६ । रणजित प्रकाशन १७२३/७ बस रोड, राजारामपुरी, कोल्हापूर.

निळे पाणी । समीक्षा । रा. ग. जाधव । मूल्य १२–०० । पृ. ९४ । अभिजात प्रकाशन 'छायाचित्रकार' नागाळा पार्क, कोल्हापूर ४१६००१.

पापणीकाठचे ढग । उल्हास गायधनी । कविता । मूल्य ८–०० । पृ. ५३ । सौ. उषा गायधनी, ए. ३०७, एच. ए. कॉलनी, पिंपरी, पुणे ४११०१८.

तृणपर्णे । रूपांतरित कविता । अनु. सदानंद रेगे । मूल्य १२–०० । पृ. १८१ । साहित्य अकादमी, रवींद्र भवन, ३५ फिरोजशहा मार्ग, नवी दिल्ली ११०००१.

पाऊलखुणा । कविता । जयंत परांजपे । मूल्य ८–०० । पृ. ६८ । पद्मश्री प्रकाशन, हनुमाननगर, नागपूर.

समर्थांचे सम्यकदर्शन । सं. वा. । श्री. ल. पांढरीपांडे । मूल्य २०–०० । पृ. २६९ । अमेय प्रकाशन, रुईकर मार्ग, नागपूर ४४०००२.

त्रिदल । गौरव ग्रंथ । संपा. प्रा. एम. ए. शेख । मूल्य ४५–०० । एम. व्ही. फडके आणि कंपनी, महाद्वार रोड, कोल्हापूर–४१६००२.

मनाचे डोह । कविता । गोविंद कुळकर्णी । मूल्य १६–०० । पृ. ५२ । स्वयंप्रभा प्रकाशन 'चाफा' ५ वा रस्ता सिडको, नांदेड ४३१६०३.

विद्रोह । कविता । उत्तम बावस्कर । मूल्य ८–०० । पृ. ४८ । सौ. चंद्रकला बावस्कर, हुतात्मा जगन्नाथ कॉलनी, वैजापूर ४२३७०१.

अवस्था । कविता । श्रीपाद गंगाधर कावळे । मूल्य १५–०० । पृ. ८० । वसुधा प्रकाशन, जोशीवाडी, सितावर्डी नागपूर–४४००१२.

श्रीजय चक्रधरा । कादंबरी । पुरुषोत्तम नागपुरे । मूल्य १५–०० । पृ. १७७ । स्मृती प्रतिष्ठान, श्रीकृष्ण मंदीर, भुसावळ.

हेल्पाटा । कविता । माधव डहाळे । मूल्य ५–०० । पृ. ४० । शब्दांगार प्रकाशन 'प्रतिमा' शहाणे निवास, हिंगोली, जि. परभणी.

तिसरा रस्ता । कविता । सुधाकर देशपांडे । मूल्य ७–०० । पृ. ५६ । जागर प्रकाशन १४/११२ उन्मतनगर नं. ४ गोरेगाव, मुंबई ४०००६२.

बाहुले । कथासंग्रह । सुधाकर देशपांडे । मूल्य १५–०० । पृ. १०८ । जागर प्रकाशन १४/११२ उन्मतनगर नं. ४ गोरेगाव, मुंबई ४०००६२.

दीपमाळ । समीक्षा । डॉ. उषा देशमुख । मूल्य २०–०० । पृ. ११२ । ज्ञानेश प्रकाशन ६, नव निर्माण, प्रताप-नगर, नागपूर–४४००२२.

(मलपृष्ठ ३ वर)

कवी–अनिल

तारा सावंगीकर

६–७ नोव्हेंबर १९७६. मुक्काम वणी. नानासाहेब शेवाळकरांच्या अथक परिश्रमातून ज्या मातीत नवे चैतन्य, नवा उत्साह, नव्या कल्पना सतत रुजत असतात, अंकुरत–फुलारत असतात असं श्रीमंत मनाचं वणी गाव. चांदणी रात्र. वैदर्भीय लेखिकांचे संमेलन टिळक महाविद्यालयाच्या परिसरात कुसुमावती देशपांडे नगरात भरलेले. दोन दिवस भरगच्च कार्यक्रम. स्वागतापासून बिदागीपर्यंत कशाचीही उणीव न भासलेली वणी जशी लक्षात आहे तशी ७ नोव्हेंबरची अनिलांच्या सहवासात काव्य–शास्त्र–विनोदात घालविलेली रात्रही !

संमेलनातील औपचारिक काव्यसंमेलन आटोपलेले. पण अनिलांच्या सभोवताल पुन्हा ३०–४० नवोदित–सरावलेले कवि–कवयित्री, लेखिका, रसिक–श्रोते, कॉलेज युवती गोलाकार बसलेली. हे अनौपचारिक संमेलन होते. वाङ्मयाची आवड असणारी म्हणून एक आस्वादक या नात्यानं मीही सामील होते.

काव्यगायनात रंगलेली रात्रं. आप्पा मनमोकळेपणानी सर्वांच्या कविता ऐकत होते, दाद देत होते, क्वचित सुधारणा-बदल सुचवीत होते, कधी न समजलेल्या ओळी पुन्हा म्हणायला लावत होते, कधी आपल्या तारुण्यातील तरलसंवेदनक्षणांची पुनर्जागृती करीत मधूनच भाष्य व विवरण करीत कविता कशी फुलते, ती कशी सर्वांगानी उपभोगावी हे सांगत होते. सदैव उत्साही, बोलके. जिज्ञासूंना–अभ्यासकांना कुठलीही गोष्ट डोळसपणानं कशी पचवायची ह्याचे धडे पण त्यातून मिळत होते. त्यांच्या ह्या निकटच्या सहवासात काही सैलावलेले क्षण मीही घालविले. काव्याची अभ्यासक या नात्याने काही शंका मनात घोळत होत्या. त्या विचारल्या. त्यांनी सांगितल्या. पण नागपूरला तूं घरी ये आपण यावर अधिक बोलू असे आश्वासन दिले. आप्पा आठवणींचे पत्रके. दहाबारा दिवसांनी कार्ड आले.

कधी रचनाबंधाबाबत, कधी कालिदास–मेघदूताच्या संदर्भात, कधी कवितांच्या वाचनशैलीबाबत कधी आपल्याच कवितांच्या जन्मसंदर्भापासूनचे त्यावरील संविस्तर भाष्य कधी आजच्या काव्यसृष्टी–दृष्टीबाबतची त्यांची व्यथा याबाबत आम्ही बोललो; चर्चा केली. प्रस्तुत लेख म्हणजे अशाच जिवंत क्षणाचं पुनर्स्मरण व तेवढीच त्याची मर्यादा.

अनिलांची रूपं

अनिल म्हणजे नागपूर नगरीचं भूषण. भावकवी; मानवतावादी कवी, स्फुट–दीर्घ कविता लिहिणारे कवी, मुक्तछंदाचे प्रवर्तक–गझल–दशपदी लिहिणारे; कवी अशा स्वरुपात ते समीक्षकांपुढे–रसिकांपुढे असता 'तुम्ही एक प्रयोगशील कवी आहात' असं केलेलं विधान मात्र त्यांना खटकायचं. खटकायचं या अर्थानी की काव्यनिर्मितीच्या व्यापाराशी हे विधान सर्वस्वी विसंगत आहे म्हणून. कविता हे एक साधन हाती धरून आपण तिचा खेळ करीत आहो–हा गर्भितार्थ ते मानायचे आणि तोच त्यांना बोचक वाटायचा. आशय कवीच्या अंतर्मनातून येतो. तिथं तो अनेक जाणीवांनी, संवेदनांच्या साठवणींनी समृद्ध झालेला असतो. कवितांचं मोठेपण त्यांच्या संख्येवरून नव्हे तर त्यांच्यातून प्रकटणाऱ्या प्रामाणिक आविष्कारावरून; सतत विकासशील सुजाण अशा कलात्म जाणीवेच्या वृत्तीतून ठरवायचे असते असं ते अभिनिवेशानी म्हणायचे.

मी थोड्याच कविता लिहिल्या तर कुठे काय थोडे झाले
इतक्या लिहिल्या गेल्या हातून हे काय थोडे झाले ?

असं म्हणणारे अनिल 'एका पिढीचे आत्मकथन' यात म्हणतात– 'माझी वाट वळणाची आहे आणि नागमोडीची आहे. माझी प्रत्येक कविता एक मुक्काम–एक वळण आहे, आणि ते माझ्या अनूभूतीनेच घेतलेले आहे.' (पृ–९४)

प्रेमभावनेचा विकास

अनिलांची प्रेमकविता वाचताना प्रेम ही भावना हृदयाची अस्सल तळमळ म्हणून येणारी भावना आहे. त्यात कृत्रिमता वा अन्य बौद्धिक कारागिरी नाही. मीलनापूर्वीची उत्सुकता, प्रेमाचा साक्षात्कार,तळमळ–ओढ त्यातील अडचणी, विरह नंतर मीलन ! त्यातून मिळणारा आनंद, साफल्यपूर्तीचे समाधान ह्या सर्व भावच्छटा त्यात आहेत. विशेष म्हणजे हे प्रेम शारीरिक आसक्तीतून निर्माण होणारे नाही तर–

प्रेमाचा हेतू प्रेम करणे । प्रेमी बनणे
व्यक्तीप्रेमात विश्वप्रेमाची जाणीव घेते

अशा वृत्तीतून तत्त्वज्ञानाची भूमिका प्रस्थापित करणारे. मूर्ततेतून अमूर्ताकडे जाणारे. जीवनावर उत्कट प्रेम करणाऱ्यालाच या स्वानुभूतीच्या प्रेमातून अवतीभवतीच्या समाजातील माणसांबद्दलही प्रेम वाटू लागते.

प्रीती तुझी मांझी । नाही निराळेपणाची
जगातल्या सुखदु:खी । मिळालेपणाची

अशा आत्मनिष्ठ अनुभूतीतून, आपली उत्कटता समाजजीवनातील माणसांशीही प्रस्थापित करीत जातात. 'प्रेम आणि जीवन' या दीर्घ कवितेत प्रेमाची व्यापकता, जीवनातील सर्वसमावेशकता प्रेमाच्या व्यापक पायावर उभी आहे हे–

जगणे आहे धर्म सर्वांचा
प्रेमी जनांचे ते कर्तव्य आहे
कारण प्रेमाने पुढे न्हायची
प्रगति, जगाची, संस्कृतीची
मानवजातीची जगतातल्या
पटवून देते प्रेम समता
पूर्णपणाकडे जग नेण्याची
प्रेमच एकच चिच्छक्ती आहे
प्रेमातच आहे कलेचे बीज.

या शब्दातून प्रतिपादतात. यातूनच 'प्रेम' भावनेचा विकास-विस्तार 'मानवता' 'एका निर्वासित चिनी मुलास' यात झालेला दिसतो. त्यांच्या प्रेमाच्या या आंतरिक विकासाला तत्कालीन म्हणजे १९३० च्या युगधर्माच्या विशेषांनी गती मिळाली; परिमाण मिळाले समाजातील नव्या समस्या, नवे संघर्ष, दैन्य, दु:ख, विषमता, युद्ध, साम्राज्यवादी राष्ट्राच्या आसुरी महत्वाकांक्षा–या मानवनिर्मित घटनांकडे ते अंतर्मुख होऊन पहातांना 'मानवता'त–

अन्याय घडो कोठेही । चिडून उठू आम्ही
घाव पडो कोठेही । तडफडू आम्ही

अशी सुरवातीला त्वेषाची पण नंतर निवळून–प्रेमाच्या सामंजस्याने

वळ पाठीवर आमच्या
चाबूक उडो कोठेही

आणि शेवटी–

दु:खितांच्या वेदनांच्या
कळा उरात आमच्याही
संवेदना साऱ्या जगाची
हृदयात आहे भरभरून
नातें नवीन असें कांहीं
जोडून आहोत आम्ही
मानव तेही मानव आम्ही

अशी मानवतावादी भूमिका घेतात.

'एका निर्वासित चिनी मुलास' १९४२ ची दीर्घकविता. ज्येतांना आणि पराजितांना दोघांनाही नेस्तनाबूत करणारी महायुद्धाची घटना केंद्रस्थानी. कुसुमाग्रजांची 'जा जरा पूर्वकडे' ही कविता याच संदर्भात आठवणारी. त्यातील उपरोधगर्भ आशय वैचारिक पातळीवरूनचा. पण भावकवी अनिलांची भूमिका वेगळी. चिनी बालकाची दारुण अवस्था असहाय्यता पाहून त्यांचे अंत:करण अगोदर कंपित झाले नंतर त्यामागील विलक्षण अन्यायाच्या कल्पनेने संतप्त झाले. अनिलांचा सहानुभाव आणि जिव्हाळा या मुलामागे आहे. त्यामुळे कुसुमाग्रजांची कविता विचारजागृतीपुरती मर्यादित तर अनिलांची प्रेमभावना माणसातील भावनांना जागृत करणारी ठरते. जीर्ण मृतवत जगाची चिता पेटवून त्याला नवी उमेद देतांना आशावादी वृत्तीतून ते म्हणतात–

अनुक्रमणिका

त्या जीर्ण जगाच्या चितेतूनचं
उडणार आहे अमर पक्षी
नव्या स्थितीच्या–नव व्यवस्थेच्या
नव आदेशाचा नवाकांक्षांचा

अशी नवीन जगाच्या प्रस्थापनेची कल्पना आणतात व तिचे स्वरूप.

नवे जग ते
ज्यात न होतील मानवधनी
अथवा दास मानवांचेच
परकष्टांवर पुष्ट व्हायला
ज्यात ना जागा

ते जग नवे
बाळा, तुझ्या ह्या आर्त हाकेने
व्याकूळ होऊन येणार आहे.

धीर धर थोडा
घेणारच आहे तुला ते पोटी
तूंच त्यांची शक्ती
आणि उमाळा

असा पुरेपूर विश्वास बाळगतात. 'सुप्त ज्वालामुखी'त अन्यायाचा अतिरेक होताच, समाज व्यवस्थेला उलथवून टाकण्यासाठी प्रतिकारशक्तीच्या एकजुटीचं दर्शन आहे. लक्ष्मीपुत्रांना, सत्ताधीशांना, लोकनायकांना दिलेला इशारा त्यात आहे.

एकदा वाचनशैलीवर बोलत होतो. कवितेबद्दलच प्रेम लहानपणापासून उत्पन्न करायला हवं असा पक्का सूर पकडून ठेवला. अनिलांच्या कविता त्यांच्या वाचनशैलीतून ऐकणे, मधून मधून शब्दांचे–प्रसंगाचे विवरण करण्याची त्यांची सवय. एकाच कवीच्या अनेक कवितांबद्दलच्या उद्गम–विकासाच्या कल्पना, त्या त्या वेळी आवेशानी मनात स्पंदत जाणारी जाणीव, तिचा विकास त्याबाबतचे त्यांचे स्मरण-हे सर्व ऐकून एक वेगळीच आत्मीयता श्रोत्यांच्या मनात निर्माण व्हायची. अनिल रंगवून आपल्या कविता म्हणतांना त्यातील वाच्यार्थ, लक्षणा, व्यंजना अशा अर्थ वलयांनी त्यात कवी कशी जादू भरतो हे मोठ्या अभिमानाने सांगत. 'वाट' कविता म्हणतांना–

मला आऽवडते, वाट वळणाऽची
दाट झाडीची ऽ ऽ नागमोडीची
ही अलिकडची, नदिच्या थडिची ... मला
आऽवडते
सर घसरणिची ऽ ऽ पाय फसणीची
लवणावरची ऽ ऽ पान बसणीची

हे सूर कानात घुमत असतांनाच त्यांचं निवेदन सुरू व्हायचं–शहरातल्या मुलांना लवणे, पानबसणी, सरघसरणी हे शब्द कुठं माहिती असतात? खेड्यात भोवती पसरलेल्या वातावरणाची, त्यात हिंडण्याची शहरातल्या मुलांना कुठं सवय असते? खेड्यातली लहान नदीं–नाले, घसरडी झालेली काळी चिक्कण माती, गुराढोरांना चरण्यासाठी असणारी लवणं–असं वर्षाकालीन ग्रामीण चित्र त्यात आहे.

कधी 'मरणाऱ्या रात्रीतून मरणाचीच वाट पहात असणारां' कैदी कोंबडा अवेळीच त्यांच्या मनात आरवायचा. एरवी तुर्रा उडवीत, ठुमकत, ऐटबाज रीतीनं चालणारा कोंबडा, कधी त्याची मान पिरगाळून दोरीनं पाय बांधून हातात वा सायकलला लटकविलेला कोंबडा नि त्याच्या पार्श्वभूमीवर पेटाऱ्यांच्या डागातील मालधक्क्यावरील कोंबडा–पहाटेवेळी सकर्तव्याला त्याही स्थितीत न चुकणारा कोंबडा अशी रूपं ते ठेवीत. पण यामागे भारतातील काही क्रांतिकारकांची कर्तव्य-सन्मुखता, गीतेतलं तत्त्वज्ञान त्यात आहे. हे मात्र नवीनतेनं जाणवून द्यायचे.

कधी त्यांना 'जुई' आठवायची. इंद्रियनिष्ठ सुंदरतेचे निखळ व अलौकिक सुंदरतेत कसे परिवर्तन झाले हे.

तलम ढगांच्या सात घड्यातून गाळीव पडते सौम्य चांदणे
जाळीच्या पडद्यामधून दिसते जुईचे नितळ रूप देखणे

असे म्हणतांना ते इतक्या अर्थपूर्ण रीतीने ह्या ओळी म्हणत की ऐकणाऱ्या मनात शब्दसौम्यतेतून अधिक सौम्यता नि साध्या–सुंदर शब्दातून अधिक सुंदरता उद्दीपित व्हायची. नि

मादकता जाते मार्दवी विरुन सौंदर्य सोज्वळाआड दडते
सोलीव सुखाचे स्वप्नच एका जिवाला जागतेपणी पडते

अशी अतीद्रिय अनुभूती संचारून 'सोलीव सुखाचे स्वप्नं–ह्यावरावत त्यांचे आध्यात्मिक विवरण चाले.

– अशा प्रसंगोपात्त कित्येक कवितातील कित्येक ओळी मुखोद्गत असत, त्या म्हटल्या जात. मनात येई अनिलांच्या अनुभवांचा हा जामदारखाना ! पण त्यातील विचार–भावना, स्वरसंहिता आरोह–अवरोह; आघात–प्रत्याघात याबाबत कवितानुभूतीतील जगलेल्या क्षणांची–तपशीलांच्या स्मरणांची ह्यांची प्रत्येक आठवण किती ताजी आहे. जणू आताच ही कविता त्यांनी रचली.

कालिदास प्रेम

एकदा ओघाओघात मेघदूताबद्दल बोलणं निघालं, मेघदूत हे दीर्घकाव्य असूनही त्याचं भावकवितेशी फार जवळचं नातं आहे असा चर्चेचा ओघ आला. अनिल म्हणाले, 'मेघदूत सुंदर खण्डकाव्य आहे. तरी भावगीताची वृत्ती (Lyrical mood) तिचा विकास (Growth) विस्तार (expansion) प्रस्तार (Spreadiing out)—अशा रूपाविष्काराने त्याची अभिव्यक्ती झाली आहे.' मी म्हटलं, 'अनेक छोटयाछोटया भावनांना भावकवितेच्या रूपानं सूत्रबद्ध करण्याचा प्रयत्न असं नाही का म्हणता येणार ?' विकास–विस्तार–प्रस्तार असे मोठमोठे शब्द कशाला ?'

मेघदूताची कथा कालिदासाचं कल्पितच. पण ह्या कल्पिताला यक्षाच्या निमित्तानं घडविलेल्या मानवी भावनांच्या दर्शनानं विरहव्यथेचं जीवनदर्शन घडविल्याचा त्यात प्रयत्न आहे. यक्ष नि त्याची पत्नी यांची ताटतूट, मेघाचं दर्शन घडताच अंतःकरणात उचंबळून आलेली तळमळ, त्यातून एक छोटासा संदेश पाठविला असता तर ती भावकविता झाली असती. पण काव्यव्यापार तिथं कुठं थांबतो ? यक्ष आपल्या विरहिणी पत्नीला उत्कट प्रीतीभावनेतून सतत मेघाला सांगितलेल्या मार्गातून स्थळांकडे, नद्यांकडे, पर्वतांकडे पहातो आहे. याच विरहव्यथेतून लता–वृक्ष–वेलींकडे रामानीही पाहिलं होतं. मेघदूतातील सगळी निसर्गसृष्टी अशीच करूण, विरहव्याकूळ भावनेनी लवथवलेली–(अनिलांचा हा आवडता शब्द : 'लवथवत्या पानावर गहिवरते भरदुपार' 'तुझ्याविना' दशपदी पृ. ९१)–हा त्या भाववृत्तीचा विकास ! मेघाला मार्ग सांगण्याची पद्धत म्हणजे विस्तार नि प्रस्तार म्हणजे. आपल्यासारखेच विरहदुःख भोगणाऱ्या प्रियेच्या आणि त्याच्या सहवासातल्या मधुर प्रसंगाच्या स्मृती.

कालिदासाचं प्रेम 'दशपदी'तील 'अदृष्ट', 'श्रावणझड', 'लावण्य' या कवितात आढळतं. काही शब्द, काही ओळी अनिलांच्या संज्ञायतीत स्थिरावलेल्या.

अदृष्ट

इंद्रधनुष्याची कमान जेथून निघता दिसली वारुळातून
तेथपर्यंत तू विलीस साथ सात रंगांच्या वर्तुळातून

पूर्व मेघ १५

रत्नच्छाया व्यतिकर इव प्रेक्ष्यमेतत्पुरस्ता
द्वल्मीकाग्रात्प्रभवति धनुःखण्डयाखण्डलस्य

'श्रावणझड' मध्ये 'उथळ उथळ पल्वलात संगळून जळ वसते' अशी एक ओळ आहे. यातील 'पल्वल' म्हणजे 'डबके' हा शब्द रघुवंशातील अजविलापात आलेला आहे. अनिलांनी डबके न वापरता तो आणण्याचे कारण उथळ उथळ...जळ–यातील 'ळ'च्या अनुप्रासाशी जवळीक 'पल्वळ' यातील 'ळ' ने होते म्हणून योजला.

'लावण्य'मधील 'रम्याणि वीक्ष्य' या श्लोकातील कल्पना श्रुतयोजनेची द्योतक आहे असं ते म्हणाले. मला काहीच समजलं नाही. कारण मूळ श्लोक नि श्रुतयोजना–याबद्दल मी अनभिज्ञ होते. आपण हा संदर्भ शोधायचा नि अज्ञान एवढयात दिसू द्यायचे नाही. कळले नाही तर आहेतच पुन्हा विचारायला असं ठरवलं पण संदर्भ सापडला.

शाकुंतलात तिसऱ्या अंकात शकुंतलेचा गांधर्वविवाह चौथ्या अंकात तिची पाठवणी आणि पाचव्या अंकात हंसपदिकेने गायिलेले विशुद्ध गीत असे

अभिनव मधुलोलुपो भवांस्तथा
परिचुम्ब्य चूत मञ्जरिम्
कमल वसतिमात्र निर्वृतो
मधुकर विस्मृतोऽस्ये नां कथम्

असे आहे. दुष्यंत ते ऐकत आहे. याचा वाच्यार्थ असा की, नित्य ताजा मध लुटण्यासाठी आसुसलेला तू आम्रमंजरीचे तशारीतीने चुंबन घेतल्यावर, केवळ कमळात वास्तव्य करायला सापडले एवढ्यानेच संतुष्ट होऊन, हे मधुकरा, या आम्रमंजिरीला कसे विसरलास ? हा असला तरी यातली व्यंजना महत्वाची. ती अशी की पूर्वी ज्या स्त्रीवर उत्कट प्रेम केले तिला विसरून जाऊन कामुक पुरुष दुसऱ्या स्त्रीच्या प्रेमात

सापडला आहे. हंसपदिकेचे हे गीत ऐकून राजा अस्वस्थ होतो. पूर्वी केव्हातरी अनुभविलेल्या प्रणयाची विस्मृती हा हंसपदिकेच्या गीताचा विषय व राजाला देखील दुर्वास शापामुळे शकुंतलेवरील उत्कट प्रेमाची विस्मृती होते. त्याच्या मनात त्या प्रणयाची तरल स्मृती रेंगाळते. त्यामुळे वस्तुतः कोणतेही कारण नसताना तो बेचैन होतो. त्याला हुरहूर लागते. कोणाचाही विरह झाला नसता अशी अस्वस्थता का येते ? हे त्याच्या ध्यानात येत नाही. गतजन्मातील प्रणयस्मृती नकळत मनात रहात असावी व अशी व्याकूळता त्यामुळे येत असावी--या संदर्भात

रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान्
पर्युत्सुकी भवति यत्सुखितोऽपि जन्तुः
तश्चेतस्य स्मरति नूनयबोधपूर्वं
भावास्थिरणि जननान्तरसौहृदानि

असा श्लोक आला आहे. म्हणजे रमणीय दृश्य पाहिल्यानंतर आणि मधुर स्वर ऐकल्यावर त्याला जी हुरहूर लागते तिचे कारण असे की कसलीही स्पष्ट जाणीव नसतांना गतजन्मातील संस्काररूपाने स्थिर असलेल्या भावबंधनाची त्याला आठवण होत असते. यातूनच

असे काहीतरी आगळे लावण्य
केव्हा कधी काळी दिसून जाते
वेगळ्या सौंदर्य–पर्युत्सुक जीवा
जन्मांतरीचे सांगत नाते
नसते निव्वळ गात्रांची चारूता
त्याहून अधिक असते काही
ठाव त्याचा कधी लागत नाही
आणि आठवण बुजत नाही

"लावण्य" मधील या ओळीची 'श्रुतयोजना' झाली असेल. बरं झालं संदर्भ मिळाला. पण अनिलांनी नवीन आणखी कधी सांगितलं असतं.

'देहलीदीपन्याय'

एकदा दशपदीतील 'देहलीदीपन्याय' यावर बोलणं झालं. दशपदीत ओळीत कुठलीच विरामचिन्हे नाहीत. फक्त शेवटी उद्‌गारवाचक चिन्ह ! ओळीतील शब्दात आंतरप्रक्रिया घडत असते हे जरी खरं तरी माझ्या कवितेतील (दशपदीतील) काही शब्द उंबरठ्यावरील दिव्यासारखे त्यांच्या आधीच्या व नंतरच्या शब्दांवर प्रकाश टाकतात. त्यांना अधिक अर्थसंपन्न करतात. कवितेतील ओळ कुठूनही सुरू करून आणि कुठेही घेऊन म्हणता येते. त्यामुळे अर्थाच्या एकेक वेगळ्या छटेला उठाव देता येतो. असं त्यांचं या बाबतच स्पष्टीकरण.

विराणी– 'आभाळ खाली वाकलेले मेघ काळे क्रूर'
आभाळ खाली वाकलेले–मेघ काळे क्रूर
खाली वाकलेले मेघ–काळे क्रूर
वाकलेले मेघ काळे–क्रूर
मेघ काळे क्रूर

साथ– 'पायात बांधून स्पंदनाचे चाळ
चालायचे आहे वाऱ्यासवे'
पायात बांधून स्पंदनाचे चाळ–
चालायचे आहे वाऱ्यासवे
बांधून स्पंदनाचे चाळ चालायचे आहे–
वाऱ्यासवे–चालायचे आहे वाऱ्यासवे

कालव– 'दूरच्या ढगांच्या काळ्या सावल्या
निळ्या जांभळ्या दर्याच्या कडा'
दूरच्या ढगांच्या काळ्या सावल्या–
निळ्या जांभळ्या दर्याच्या कडा
दूरच्या ढगांच्या काळ्या सावल्या
निळ्या जांभळ्या–दर्याच्या कडा
दूरच्या ढगांच्या–काळ्या
निळ्या जांभळ्या दर्याच्या कडा

–अशा कितीतरी कविता ह्या न्यायाने वाचता येतात. प्रतिभाशाली कवी नेहमीच आपल्या स्वतंत्र प्रज्ञेनं, विश्लेषक वृत्तीनं काही वैशिष्ट्यपूर्णता आणत असतात हे खरं !

'मुक्तछंद-दशपदी'

मुक्तछंदाच्या प्रवर्तनाचा माझा हेतू आणि आज त्याचं कसं विकृतीकरण चाललंय् याबद्दल अनिल पोटतिडीकेनं बोलत. 'काव्य निश्चित अर्थवाही व्हावे आणि प्रगल्भ प्रज्ञेचा आणि प्रतिभेचा विलास त्यात प्रकट व्हावयाला छंदातील कृत्रिम बंधनांची अडचण नसावी ह्या हेतूनं त्याकाळी पाहिलेलं ते माझं स्वप्न होतं. १९२४ साली माझ्या मनात मुक्तछंदानं घर केलं. कारण वाल्ट व्हिटमन आणि त्यानिमित्ताने वासुदेव बळवंत पटवर्धन यांची इंग्रजी कविता निः-

विण्याची घाटणी. त्यांची वाचनशैली मला फार मोहविणारी होती. मी १९३१ च्या वागीश्वरीत त्यानिमित्ताने लेख लिहिला. पण ही एक मृत्यूंजयी झुंज होती. कारण लेखाबाबत वाचकांच्या उदार-अनुदार टीका आल्या. भ. श्री. पंडित, वा. ना. देशपांडे आदि मान्यवरही चर्चेला सरसावले. वाद-विवाद-तंत्रात्मक पद्धती, त्याची कुचेष्टा, हेटाळणी असा ५ वर्षं हा प्रश्न वाचकांची मनं आकृष्ट करणारा ठरला. १९३६ च्या जळगावच्या साहित्य संमेलनात तो घसास लागला आणि मराठी मुक्तछंदाची रूपं बीजरूपानी महदंबेच्या धवळचातून, ओव्यातून आढळतात अशा निष्कर्षाप्रत तो पोहोचला. आज मुक्तछंदातच कविता लिहिणे सर्वांचा जन्मसिद्ध हक्क होऊन बसलाय्. अशीच 'दशपदी' पण हळुहळू रूढ करण्याचा अनिलांचा प्रयत्न. छंदशास्त्रात छंदाच्या घटकांचा, अक्षरसंख्या, गण, मात्रांचा जरी विचार झाला तरी चरणांच्या संख्येवरून पद्यबंधाचा विचार अनिलांनी पहिल्याप्रथम केला व या संदर्भात काव्यात form ही काय कल्पना आहे ह्याचेही विस्तृत विवेचन अभ्यासकांना मार्गदर्शक व मोलाचे ठरणारे आहे. ते दशपदीत विस्तृतरीत्या त्यांनी केले आहे.

अनिलांचा व्यवस्थितपणा लक्षणीय. त्यामुळेही अभ्यासकांची खूपच सोय होते. 'पेर्ते व्हा' ह्या काव्यसंग्रहाच्या शेवटी जोडलेली टिपणे महत्त्वाची. अनुक्रमानुसार कवितेचे नाव, तिचा रचनाबंध, म्हणजे ती कोणत्या वृत्तात-जातीत-छंदात आहे हे दाखविणे. शक्य तेथे छंदोरचनेतील नावे देणे, कवितांना विसंगत चाली लावल्या जाऊ नयेत म्हणून मनात असलेली स्वर योजना राग-ताल यांसह देणे, अवश्य तेथे शब्दांवरील टीपा, रचनेचे स्थल-काल इत्यादि हा सर्व तपशील अभ्यासकांच्या कितीतरी अडचणी दूर करणारा वेळ वाचवणारा ठरतो. अनिल आपल्या कवितांची दक्षता अपत्यांबाबत. बाळगावी अशा तऱ्हेनी घेत.

त्यांची काव्यदृष्टी : त्यांच्या व्यथा

काव्य म्हणजे सर्व 'कलांची कला'! गायन, वादन, नृत्य, नाट्य, वास्तु, शिल्प, चित्र या शरीरमाध्यमातून, क्वचित विशिष्ट अवयवांच्यांच उपयोगातून निर्माण होणाऱ्या कला. काव्याकलेला ह्या अंशाची आवश्यकता नाही. ते सकळ अर्थाच्या माध्यमाने मनावर परिणाम करते. ह्या सर्व कलांचा आशय तीत आहे. पण यासाठी अभ्यास-आपल्या परंपरांचा नि आंग्ल-संस्कृत साहित्याचा, संत वाङ्मयाचा हवा. यामुळे काव्याची जाण वाढीला लागते आणि काव्यसमज प्रगल्भ होत जातो. हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत लिहिण्याच्या फंदात पडू नये. न पेक्षा मौन पाळावे. स्वतःशी इमान राखावे. त्यांच्याकडे येणाऱ्या अभ्यासकांना, नवोदित कवींना मार्गदर्शना-अगोदर ही समज ते देत. "अव्यवस्थित प्रज्ञ प्रतिभावंत" या शब्दांत त्यांना 'अहेर' मिळे. वैयक्तिक जीवनातील विफलता काव्यात उमटविणे, विस्कळीत संवेदनांचा चिल्लर खुर्दा वाटणे आणि शब्दांशी पोरखेळ करीत बसणे म्हणजे आजचे नवकाव्यलिहिणे अशी त्यांची समजूत झाली होती. त्याचा त्यांना राग येई. कारण मानवी जीवनात केवढा आनंद, केवढे चैतन्य, केवढी उदात्तता साठविली आहे ह्याची या अव्यवस्थित प्रज्ञांना जाणच नाही ही त्यांची तक्रार. त्यांची काव्यदृष्टी म्हणजे जीवनातील सडलेले, किडलेले, हार खाल्लेले असं व्यक्त करणं! एवढेच वास्तव असते काय? (या प्रश्नाचे अगोदर उत्तर द्या मगच पुढे बोला-असा त्या प्रश्नाचा रोख असे.) वैफल्यग्रस्त जंतुजीवन म्हणजे मानवी जीवन कां? अशा लोकांच्या अज्ञानाची, अनुभवाच्या अभावाची, अक्षरसाहित्य न वाचल्याची ही कोती दृष्टी बघून हे काय काव्य लिहिणार याबद्दल त्यांना खंत वाटे. आशावादी वृत्तीचे अनिल, भारतीय संस्कृतीच्या परंपरेत पोसले गेलेले अनिल, हिरीरीने जीवनाची उदात्त-उज्ज्वल रूपं, त्यात ठायीठायी दडलेले सौंदर्य उकलवून दाखविणारे, संतसाहित्य, रवींद्रनाथांचे साहित्य, आंग्ल व संस्कृत साहित्य पचवून आपल्या काव्य समजाची जाण प्रगल्भ करणारे अनिल नवकाव्यातील दुःखांचे वेदनांचे - ओंगळ भावनांचेच प्रकटीकरण अधिक होत आहे ह्या जाणीवेने अस्वस्थ होत. आपल्या मातीशी, आपल्या जीवनाशी, जीवनमूल्यांशी, साहित्यिक परंपरेशी, विचारांशी, दर्शनांशी विरोधक अशा वृत्तीप्रवृत्तींना जवळ करू नका, पाश्चात्यांचे अंधानुकरण केवळ एक टूम म्हणून स्वीकारू नका असा इशारा देत. त्यातून त्यांची व्यथा प्रकट होई.

असे अनिलांच्या सहवासातील कितीतरी क्षण मनात गर्दी करतात. नुसतं साहित्य-काव्य यापुरतंच

(पान १० वर पाहा)

‘ काव्य आणि क्रांती ’ विषयक अनिलांचे विचार

प्रज्ञा आपटे

सारेच दीप कसे मंदावले आता
ज्योती विझू विझू झाल्या–
की झड घालून प्राण द्यावा पतंगाने ।
असे कुठेच तेज नाही !
थिजले कसे आवाज सारे ?
खडबडून करील पडसाद जागे
अशी कुणाची साद नाही.

भोवतीच्या परिस्थितीने कवि अनिल असे अस्वस्थ होत पण त्यांच्या व्यक्तिमत्वाचा स्थायीभाव होता काव्या-वरची व जीवनावरची आत्यंतिक निष्ठा, ‘नसे मुमुक्षु, मुक्त मी । अजून यौवनात मी ! ! ’ही त्यांची वृतो.

काव्यलेखनाप्रमाणेच त्यांच्या स्वभावातले विशेष काही वेळेस त्यांच्या दुर्मिळ गद्यलेखनातून जाणवतात. काव्यावरील नितांत निष्ठा, काव्याचा व समाजाचा जिव्हाळ्याचा संबंध, मराठी साहित्याच्या अभ्यास–पद्धतीत त्यांना अपेक्षित वाटणारे बदल याविषयी सुस्पष्ट, सुसंबद्ध पण संयमी विचार त्यांनी अभ्यासपूर्वक व्यक्त केलेले आढळतात.

साहित्य व समाज याविषयी असंख्य लेखक व टीकाकार लिहून गेले आहेत. या संदर्भात कलावादाचे पुरस्कर्ते प्रा. फडके व त्यांच्यावर कडाडून हल्ला करणारे आचार्य अत्रे यांचे स्मरण होणे अपरिहार्य आहे.

ललित साहित्यामुळे समाजजागृती होत नाही. तो ललित वाङ्मयाचा उद्देश नाही. निबंधातून हे कार्य होऊ शकते असे प्रा. फडके यांचे मत होते.

आचार्य अत्रे यांनी अत्यंत आवेशाने वरील मत खोडून काढले. ‘वन्दे मातरम्’ या एकाच गीताने पस्तीस कोटी लोकांच्या अंतःकरणातली स्वातंत्र्य ज्योत प्रदीप्त केली. गॉल्सवर्दीच्या ‘न्याय’ नाटकाने इंग्लंड-मधील तुरूंग पद्धतीत सुधारणा झाली. बर्नार्ड शॉनी साहित्यातून इंग्लंडमधे समाजवादाचा पाया घातला. इ. स. १९०८ मधे सावरकर व गोविंद यांच्या पोवाडयांनी महाराष्ट्रातील तरुणांच्या मनात क्रांती घडवून आणली. अशी अनेक उदाहरणे हेच स्पष्ट करतात की भीषण परिस्थितीची हृदयद्रावक चित्रे काव्यात रेखाटून समाजाच्या हृदयाला पीळ पाडण्याचे व त्यांना जागृत करण्याचे कार्य ललित लेखक प्रभावीपणे करीत असतो असे अत्रे यांचे ठाम मत होते.

इ. स. १९४४ मधे महाराष्ट्र वाङ्मय मंडळ; एल्फिस्टन कॉलेज व रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्स; मुंबई या संस्थेच्या वार्षिक सम्मेलनाचे वेळी अनिलांनी ‘काव्य आणि क्रांती’ या विषयावर दिलेले अभ्यासपूर्ण भाषण त्यांच्या व्यक्तिमत्वातले अनेक बहुमोल गुण स्पष्ट करणारे आहे. तसेच साहित्य व समाज याविषयी त्यांचे चिंतन किती जुने, सखोल व मूलगामी होते याचे द्योतक असे हे विचार आढळतात.

सप्टेंबर १९४४ च्या सत्यकथेत प्रा. रा. श्री. जोग यांचा एक लेख प्रसिद्ध झाला होता. केशवसुतांना– वाङमयीन व काव्यगत क्रांतिकारक म्हणायला हरकत नाही पण सामाजिक क्रांतीचे श्रेय केशवसुतांना देणे इतिहासास धरून होणार नाही असे विचार श्री. जोग यांनी त्या लेखात मांडले होते. त्यांनी लिहिले होते की त्या काळात समाजसुधारणेचे वा क्रांतीचे सारे विचार गद्याद्वारे लोकहितवादी, आगरकर किंवा फुले यांच्या लेखनात येऊन गेले. केशवसुतांनी फक्त काव्यात ते प्रथम आणले. काव्यपंक्तीच्या तरफेने जग उलथून देण्याचे क्रांतिकारक विचार त्यांच्या काव्यात असले तरी ते काव्य समाजाकडून वाचले गेल्याशिवाय त्यातले क्रांतिकारकत्त्व प्रत्यक्षात परिणती पावू शकत नाही.

श्री. जोगांच्या मते केशवसुतांचे काव्य अत्यंत अल्पसंख्य अशा काव्यप्रिय रसिकांशिवाय इतर कोणी फारसे वाचले नव्हते. मग ते समाजात क्रांती कसे घडविणार ? कवि अनिलांनी अत्यंत मुद्देसूदपणे काव्य-शक्तीचा प्रत्यय आपल्या शब्दातून श्रोत्यांपर्यंत, पोचवलेला आढळतो. वाङमयाच्या वाचनाने भारलेला, स्फूर्त झालेला एकेक वाचक ती स्फूर्ती, तो विचार, पुस्तके, व्याख्याने, प्रवचने, चर्चा, गोष्टी, संभाषण या अनेक मार्गांनी अनेक थरापर्यंत पोहोचविणारा स्फुल्लिंग प्रभावबिंदू, व शक्तिकेंद्र असतो हे स्पष्ट करताना मार्क्सच्या 'कॅपिटलचे' अत्यंत समर्पक उदाहरण त्यांनी दिले आहे. कॅपिटलचे मुळात वाचक किती आहेत व त्यातल्या विचाराने विचारक्रांती झालेले लोक त्याच्या किती अधिकपट आहेत यावरून ग्रंथाचे, ग्रंथ-कर्त्याचे, काव्याचे व कवीचे समाजातले महत्व लक्षात येईल.

काव्याला वाचनाव्यतिरिक्त खाजगी मित्रमंडळीत वा जाहीर सभेत रंग भरू शकतो. 'बालकवी' केशवसुतांची 'तुतारी' इतक्या भावपूर्णतेने म्हणत की श्रोते तल्लीन होऊन जात. कारण कविप्रतिमांच्या पद्धतीने एक भाववृत्ती Emotional attitude निर्माण करत असतो. असे काव्य वाचून वा ऐकून या विशिष्ट सामाजिक स्थितीबद्दल जनतेची एक भाववृत्ती तयार होते.

केशवसुतांनी अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न या प्रभावी कवितेतून समाजाला जातिभेदाचे जे दु:ख जाणवून दिले ते परिणामकारक नव्हते असे कोणी म्हणू शकेल का ? समाजसुधारकांनी या विषयावर जे गद्यलेखन केले ते तर्कनिष्ठ विचार होते. पण दोहोंचा उद्देश व परिणाम यात काव्य कमी परिणामकारक ठरू शकत नाही हे अनिलांनी साधार स्पष्ट केले आहे. सोवियत काव्यटीकाकार निकोलाय बुखारिनचे विचार या मतांच्या पुष्टीसाठी त्यांनी अचुकपणे उद्धृत केलेले दिसतात.

मात्र विशिष्ट सामाजिक विचारांचाच प्रचार; क्रांतीचाच प्रसार हे कवितेचे ध्येय बनू शकत नाही हे पण त्यांनी स्पष्ट केलेले दिसते. यासाठी सर्जेई येसनिन या रशियन कवीचे उदाहरण त्यांनी आपणापुढे ठेवलेले दिसते. त्याने रशियन क्रांतीत स्वत:ला झोकून दिले पण 'आपली लाडकी वीणा म्हणजे आपले काव्य मी कुणाला देणार नाही, तुम्ही आशा कराल तसे काव्य लिहिणार नाही, जसे स्फुरेल तसे गाईन' हा त्याचा स्वतंत्र तडफदार बाणा अनिलांना विशेष उल्लेखनीय वाटलेला जाणवतो.

म्हणूनच ते म्हणतात की, 'काव्याने प्रचार होईल पण प्रचाराचे काव्य होणार नाही. स्वत:ला जे पटले, अनुभवले, प्रतीत झाले, भावनेतून स्फूर्त झाले त्यातून काव्य आकारास येते. मागणीनुसार पुरवठा हे तत्त्व काव्यास लागू पडत नाही. आपल्या अंतर्भावना अत्यंत प्रामाणिकपणे, प्रत्ययाप्रमाणे, जाणीवेने बोलणे यात लेखकाचे कौशल्य दिसून येते. क्रांतीची लाट येते आहे तर क्रांतीचे कृत्रिम काव्य रचावे हे श्रेयस्कर नाही. असे नकली काव्य समाजावर प्रभाव टाकू शकत नाही.' हे विचार त्यांच्या संयमी शैलीतून त्यांनी व्यक्त केलेले आढळतात.

काव्याचे क्रांतिकारत्व, सामाजिक महत्त्व अनिलांनी जाणले होते. 'मलाच माझी रुचे खरी कविता मनोहर' ही वृत्ती मागच्या काळात जमा झाल्याची जाणीव त्यांना होती. कवींनी हस्तीदंती मनोऱ्यात बसून चालणार नाही. त्यांनी समाजाभिमुख झाले पाहिजे. काव्याच्या टीकाकारांनी काव्याचे महत्वमापन करावे. वाचकांनी काव्याबाबत आस्था बाळगावी कारण काव्य जीवनाचे प्रतिबिंब उमटविणारा आदर्शच नाही–आरसाच नाही–तर जीवनावर स्वयंप्रकाश पाडणारी, जीवनास तापविणारी, जीवनाचे बाष्पबिंदू बनविणारी व जीवनास वर्षविणारी सूर्यप्रभाही आहे.' असा त्यांचा विश्वास होता.

△ △ △

कवी अनिलांचा आशावाद

आशा सावदेकर

कवी अनिलांची चिरतरुण आणि चिररुचिर कविता अभ्यासाचा विषय झाली, होत आहे आणि होईलही. पण भावस्पंदनांची जी अलवार जपणूक त्यांच्या काव्याने केली त्याबद्दल टीकाकारांनाही अलवार शब्दच योजावे लागतील. प्रसन्न व्यक्तित्वाच्या ह्या कवीच्या कवितेत शेवटपर्यंत जी उन्मनी अवस्था आहे ती एका निखळ आशावादी कवीची आहे, निव्वळ गुलजार गीते लिहिणाऱ्या कवीची नाही. ह्या कवीची प्रतिभा ही सहजतेने भावतरलतेबरोबरच वैचारिकतेचेही उज्ज्वल दर्शन घडविणारी आहे. एकाचवेळी-वस्तुनिष्ठा आणि आत्मनिष्ठा ह्यांच्या परस्परानुप्रवेशातून घडलेले काव्य हा अनिलांच्या प्रतिभेचा विशेष आहे. ती भावनांच्या उत्कट आविष्काराबरोबरच वैचारिक गंभीर आशयाची धारणा दर्शविण्यासाठी खंडकाव्याचेही रूप धारण करू शकते हे महत्त्वाचे.

नव्या आकांक्षांचे तेजाळले रूप बघणे, दाखवू पहाणे आणि त्यांचे पूजन करणे हा अनिलांच्या आशावादाचा आकृतीबंध आहे. त्यामुळेच त्याविरुद्ध जे आहे त्यावर घाव घालणे जरी शक्य नसले तरी त्या वेदनांनी व्याकुळ होणे हा त्यांच्या काव्याचा स्थायीभाव आहे.

अखंड आमच्या मायभूमीची
करून खांडकी तीन तिहींकडे
स्वातंत्र्य म्हणे मिळणार आम्हा !
घेतले आहे का गुंगीचे औषध
आम्ही सर्वांनी की आम्हीच तिचे प्राण असता
आम्ही तिचा देह असता
वेदनांनी आम्ही व्याकुळ न व्हावे ?
तिच्या शरीराचे तुकडे होता ! (सांगाती : ११)

आणि सौंदर्याच्या ओझरत्या दर्शनानेही मोहरून जाणे, त्या सौंदर्यक्षणाभोवती पिंगा घालीत सोलीव लावण्यदर्शनाची आस अधिक कसोशीने जपत राहणे हाही त्यांच्या प्रतिभेचा सहजधर्म होता.

पावसाची सर ओसरून जाते,
ऊगाच तुषार भिरभिरती
इवल्या इवल्या फुले भरलेल्या
अंगनिथळत्या जुई भवती

...

मादकता जाते मार्दवी विरून
सौंदर्य सोज्ज्वळाआड दडते
सोलीव मुखाचे स्वप्नच एक
जीवाला जागतेपणी पडते. (सांगाती : ५९)

जिथे जिथे मानवतेचे आवाहन होते त्याचा स्वीकार आणि तोही नव्या आकांक्षांच्या आशेने हा त्यांच्या काव्यदृष्टीचा परिपाक होता. म्हणूनच 'निर्वासित चिनी मुलास' पाहून आलेले उमाळे हे केवळ सात्विक संतापाचे नाहीत तर मानवताप्रेमी मनाच्या मुक्या हुंदक्यांचे ते सीत्कार आहेत.

...हे जीर्ण जग !
जगत आहे जे जगू न देता एकमेकांना

हपापून आहे लढत नित्य
कमीनपणे

अशा ह्या जगासाठी क्रंदताना लागलेली 'तहान' विझविण्यासाठी 'आशानिराशांच्या अंतरंगातील अदम्य विश्व मिसळून आर्द्र झालेली हवा' पिऊन घेणारा हा कवी जगातील वाईटाच्या दर्शनाने विझून गेला तरी जगावर संतापत नाही. कारण जीवनावर नितांत प्रेम करणारा असा हा कवी आहे.

'किती दूरची लागे झळ आतल्या जीवा' अशा हळव्या भावनेने सुकल्या प्राणावर फुंकर घालणारा आहे. 'जीवनातली निशा संपवीत वाहवीत आशांचा वारा' हे आपले कार्य मानणारे हे कवीहृदय आहे. म्हणूनच जीवनातले सारे गोडकडू चाखूनही ते नित्य गात राहिले.

'अजून यौवनांत मी जगात जागत्या अशा
जगावयास गावया पहावया उषा निशा
इथे निसर्गचारुता इथे प्रयत्न मानवी
उचंबळोनि वृत्ति ये उमेद होऊनी नवी (पेर्ते व्हा: ३०)

प्रणयातही आशावाद त्यांनी सोडला नाही. 'प्रेम आणि जीवन' ह्या दीर्घकाव्यातही ते पुन्हापुन्हा सांगतात.

प्रणयी जीवांनो ! गेल्यावर जीव
ऐकवितो तुम्हा निष्फळ बोल
आहेत कारण अनुभवाचे
माझ्या प्रतीतीचे !
कारण नाही मी प्रीतिशाहीर
प्रीतीचे रडगाणे गाणारा
शाहीर आहे मी तेजस्वी गाणे
गाणारा, प्रीतीच्या आशावादाची !

झगडत का असेना जीवन फुलण्यातच त्याची सार्थकता आहे. प्रेमपूर्ती झाली नाही तरी जगणे हा धर्म आहे. प्रेम ही चित्शक्ती आहे विनाश हे तिचे ब्रीद नाही. ह्या आशावादी वृत्तीमुळेच प्रीतिमंदिराला आग लागली तरी प्रीती अभंग आहे.

मंदिरास लागली
आग सर्व पसरली
कळस कोसळे पडे
नाश, नाश चहुकडे
अजुनि मूर्ति आतली
नसे मुळीहि भंगली
धरुनि हृदयि ती परी
जगेन मी कितीतरी

(फुलवात : १०)

ही अशी संक्रमणाची जादू जगातल्या साऱ्या कुरुपतेबाबत घडून ते सुंदर दिसू लागते याचे कारण प्रेम. ह्या प्रेमानेच आशावादाचे सुंदर लेणे ह्या कवीहृदयाला बहाल केलेले आहे.

होते जगात एकदा
कंटकची भरलेले
सर्व फुले झालि अता
प्रेम तिथे जन्मले'

(फुलवात: ४६)

कोमल स्निग्ध भावनेने आर्द्र झालेल्या ह्या रसिक व्यक्तित्वाला अंतरतृप्तीचे वरदान आहे. आणि म्हणूनच दुःख वैषम्याचे चित्र रेखाटतानाही ते मूळच्या चैतन्याच्या स्रोताला स्पर्श करून जातात. अनिलांच्या खंडकाव्याने ह्याच चैतन्याच्या आधारे त्या काळची अवकळा दूर केलेली आहे. कथानकरहित खंडकाव्याचा हा आदर्श त्याचेच द्योतक आहे. स्वतःत आणि स्वतःतच रंगून जाणाऱ्या आत्मप्रतीतीबरोबर 'स्व' बाहेर पडून आलेली विश्वप्रतीती त्यांच्या दीर्घ काव्यांमधून प्रकट झालेली आहे.

त्यांना पडलेल्या आशावादाच्या सुंदर स्वप्नामुळे क्रांतीचे चिंतन करणारे त्यांचे मनही, सौंदर्याच्या आराधनेतच रंगलेले दिसते. 'दशपदी'मध्ये तर 'शेंगाचे पिवळेपण कण्हताना रुणझुणते' असे सौंदर्यलुब्धतेचेही पक्वपण जाणवते.

'श्रावणझड बाहेरी मी अंतरी भिजलेला' हे जातिवंत सौंदर्यप्रेमी मनाच्या जगण्यातले जाणतेपण दशपदीच्या ओळीओळीतून ठिबकताना दिसते. काहीतरी खूप जवळचे हरवले आहे ह्या तिथल्या सुरात कडवटपणा कुठेही नाही. उलट आसक्तीची आस तुटलेली नाही. तीही पिकून मधुर झालेली आहे.

(पान ६ वरून)

त्याचं मार्गदर्शन मिळे असं नव्हे. वयाची तमा न बाळगता, शारीरिक थकव्याला न जुमानता तरुणांना लाजवील अशा दमानं त्यांचा सर्वत्र संचार असे. संस्कृत प्रचारिणीची सभा असो, विदर्भ संशोधन मंडळ, विदर्भ साहित्य संघातील कार्यक्रम असोत वा मराठीची दोन दिवसाची सेमिनार असोत—सर्वांना ते आवर्जून अगदी वेळेवर येत. त्यांच्या लौकिक व वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात अनेकानेक व्यक्तींची मतमतांतरे त्यांच्या अनुभवसंदर्भात असू शकतील. पण 'एक हृदय रसिले व्यक्तिमत्त्व' याबाबत मात्र दुमत होणार नाही. △ △

दुर्वांकुराच्या अग्रांवरती लाख टिकल्या उजळतात
कवडशातून धूलिकणांच्या विश्वाचा विस्तार पाजळतात
तेव्हा संवेदना अबोध काही तदात्मतेची थरारून जाते
प्रीतीचा पहिला स्पर्श जाणवून सारे अंगांग शहारून येते

मुख्यत: अनिलांच्या काव्याचे वैशिष्ट्य असे की ते शेवटपर्यंत असे विकासशील राहिलेले आहे. 'अंतरी भिजलेला' अशा चिरविरहाच्या जाणीवेची थरथर मनी मानसी जपूनही जीवनसौंदर्याचे कण टिपण्याची त्यांची वृत्ती कुठेही कोमेजलेली नाही हा त्यांच्या आशावादी वृत्तीचाच विजय म्हणावा लागेल.

म्हणूनच अनिलांची कविता 'नवस्वप्ने क्रांतीची' पहाणारी आहे पण अग्निज्वाळांनी रसरसलेली नाही. पण मानवतेच्या जाणीवेने मृदु फुलांचेही निखारे बनल्याच्या जाणीवेने उफाळून ह्या जगाला आवेशाने काही नवे सांगू पहाणारी आहे. म्हणूनच तिचे स्वरूप सौंदर्यवादी असूनही वेगळे बनलेले आहे. आत्मविसर्जनाची भावना आल्यामुळे 'अहं'चे अंडे फुटून विश्वात्म अशा दृष्टीचा उदय त्यांच्या काव्यात झालेला दिसतो. ही सौंदर्यवादी मनाची भूमिका अनिलांच्या काळाच्या दृष्टीने निश्चित नवी होती. निव्वळ आत्महीन होऊन दु:खाची पिंजण न करता म्हणूनच रसरशीत सौंदर्याचे आवाहन त्यांच्या काव्यात येऊ शकले कारण त्यांच्या मनाचा स्थायीभाव त्यांच्या आशावादी वृत्तीतच साठवलेला आहे.

संस्कृतिच देते जन्म कलेला
चैतन्य, विलास तिचाच असे
कला आणि विद्या,
जणू मोहरच वृक्षावरला !
आणखी असंख्य फुलातच त्या
सूक्ष्म आहेत बीजे साठली
ज्यातून होणार नवनिर्मिती
पुढे संस्कृतीची

(भग्नमूर्ती : ३३)

कला आणि विद्यांचे पोषण करणारी संस्कृती मूर्तिभंजकांनी नष्ट केलेली पाहून मनात उठणारे हे कल्लोळ निव्वळ सौंदर्यहानीचे नाहीत कारण अनिलांच्या सौंदर्यवादी मनाच्या आत आशावादी अंकुराचा आत्मा वसलेला आहे. म्हणूनच भग्नमूर्ती पाहून विव्हळ झाले तरीही ते मन विचार करते–

पण आता त्या नाशावरहि
पुन्हा बांधायास आशामंदिर
उठले पाहिजे आपणच ना ?

(भग्नमूर्ती ६९)

अनिलांच्या मृत्यूमुळे सौंदर्यवृत्तीशी जडलेले हृदयंगम आशादायी वृत्तीचे चालतेबोलते नातेच जणू लोप पावले आहे. जी आशादायी वृत्ती वयाबरोबर अधिकच पक्व, मधुर झाल्याचे वेगळेपण त्यांनी दाखवून दिले अन्यथा ही गोष्टच विरळा. अनिलांचा आशावादी सौंदर्याभिमुखतेच्या अशा ह्या पाऊलखुणा हेच आता नव्यापिढीसाठी उरलेले सारसर्वस्व आहे ज्या नव्या समीक्षेला, नव्या अभ्यासाला आवाहन करणाऱ्या आहेत.

△ △ △

विजेरी तारे

सैयद अकबर

लांब दूरवर पसरलेले क्षितिज
डोळ्यात गुंडाळण्यासाठी
उंचावलेली दृष्टि
मध्येच विजेरी तारावर अडखळते
नजर पिळवटून निघते
सरळ समांतर तारांवर
चिंध्या, धागे, फाटक्या तुटक्या पतंगाच्या संगती
लोंबकळणारे किळसवाणे वाटवाघुळ
मनातले इरादे इरादे
अस्ताव्यस्त लोंबू लागतात
बाहेरच्या विजेरी तारा
शरीरातली
नस नस
ताणून जातात.

△

गळ्यात गळा घालणारे

अनन्त कान्त

गळ्यात गळा घालणारे दोस्तच
जेव्हा बेईमान होऊन गळा कापतात
बेमालूमपणे.
तेव्हा–
दिवसाच भकास अंधार जाणवतो.
तेव्हा–
अंधाराच्या अस्तित्वातच सुखाच्या
पणत्या जाळणाऱ्या आम्ही काजव्यांनी
कोणत्या साम्राज्याच्या संस्कृतीचे दिप जाळावेत.

△

निघालो त्यावेळी

सुधाकर नेर्लेकर

निघालो
त्यावेळी तुझे डोळे
खोल खोल विहीरी
एवढे निळे सावळे आषाढाचे मेघ
मला वाटतं
मोरपिसावरचा डोळा
अजून तुझ्या रुमालाच्या चौपदरी घडीत
खरंच
डोळ्याच्या शब्दकोषात कितीतरी संदर्भ
—संदर्भहीन
अजाण निरागस
वाटेल तसे फाटलेले
कागदाच्या चिठोऱ्यांसारखे…

△

गझल

शशिकांत धर्माधिकारी

वेडाविती मला त्या, त्या शीर्ण पर्ण राशी
फुल सावरीचे जैसे, स्वप्ने उडून गेली
सांगु कुणाकुणाला, निशब्द जाहलो मी
जखमा उरीच माझ्या, टोचूनी रात्र गेली
मी गंध शोधला या त्या मतलबी जगाचा
त्या नाटकीपणाची मजला घृणाच आली
मी पाहतो इथे ही, नेते लुटारू होती !
युगधर्म आजचा हा, ते काक हंस होती
ते कोरडे उसासे, ते श्वास खण्डितांचे
जीवनाभूतीच माझी, केव्हा गळून गेली
शिशिराची पानगळ मी, कवटाळीतो उराशी
गुलमोहराचे फुलणे, मजला पसंत नाही.

△

अनुक्रमणिका

संदर्भ

जयश्री रूईकर

सारेच संदर्भ संपलेले आहेत
मध्यरात्रीच्या डांबरी रस्त्यासारखे
तरीही किडा वळवळतच आहे
अतृप्त आत्म्यासारखा
घिरट्या घालीत शोध घेत आहे ॥
कधीच कां गवसणार नाही किनारा
या निर्जन बेटावर ?
एकाकीच कां जगायचे आहे
तडफडणाऱ्या मासोळ्यांची
सोबत शोधत ? ॥
मी तर कधीच बांधली आहे कबर
आशा आकांक्षांची
फक्त शेवटची मूठमातीच द्यायला
शोधत आहे आधार कुणाचा तरी ॥
कारण आता सारेच संदर्भ
संपलेले आहेत
सारेच संदर्भ संपलेले आहेत. ॥

△

' सावलीवृक्ष '

हेमचंद्रजा

छेदलेल्या बाणानं हृदय चिरून गेले होते, तेव्हा–
मी पाहिलेला सावलीवृक्ष गळून पडलेला होता.
टाके मारून झाले पण सुईतच जंग होता–
त्या जंगाने सारा वृक्ष धनुर्वाताने पोखरला होता.
आशा होती पालवीची म्हणून मुळें
रोवत बसलो चिखलात–
तेव्हा चिखलातल्या जळवा अलगद,
मुळांना कुरतडत होत्या.
त्या सावलांची मूळं आता, तरंगत होती
दलदलीत तेलाच्या तवंगासारखी.
एक सुरी एक कातरी, इथली आगडोंब
प्यारी–प्यारी, फेकलेल्या–
सिगारेटच्या थोटकासारखी नुसती चटकाच देणारी.
तो गळलेला वृक्ष आता सरणाच्याच कामाचा आहे,
तेव्हा–
या रचणाऱ्या सरणाला, तुमच्याही ढिलप्यांचा
हात लावा.

△

तो आणि गुलमोहर

धर्मराज निमसरकर

प्रचंड मौन दिवसांच्या प्रदिर्घ सहवासात
काही पावसाळे, काही हिवाळे आणि बरेच उन्हाळे
उसासत घालविल्यानंतर,
त्याला वादळाने विस्कटलेल्या गुलमोहरांच्या झाडांचा
रस्त्याच्या आडोश्याने जीव मुठीत घेवून उभा असलेला
उदास थवा दिसला.
पावसाळ्यात पावसाच्या काही सरी त्याने
मनसोक्त अंगावर
लेवून घेतल्या, चित्र झालं म्हणजे आतले
वणवे कसे शांत
होतात युद्धविराम झाल्यासारखे
हाडं फोडून काढणारे हिमवारे सोडले तर
तिच्या उबदार
कुशीच्या स्पर्शाची अनिवार्य ओढ लावणारे हिवाळे
आता फक्त आठवणीत जमा.
जीव ओवाळून टाकावा तो फक्त गुलमोहरावरून
बाकी इतर सारे झाडं मुखवट्याच्या
काचघरात राहणारे
नको अशांची सोबत केव्हाही.
येथला मौसम असा वेड्या आहे की गुलमोहराचे झाडही
उदास दिसावे, ज्वालामुखीचा उद्रेक होवून तप्त लाव्हा
बाहेर पडावा आपले तप्त
खदखदणारे उग्ररूप घेवून तसंच ज्वालेचं धगधगतपण
लाभलं असतानासुद्धा. असे विनाशी ऋतू येथले.
ग्रीष्माच्या उन्हात जे होरपळून
निघतात त्यांना उन्हाचं क्रूरपण कळतं,
गुलमोहराने हा
शाप आपल्या त्वचेवर गोंदवून घेतला असावा.
या व्रतस्थपणाने त्याला वेडलावले
मौनाचे वणवे घेवून जगण्यातसुद्धा एक अफलातून
मस्ताटपणा असतो. जीवाची पर्वा नसते केव्हाही
आणि उद्याची आशा नसते.

△

शब्द असा हा : रसरेषांची अगणित नगरे !

उषा मा. देशमुख

जीवनलहरी* हा कुसुमाग्रजांचा पहिला कवितासंग्रह. पहिल्या आवृत्तीत केवळ ६० जीवनलहरींचा समावेश होता नंतरच्या म्हणजे इ. स. १९४९ मधील आवृत्तीत वाढ होऊन एकूण १४३ जीवनलहरींचा समावेश झाला व पुढे विशाखामध्ये एक व मराठीमातीमध्ये 'जीवनलहरी' याच मथळ्याखाली अकराकविता आल्या आहेत. या कवितेचे स्वरूप स्फुट असून अष्टचरणी बारा मात्रांचा एक चरण व तीन ते चार शब्दांची एक ओळ असे आहे. पहिल्या चार ओळीत काही वेळा एक विचार येतो व पुढील चार ओळीत कलाटणी साधली जाते. अर्थात सर्वच जीवनलहरी अशाच स्वरूपाच्या आहेत असा त्याचा अर्थ नाही. प्रत्येक जीवनलहरी स्वतंत्र आहे असे कवी म्हणत असला तरी तसे नसून ईश्वर, प्रणय, समाज, मानवी स्वातंत्र्य या मानवी जीवनाला व्यापणाऱ्या ताणांचे विविध धागे उलडण्याचा प्रयत्न येथे झाला आहे.

रविकिरण मंडळाच्या कवितेने माखलेला जो काळ होता त्या काळाचे आणि ध्रुवमंडळाचे एक 'स्मृतिचिन्ह' म्हणून कुसुमाग्रज ह्या काव्यसंग्रहाकडे बघत असले तरी त्यात कुसुमाग्रजांच्या कविव्यक्तित्वाची सारी मूलबीजे अनुस्यूत झाली आहेत. कुसुमाग्रजांची प्रतिभा प्रत्यक्षनिष्ठ आणि वास्तवाधिष्ठित आहे. ती वास्तवातील भावनाशयाचे, विचाराशयाचे प्रतिबिंब आपल्या शब्दमखरातून अभिव्यक्त करते. अतिशय सच्या आणि सकस अशा जाणीवांसह कविमन जाणतेपणाने आणि जागतेपणाने जीवनाचा अन्वयार्थ लावीत आहे. जीवनाचे अवलोकन करीत आहे. या जाणिवांमध्ये म्हणूनच तीव्रता आहे, भेदकता आहे. आणि काही वेळा कडवटपणाही आहे त्याचबरोबर अपरिपक्वताही आहे. एक एक जीवनलहरी म्हणजे विलग विलग असा जीवनविषयक वस्तुनिष्ठ विचार आणि वाचनांच्या माध्यमाद्वारे केलेला क्षितिजशोध आहे. आपल्याला जे जाणवते ते एकीकडे वस्तुनिष्ठ पद्धतीने आणि दुसरीकडे प्रातिनिधिक स्वरूपात अभिव्यक्त करीत जाणे हाच हेतू निर्मितीमागे प्रबळ ठरला आहे म्हणून जीवनलहरीतील मराठी भाषेचे बोली भाषेशी नाते नसून ती संस्कृतबद्ध झाली आहे. तिचा आशय आत्मलक्षी नाही म्हणूनच तिची भाषाही 'स्व'ची नाही, ती संस्कृत पारंपारिक प्रतीकांतून प्रवाही बनते. अर्थात कुसुमाग्रजांवरील संस्कार आणि अभिजात परंपरेशी असलेले जे नाते आहे, त्याचाच हा दाखला होय.

या पहिल्या संग्रहातील कवितेपासूनच एक आवाहनात्मक भूमिका कवीने स्वीकारलेली दिसते. स्वनिर्मिती आणि स्वकाळ यांचे योग्य भान कविमनाजवळ आहे. कवीच्या व्यक्तित्वाची सारी मूलबीजे काव्यातून प्रगट होत असून काव्यनिर्मिती हेच त्याच्या जीवनाचेही आश्रयस्थान झालेले आहे. समकालीन कवितेने निर्माण केलेल्या मळवाटेनेच कुसुमाग्रजांची कविता वाटचाल आरंभते तरीही स्वतःचे स्वत्व आणि अस्तित्व टिकवून ठेवते. आधुनिक कवितेच्या सर्व धारांशी आणि प्रवाहाशी या कवितेचे नाते असूनही ती पुन: स्वतंत्र आहे आणि जीवनसन्मुख आहे. वास्तव जीवनाच्या दर्पणातच कुसुमाग्रजांची कविता आपले प्रतिबिंब न्याहाळते. म्हणून ती आत्मलक्षी होत नाही तर संस्कृतिलक्षी होते. बहिर्मुखवृत्तीने कवी जीवनाचा वेध घेतो म्हणून कविताही बहिर्मुख

* पहिली आवृत्ती १९३३ दुसरी आवृत्ती १९४९, एकूण कविता १४३ + विशाखामध्ये १ + मराठी मातीमध्ये ११ = एकूण १५५ जीवनलहरी. कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, पृष्ठ संख्या ७२ किंमत, २ रु.

प्रत्यक्षनिष्ठ आणि अवलोकननिष्ठ बनत जाते. भोवतालच्या जीवनाशी, वातावरणाशी आणि वास्तवाशी समरसून जाण्याची वृत्ती हाच कवीचा मनोधर्म येथे स्पष्ट होतो.

पाण्यात खडा टाकला की तरंग निर्माण व्हावे तसे काही जीवनात परिवर्तन घडले की कविमनात तरंग उचंबळून येतात आणि कल्पनेच्या साह्याने ते अभिव्यक्त होतात. कुसुमाग्रजांचे अनुभव बहुकेंद्री झाले, बहुनिष्ठ आहे. कारण त्यांची प्रतिभा ही बहुकेंद्री स्वरूपाची आहे. म्हणून अविषय असा त्यांच्या कवितेत नसतो. जे जे जाणवते जे जे दिसते त्याच्या संदर्भातील आपली प्रतिक्रिया मनःपूतपणे अभिव्यक्त करण्याची प्रामाणिकता कुसुमाग्रजांच्या आजवरच्या कवितेने सांभाळली आहे म्हणून ती काही वेळा poetry of Statements च्या स्वरूपातही जाणवू लागते त्याला इलाज नसतो. व हेच तिचे सामर्थ्य असते आणि मर्यादाही ठरते. बोरकर, कांत, अनिल, रेगे तांबे मुक्तिबोध, माधवजूलियन, गिरीश, यशवंत, ना. घ. गु ह. देशपांडे, वा. ना. देशपांडे, कविवर्य बी इत्यादी समकालीन कवींची कविता मूलतः आत्मोद्‌गारी आणि आत्मलक्षी होती इतकेच नव्हे तर रविकिरण मंडळाच्या कवितेने तर कवितेलाच स्वयंकेंद्रित बनविले, खाजगी बनविले अशा काळात आणि परिस्थितीत मात्र 'ध्रुवमंडळा'च्या या कवीने सुटे विचार, सुटचा भावना आणि सुटचा कल्पना, सुटचा सुटचा भोवतालच्या घडणाऱ्या विषयांच्या साह्याने अभिव्यक्त करण्यास सुरवात केली.

ज्या काळात खंडकाव्य निर्मिती होत होती जे तिला विविध घुमारे फुटत होते अशा काळात अनेक चार शब्दांची एक ओळ आणि आठ ओळींची कविता लिहून कुसुमाग्रजांनी रसिकांना बुचकळचात टाकले. जो काळ प्रणय कवितेचा शिगेचा काळ होता त्याच काळात स्त्रीची क्रूरता, अप्रामाणिकपणा यावर कुसुमाग्रजांनी कोरडे ओढले. ज्या काळात मराठी कविता ही स्वातंत्र्याकांक्षी आणि दलितोद्धाराचा पवित्रा घेऊन वावरत होती व स्वतःला उदारमतवादी म्हणवून घेत होती (किंबहुना सर्वच मराठी साहित्य तसे होते) त्या काळात कुसुमाग्रजांनी स्वप्न व रात्र आणि दिवस व वास्तव यामधील विदारकता आणि भेदकता प्रगट केली. एका कलंदर जीवन प्रवासाची आणि पांथस्थाची भूमिका घेऊन गीतविहगांना आपल्या बरोबर येण्याचे आवाहन त्यांनी केले.

कुसुमाग्रजांच्या कवितेत संस्कृत प्रतीकांचे विशेष प्राबल्य आहे. स्फटिकाचे मंदिर, कुंजाची जाळी, अमर वसाहत, मानस कासार, जळत्या लाटा, चंद्रकिरणी चंद्रमुखी, मधुराणी, मेघांचा मंचक, माता मानवता, मधुगंध कुसुम, रक्षा, भस्मी डोळे, काष्ठ, भवचक्र, कंटकवन, लक्ष्मीचा अंक, दुर्वांकुर, मधुकविता, शब्दांची मखरे, पडशाळा, तेजाचा दावानळ, ज्योतींची झालर, अग्नीची असिधारा, अग्नीचे मृगजळ, संस्कृतीचा जलधी, गीतसुधा, धुनी, शब्दांचे कारागृह, कोसळणारे स्वर, मुक्तीचे आरक्त कमळ, क्रांतीचे रविकिरण, निळा एकांत, निराशेचे धुके, तिमिराचे तट, दाहक हृदय, ज्वालाप्रणय, निर्दय एकांत, जखमी रात्र ही सहज लक्षात येणारी प्रतीके आहेत. विविध संवेदनांच्या न्यासातून, संवेदना विरोधातून आणि संवेदना एकरूपतेतून निर्माण केलेली प्रतीके ही खास कुसुमाग्रजांची आहेत. त्यात पारंपारिक संस्कृत शब्दांचा भरणा असला तरी ज्या पद्धतीने संवेदनांचा न्यास प्रतीकातून साधला जातो त्यात एक त्व[illegible]चार-गती आहे, प्रास आहे आणि [illegible] 'जीवनलहरी'तील कवितेत [illegible]चारांच्या बाबतीत झाले आहे. भगवद्‌गीता, एकनाथ रामाची कविता, कालिदासाचे मेघदूत आणि [illegible]मर खय्यामची 'रूबाईत' यांचा फार मोठा संस्कार कुसुमाग्रजांच्या कविमनावर आहे. 'परित्राणाय साधुनां...संभवामि युगेयुगे' या गीतेतील श्लोकाचा अनुवाद जीवनलहरी (६६) मध्ये 'साधुंनारक्षया, दुष्टांना शास्त्राचा, संभव प्रत्येक युगी, झाला नव जगती या' असे केले आहे तर तुकारामाचा 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' या अभंगाचा संस्कार (६१) या जीवनलहरीत 'जावे जेथे तेथे तू माझा सांगाती, मार्गी जनसंमर्दी, विजनी वा एकांती' असे आले आहे. उमर खय्यामच्या रूबायांचे जे भाषांतर माधव जूलियन पद्धतीने केले होते त्याचाही परिणाम जीवनलहरीतील आहे. २६, २८, १३६ या प्रणयभावदर्शक कवितांवर आहे.

शब्दांवेग 'विशाखा' पासून पुढे जो गतिवेधी, नादासाह्यानेही अनुनासिके विशेषत्वाने कुसुमाग्रजांनी उपरसि[illegible]ली त्याचीही सुरवात जीवन लहरीपासूनच झालेली आहे. फडफडसी (५) तडफडसी (५)

तूनच अनुभव गोचर होत असतो. 'स्व'चा अनुभवच प्रातिनिधिक होतो आणि कवीचा अनुभव आणि रसिकाचा अनुभव यात कुठेतरी अतूट नाते निर्माण होते. 'विशाखा'मध्ये काळाचे आणि कवीचे इतके अलौकिक नाते जुळून आले आणि त्यामुळे लोकप्रियतेच्या कलाबाह्य मूल्यांमुळे कुसुमाग्रज प्रसिद्धी झगमगाटात आलेले असले तरी त्याची पूर्व परंपरा 'जीवनलहरी'त निर्माण झाली. युगधर्माच्या जाणिवा सलगपणे आणि एक संघपणे जीवनलहरीतून अभिव्यक्त झाल्या. जीवनलहरीमधील कवितेत उतरलेले विचारांचे जे गांभीर्य आहे ते वृत्तींचे गांभीर्य नसून केवळ विचारदर्शनाचे गांभीर्य आहे. जीवनाच्या तळापर्यंत पोहोचून त्यातून जीवनसत्याचे जाणवलेले रूप गोचर करण्याचा हा प्रयत्न नाही. 'जीवन सुंदर असून ते सुंदर करण्यातच संपून जाते कारण भवचक्र फिरत राहणार असून जीवन संगीताने भरून निघणार आहे. एक माणूस जाणे म्हणजे एका दिवसापुरती त्याची जागा रिकामी राहणे हे सुनेपण भवचक्रात लगेच भरून निघणार असते.

सप

त्याचा अर्थ ... जगणे आणि मरणे हीच कालचक्रांची असे कवी म्हणत असला तरी ... त असले समाज, मानवी स्वातंत्र्य या मानवी जीवनाला माझी णाऱ्या ताणांचे विविध धागे उलडण्याचा प्रयत्न ... झाला आहे.

रविकिरण मंडळाच्या कवितेने माखलेला जो काळ होता त्या काळाचे आणि ध्रुवमंडळाचे एक 'स्मृतिचिन्ह' म्हणून कुसुमाग्रज ह्या काव्यसंग्रहाकडे बघत असले तरी त्यात कुसुमाग्रजांच्या कविव्यक्तित्वाची सारी मूलबीजे अनुस्यूत झाली आहेत. कुसुमाग्रजांची प्रतिभा प्रत्यक्षनिष्ठ आणि वास्तवाधिष्ठित आहे. ती वास्तवातील भावनाशयाचे, विचाराशयाचे प्रतिबिंब आपल्या शब्दमखरातून अभिव्यक्त करते. अतिशय सच्या आणि सकस अशा जाणीवांसह क... वता

* पहिली आवृत्ती १९३३ दुसरी ... गोळा'
१९४९, एकूण कविता १४३ + विशाखामध... ध्वीच्या
मराठी मातीमध्ये ११ = एकूण १५५ जीव... मस्तक
कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, पृष्ठ संख्या ७२ ... त झरे,
२ रु. ... असे

होत गेलेले दिसतात. माणसाची सार्वजनीन सुखदुःखे निदर्शनाला आणून देण्याचा प्रयत्न जीवनलहरीतील कवितेतून घडली त्याचे अधिक भरीव रूप 'विशाखे'तील कवितेतून आढळते, एखादा निर्झर सरितेला जाऊन मिळतो. सरिता समुद्राला जाऊन मिळते. समुद्रातील पाणी मेघात जाऊन स्थिरावते असा सृष्टीतील जीवनक्रम अधिकाधिक विशाल होत जातो पण मानवी जीवन मात्र अधिक बंधनात साकळत गेलेले जाणवते. (७४).

जीवनलहरीतील काही कवितातून जसा मानवतेवरील निष्ठेचा आणि स्वातंत्र्य, समता या मूल्यांचा अंकुर रुजला गेला त्याचप्रमाणे प्रणयाचे दुहेरीरूपही जोपासले गेले. एकीकडे उत्कटपणे परस्परांनी परस्परांवर केलेले प्रेम आणि वास्तवातील क्रूरता, फसवणूक आणि खोटेपणा यामधील व्यथा आणि वेदना टिपलेल्या अनेक जीवनलहरीही या संग्रहात आहेत. प्रेमाचे रूपांतर भक्तीत आणि अंतिमतः कटुतेतही झालेले आहे. तसेच जीवनातील अस्थिरता, प्रश्नात्मकता, आशानिराशात्मकता, ईश्वराच्या अस्तित्वविषयीची संभ्रमितावस्था यांचेही दर्शन जीवनलहरीतून घडते. म्हणून 'जीवनलहरी'चे स्वरूप संमिश्र झाले. त्यात कोणतेही एक सूत्र नाही तर जीवनाविषयीच्या अनंत क्रियाप्रतिक्रिया व कविमनाची अपरिपक्वावस्था त्यातून गोचर होते. परंतु पुढे कुसुमाग्रजांचा काव्यसंचार जो फळला फुलला आणि विस्तृत झाला त्याचे मूळ धागे मात्र 'जीवनलहरी'मध्ये विणले गेले. काही गाठी ... वक्या पडल्या ! पुढे काही उसवल्या गेल्या परंतु एक ... ध्यैठक, जीवनविषयक विशिष्ट दृष्टिकोण, स्वप्न मन... वास्तव यांनी मर्यादित झालेला जीवनानुभव का... दिवस आणि रात्र, लौकिक आणि अलौकिक यात परिभ्रमण करणारा जीवनाशय आणि त्याच्या अभिव्यक्तीसाठी भरून आलेले कविहृदय यांची प्रतीती निश्चितच 'जीवनलहरी'मधून घडत जाते. आणि वाचक हा अधिक अचूकपणे कुसुमाग्रजांचा पुढील काव्यप्रवास न्याहाळू लागतो.

स्वनिर्मितीची जाणिवपूर्णता आणि आशयगर्भ विचारांची विविधता 'जीवनलहरी'त निश्चित झालेली आहे. कुसुमाग्रजांच्या वाङमय निर्मितीतील स्थित्यंतरे आणि परिवर्तने यांचे प्रतिभेच्या मूलकेंद्राशी जे नाते आहे त्याचे स्पष्ट चित्र जीवनलहरीतून प्रगट झाले.

कुसुमाग्रजांची समाजमग्नता, राजकारण मग्नता आणि सांस्कृतिक मूल्यांच्या संदर्भातील विचारमग्नता जी त्यांच्या संपूर्ण कवितेतून आजवर गोचर झाली तिचे पूर्ण—रूप जीवनलहरीत जोपासले गेले. मानवीजीवनावरील अपार श्रद्धा, ईश्वराच्या कर्तृत्वाविषयीची साशंकता, प्रणयातील तारुण्यसुलभ जमाखर्च आणि स्वातंत्र्याविषयीची आकाशगर्भ अशी अपेक्षा, जीवनाच्या संदर्भात आणि भविष्यकाळाच्या संदर्भात कमालीची आशावादी भूमिका आणि कडवटपणा, कटुता यापेक्षा दुर्दम्य उत्साह आणि ध्येयवादाने भरून ओसंडणारे कविमन जीवनलहरीत जाणवते आणि तेच अधिक समृद्धपणे पुढील काळातील कवितांतूनही अभिव्यक्त झाले आहे.

कुसुमाग्रजांच्या नंदनवनात मानवतेला, करूणेला, स्वातंत्र्याला आणि सामाजिक समानतेला अनन्यसाधारण स्थान आहे. 'स्वप्नातील परि माझ्या पैल असे नंदनवन' असे ते म्हणतात. जीवनाविषयी उदासीनता कुसुमाग्रजांच्या कवितेत कुठेही स्पर्शत नाही किंबहुना जीवनासाठी त्यांनी योजिलेली जो विविध प्रतीके आहेत त्यावरूनही जीवनवादी दुर्दम्य आशावादाचा पुरस्कार करण्यासाठी आणि सुंदर भविष्याला सन्मुख होण्यासाठी सतत तत्पर असणे कुसुमाग्रज मंजूर करीत जातात. जीवनसंगीत (२) जीवनफुल (४) जीवन सरिता (७) जीवन कण (९) जीवन जळ (३४) जीवन लहरी (४१) जीवन समरांगण (७०) जीवन जलधी (७३) अशा विविध दृष्टीने जीवनाला न्याहाळणे व अनुभव व्यक्त करणे ही कुसुमाग्रजांच्या काव्यनिर्मितीची निर्मिती प्रक्रिया लक्षात घेतली म्हणजे समजून येते की कुसुमाग्रज जीवनाच्या संदर्भात अनेक अंगांनी विचार करतात व हा विचार कल्पकतेच्या साह्याने कधी चमत्कृतिपूर्ण पद्धतीने तर कधी प्रश्नात्मक पद्धतीने अभिव्यक्त करीत जातात.

वींच्या कवितेतील चिंतनशीलता कुसुमाग्रजांच्या विचार दर्शनात येत नसते. केवळ मनावर आघात प्रत्याघात करीत जाणे ही त्यांच्या निर्मितीची घडण असते. विचार दर्शनाची परिसीमा तात्पर्य निर्मितीत होते. उदा. जीवन नवसुंदरता सुंदर होण्यात असे (१) किंवा क्षुद्रांच्या बाजारी क्षुद्रतेस मोल चढे (५) किंवा शृंखलाच क्षुद्रांना थोर अलंकार गमे (१०९) अशी तात्पर्ये काढण्याचा मोह कवीला आवरता येत नाही. विचारांची मुक्त पखरण किनखापी शब्दांच्या मखरात बसवून जीवनलहरीतील कविता वाटचाल आरंभते. तृणाचे पाते आणि हिरव्या नवदुर्वांकुरातह 'पुढती तो पाय पडे. आता जाणार पुढे' अशी सागरकांक्षी आणि क्षितिजभेदी दुर्दम्य आकांक्षा भविष्याविषयी कुसुमाग्रज बाळगून आहेत. त्यांच्या कवितेचा उष:काल त्यांना माध्यान्हविरहित असाच जाणवतो आहे. विचारदर्शनातही एक ठाशीवता आहे, जोरकसपणा आहे; आवेश आहे व कृत्वाधिष्ठितता आहे. म्हणून उपमाने एकीकडे पारंपारिक पद्धतींची जाणवत असतात तर दुसरीकडे भव्यतेकडे विशालतेकडे झुकत असतात. संस्कृतीनेच ज्यांना भव्य आणि उदात्त आशय दिला आहे अशी प्रतीके जमिनीत बी रूजून अंकुर फुटावा इतक्या स्वाभाविकपणे कुसुमाग्रजांच्या कवितेत येत असतात.

कुसुमाग्रज विविध जीवनांगांवर भर देत असल्यामुळे जीवनातील विविध भावताणांचे आणि आकृतिरूपांचे (compositions) युनिट्स निर्माण झालेत. शिरवाडकरांच्या 'आहे आणि नाही,' 'प्रतिसाद' आणि 'विरामचिन्हे' यामध्ये जसे स्वैर विचारचिंतन आले आहे तसेच काहीसे रूप 'जीवनलहरी' तील स्वैरविचारांच्या बाबतीत झाले आहे. भगवद्‌गीता, तुकारामाची कविता, कालिदासाचे मेघदूत आणि उमर खय्यामची 'रूबाईत' यांचा फार मोठा संस्कार कुसुमाग्रजांच्या कविमनावर आहे. 'परित्राणाय साधुनां...संभवामि युगेयुगे' या गीतेतील श्लोकाचा अनुवाद जीवनलहरी (६६) मध्ये 'साधुंनारक्षया, दुष्टांना शास्त्राचा, संभव प्रत्येक युगी, झाला नव जगती या' असे केले आहे तर तुकारामाचा 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' या अभंगाचा संस्कार (६९) या जीवनलहरीत 'जावे जेथे तेथे तू माझा सांगाती, मार्गी जनसंमर्दी, विजनी वा एकांती' असे आले आहे. उमर खय्यामच्या रूबायांचे जे भाषांतर माधव जूलियन यांनी केले होते त्याचाही परिणाम जीवनलहरीतील २५, २६, २८, १३६ या प्रणयभावदर्शक कवितांवर झाला आहे.

'विशाखा' पासून पुढे जी गतिवेधी, नादानुकारी अनुनासिके विशेषत्वाने कुसुमाग्रजांनी उपयोजिली-त्याचीही सुरवात जीवन लहरीपासूनच झालेली. आहे. फडफडसी (५) तडफडसी (५)

झुळझुळती (८) लखलखती (९) धगधगती (३७) करकरती (१२०) घणघणती (१४२) ही ती सर्व गतिमान, प्रवाही ध्वन्मानुसाठी अनुनासिके होत. तसेच प्रतीक योजनेतही विविध संवेदनांचे साधर्म्य किंवा संवेदेना वैधर्म्य यामुळेही कुसुमाग्रजांच्या शब्दकळेला एक वजन आणि गहिरेपण प्राप्त झालेले असते. त्यातही अनुप्रासाला विशेष प्राधान्य मिळालेले असते. उदा. तान्यांचा ताटवा किंवा माता मानवता हे होत. कधी कधी संवेदना साधर्म्य अग्नीची असिधारा किंवा प्रणयाचे विद्युतकण, मखमली पर्ण, स्वप्नांची रातफुले संसृतीचा जलधी, निर्दय एकांत, तिमिराचे तर, अशा स्वरूपात येतात. तर कधी सवेदना वैधर्म्यातून आशय अभिव्यक्त होतो उदा. स्फटिकाचे मंदिर, शब्दांचे कारागृह, उदास स्वर, जळत्या लाटा, ज्योतींची झालर, आशांची होमधुनी, वगैरे. कधी पार्थिव अपार्थिवाचा व्यास साधला जातो उदा. सुंदर स्तब्धता जखमी शोधकता, कोसळणारे स्वर, माता मानवता, मरणाची रहदारी इत्यादि. केवळ वरील काही जीवनलहरीत आलेल्या प्रतीकांवरून एक गोष्ट निश्चित होते म्हणजे कुसुमाग्रजांच्या समृद्ध कवि मनाची सुसंस्कृतता, अभिजात रसिकता आणि अभिव्यक्तीची प्रामाणिकता हेच कुसुमाग्रजांच्या कवितेचे एका अर्थाने आत्मबळ आहे आणि त्याचे पहिले कोवळे किरण प्रकाशमान झाले ते जीवनलहरीत ! एका जागरूक मनाचे समष्टीसह अभिव्यक्त झालेले सहस्पंदन असे रूप 'जीवन लहरी'तील कवितेला आले, असले तरी कवीची भूमिका मात्र एका प्रवासीची आहे. पथिक, पान्थ, रहिवाशी, वाटसरू पान्थस्थ अशी असून गीत विहग (५२,६१) त्याचा या प्रवासात संगत सोबत करीत आहेत. हा प्रवास आकाश आणि जमीन यांना सांधणारा प्रवास आहे. या प्रवासात दिवस आणि रात्र, स्वप्न आणि वास्तव, श्रेयस् आणि प्रेयस् यातील विविध ताण आहेत. वास्तवाच्या चटक्यातून आणि प्रणयाच्या तिखट माध्यान्ह-काळानंतर सायंकाळ आणि रात्र येणार असते त्याच रात्रीत कुसुमाग्रजांचे नंदनवन सुरूप होत असते, आकारास येत असते. अशा रात्रीतच एक कलंदर (१२२) पुनः प्रवासाला निघत असतो. कुसुमाग्रजांच्या संपूर्ण कवितेतच मुळी रात्र आणि दिवस, कल्पना आणि वास्तव स्वप्नांची सुकुमारता आणि वास्तवातील दुःख झालर हे विरोध ताण प्रभावी ठरत असतात. त्यांची सुरवात 'जीवन लहरी'पासून झाली ही गोष्ट तितकीच खरी आहे ! 'जीवन 'लहरी'पासून कुसुमाग्रजांची कविता सुंदर भविष्याची स्वप्ने निरखू लागली. आशावादी भूमिकेतून जीवनाला सामोरी जाऊ लागली. भोवतालच्या जगाला साजिवंत करण्याचा प्रयत्न कुसुमाग्रज जीवनलहरीत करू लागले.

△ △ △

तुकारामशंभुकृत ‘ बसवपुराण ’

राम तोंडारे

महाराष्ट्रातील वीरशैव संतकवीनी महात्मा बसवेश्वर आणि इतर शिवशरणांची चरित्रे मराठी भाषेतून गायिलेली आहेत. परंतु याची दखल मराठी साहित्य संशोधकांनी फारशी घेतलेली दिसून येत नाही. संत मन्मथस्वामी, संत शिवदास, संत लक्ष्मण महाराज, गुरुदास, शंकरमृगेन्द्र इत्यादी कवींनी अभंगवाङ्मयातून म. बसवेश्वरांचे चरित्रगान मोठ्या श्रद्धेने आणि भक्तिभावनेने केलेले आहे. आपल्या रचनेतून म. बसवेश्वरांच्या भक्तिविचाराचा, तत्त्वविचाराचा हे संत गौरवाने उल्लेख करतात.

महाराष्ट्रातील वीरशैव संतकवींनी कथाकाव्याची निर्मितीही केलेली आहे. अल्लमप्रभूंच्या चरित्राचे दर्शन ब्रह्मदासांनी ‘लीला विश्वंभर’ या ग्रंथातून घडविलेले आहे. हा ग्रंथ त्यांनी शके १६४४ मध्ये पूर्ण केला[१] शके १७३० मध्ये संत शिवदासांनी ‘सिद्धेश्वर पुराणा’ची रचना केली.[२] यानंतर चोवीस वर्षांनी म्हणजेच शके १७५४ मध्ये त्यांनी ‘बसवपुराणा’ची रचना पूर्ण केली. शिवदासांचा हा महत्त्वपूर्ण ग्रंथ अद्याप प्रकाशित झालेला नाही. शिवशरणांच्या चरित्रकथा मराठीत आणणारा यानंतरचा कवी म्हणजे पंचाक्षरी स्वामी होय. यांनी ‘सिद्धेश्वरपुराण’ आणि ‘प्रभुलिंगलीला’ या कथाकाव्यांची निर्मिती केली.[४] याही रचना अद्याप प्रकाशित झालेल्या नाहीत. याच काळात म्हणजे शके १८३९ मध्ये तुकारामशंभु यांनीही ‘बसवपुराणा’ची रचना केलेली आहे. तुकारामशंभूंच्या काळात संस्कृतमधील व्यासोक्त बसवपुराणाचे प्रकाशन झालेले होते. सोलापूर येथील “वीरशैवलिंगीब्राह्मणग्रंथमाले”तून कै. म. ब. वारद यांनी मराठी भाषांतरासह प्रकाशित करून हा ग्रंथ मराठी वाचकांसमोर आणला.[५] या व्यासोक्त ‘बसवपुराणा’च्या आधारानेच तुकारामशंभूंनी आपल्या मराठी ‘बसवपुराणा’ची रचना केलेली आहे. यासंबंधीचा उल्लेखही त्यांनी केलेला आहे. तो असा :

> “ श्रीमंत वारद अप्पांनी ।
> व्यासकृत बसवपुराणी ।
> टिका करविली तो आधार करूनी ।
> ग्रंथ केला समाप्त ॥ ” (अ. ४३–७३)

तुकारामशंभूंनी व्यासोक्त ‘बसवपुराणा’चा आधार घेऊन आपला मराठीतील ओवीबद्ध ग्रंथ रचलेला असला तरी या व्यासोक्त ‘बसवपुराणा’संबंधीची उल्लेखापलिकडे कुठलीही माहिती आपल्या ‘बसवपुराणा’मध्ये त्यांनी नोंदविलेली नाही. व्यासोक्त ‘बसवपुराणा’ची रचना कोणत्या कालखंडात झाली? कोणत्या ‘बसवपुराणा’च्या आधारे झाली? की स्वतंत्ररीत्या झाली? या बाबतीत तुकारामशंभूंच्या या ‘बसवपुराणा’तून आपल्याला माहिती मिळत नाही. डॉ. एस. सी. नंदीमठ हे संस्कृतचे थोर अभ्यासक आहेत. परंतु त्यांनीही ‘संस्कृत बसवपुराणां’चा विचार करताना. व्यासोक्त ‘बसवपुराणा’च्या रचनाकाळाच्या संदर्भात “The date of the purana cannot be determined definitely, but it is clear that it was composed after the fourteenth century ”[६] एवढेच सांगितलेले आहे.

तुकारामशंभु कोठील कोण ?

आपल्या ‘बसवपुराणा’तून स्वतःबद्दलची थोडीशी माहिती तुकारामशंभूंनी सांगितलेली आहे. त्यांच्या जीवनचरित्रासंबंधी आणि गुरुपरंपरेसंबंधी सविस्तर अशी माहिती मात्र अद्यापी उपलब्ध झालेली नाही. या ग्रंथाच्या शेवटच्या अध्यायात आपले गात्र आणि आईवडिलांच्या नावाची नोंद त्यांनी केलेली आहे ती अशी :

शंभु म्हणे पिता तुकाराम ।
जो ज्ञानियमाजी श्रेष्ठ परम ।
माता शिवम्मा निःसीम ।
होती पतिपद भजनानुरक्त ।
स्वर्नलापासोनी दुरी ।
पूर्व भागी त्रिगव्युतिवरी ।
निजाम हद्दीत काटगाव नगरी ।
हरिणी तिरी असे पैं ॥
(अ. ४४–९१, ९२)

त्यांच्या आईचे नाव शिवम्मा, वडिलांचे नाव तुकाराम आणि गाव, सोलापूरजवळील हरिणी नदीच्या काठी वसलेले काटगाव असा स्पष्ट उल्लेख वरील ओव्यांमधून ते करतात. या ग्रंथात ते आपल्या नावाबरोबर आपले वडील तुकाराम यांचाही उल्लेख करतात.

तुकारामशंभूंचे गुरु कोण ? या बाबतीत माहिती उपलब्ध होत नाही. या ग्रंथातून त्यांनी श्री प्रभूंचा जो वारंवार उल्लेख केलेला तो मात्र लक्षात घेण्यासारखा आहे. हा उल्लेख तुकारामशंभू मोठ्या आदराने करतात. आपल्या 'बसवपुराणा'च्या रचनेची प्रेरणा आणि स्फूर्ती श्री प्रभूंनीच दिली. वारंवार प्रोत्साहन देऊन या ग्रंथलेखनात आपल्याला मदत श्री प्रभूंनींच केली. म्हणूनच आपण ही बसवपुराणाची रचना पूर्ण करू शकलो असे त्यांनी म्हटलेले आहे. श्री प्रभूंनी आपल्या मस्तकी कृपाहस्त कसा ठेवला आणि आपण लेखणी हाती घेऊन ग्रंथलेखनाची सुरूवात कशी केली या घटनेचे वर्णन ते करतात ते असे :

"पंचपंच उषःकाली । बैसलो असता शयनस्थली ।
प्रभूमूर्ति तै प्रसन्न देखिली । नम्र झालो पदी तैं ॥
मस्तकी कर ठेवुनी । अदृष्य झाले प्रभू तत्क्षणी ।
अभिप्राय जाणोनि लेखणी । घेतली हाती बळेची ॥
नाही शास्त्र व्युत्पत्ती । न जाणे जी काव्यमहती ॥
प्रभूपद सारसी धरोनि चित्ती ।
लिहित सुटलो भरारा ।" (४३–५५,५६,५७)

या उल्लेखावरून हे 'प्रभू' तुकारामशंभूंचे गुरू असावेत असे आपल्याला वाटते. याच ग्रंथातील श्री प्रभूंच्या संबंधीचे पुढील उल्लेखही या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहेत.

"गात ठालो–प्रभुनामःवली ।
पाटी धवोनि अक्षरे लिहिली ।
चुकता कर्णी स्फूर्ति दिली ।
लिहिताना सहस्रदा ॥ (अ. ४३–७)
प्रभूने दिलेल्या वाक्पुष्पांनी ।
पूजिली पदे तयाची ॥ (अ. ४३–९३)
मज कथामृत ओगराया ।
मज दर्वी करी प्रभुराया ॥" (अ. १–२४)

श्रीप्रभूसंबंधीचे असे उल्लेख या ग्रंथात वारंवार येत असले तरी आपले गुरू श्री प्रभू आहेत असे तुकारामशंभूंनी मात्र म्हटलेले दिसत नाही. म्हणून वरील उल्लेखांवरून श्रीप्रभू हे तुकारामशंभूचे गुरू असावेत असे वाटत असले तरी पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्याशिवाय ठामपणे निष्कर्ष मात्र काढता येत नाही.

ग्रंथरचनेचे उद्दिष्ट :

तुकाराम शंभूंनी आपल्या 'बसवपुराणा'त ग्रंथरचनेचा हेतू स्पष्ट केलेला आहे. शिवभक्तांच्या कथागायनाने आपली वाणी पवित्र करून स्वतः पावन होणे, कर्नाटकातील वीरशैव भक्तांच्या कथा मराठी भाषेतून सांगून त्यांच्या भक्तिमय, त्यागमय आदर्श जीवनचरित्राचा परिचय महाराष्ट्रियांना करून देणे आणि त्यातून वीरशैव तत्त्वज्ञानाचे दर्शन घडविणे असे त्रिविध उद्दिष्ट या ग्रंथरचनेमागे आहे.

"भक्तकथा ही स्वर्धुनी ।
मुळीच आहे पावन जनी ।
तिच्या गायने मलिन वाणी ।
व्हावी पवित्र हेतू हा ।" (अ. ४२–८)

असा पावन होण्याचा हेतू ते सांगतात. याच बरोबर ही "महत्तम शिवभक्ती । बाणो वीरशैवा संप्रती" अशीही त्यांची इच्छा आहे. वीरशैवांचे हे कथाभांडार आत्तापर्यन्त कानडी आणि संस्कृत भाषेतच बंदिस्त असल्यामुळे या दोन भाषा न येणाऱ्या मराठी माणसाला. या भक्त कथांपासून वंचित राहावे लागले. ही अडचण दूर करून महाराष्ट्रियांना हे कथाभांडार उघडे करून द्यावे हे तुकारामशंभूंच्या लेखना मागचे मुख्य उद्दिष्ट आहे. ते म्हणतात :

"वीरशैवांचे भांडारागर । ऐसा हा जो ग्रंथ पवित्र ।
याचा सर्वत्र प्रसार । करी देवा म्हणोनी ॥
हे गुप्तधन आजवरी । संस्कृत वा कानडी भीतरी ।
म्हणोनि वीरशैव तत्त्वे श्रवणावरी ।

न येतीच सहसा ।।
त्यातोनि शुद्ध मराठिया ।
भक्तिरहस्य पारखे व्हाया
कारण हेचि या वाचुनिया ।
अन्य कोणते नसेचि ।।"
(अध्या. ४३–५३, ७४, ७५)

भक्तकथेसि गोड करणे, म्हणणे हेचि लाजिरवाणे

बसवपुराणाची कथा ही स्वतः अंगभूतच पावन आहे, पवित्र आहे आणि गोडही आहे. अशी तुकाराम-शंभूंची श्रद्धा आहे. या परमपावन कथागंगेच्या पाण्यात स्नान करून आपण पवित्र व्हावे. ही कथा म्हणजे मिष्ठान्न आहे याचे सेवन करणारा पुष्ट होणारच. एवढेच नव्हे तर ह्या "भक्तिकथेची रसगोडी" अमृताहूनही अधिक आहे. अमृताहून अधिक माधुरी अंगभूतच असणाऱ्या या भक्तकथेला निवेदनाच्या कला-कुसरीची, निरूपणाच्या शैलीची मुळीच आवश्यकता नाही. या मधुर कथेला कथनकौशल्याने मांडणे, निवेद-नाने सजविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे अमृताला साखरेने गोड करण्याचा प्रयत्न करण्यासारखेच आहे. हे तुकारामशंभूंचे कथामाहात्म्यगान मुळातूनच पाहाण्यासारखे आहे. त्यातील काही भाग असा :

"अमृताचे मधुर गरे ।
कासया तया शर्करा ।।"(अ. ४२–५)
"स्वयंप्रकाश असे रवि ।
दाविजेल काय दीपाकरवी ।।" (४२–६)
"तेवि भक्त कथेसी गोड करणे ।
म्हणणे हेचि लाजिरवाणे ।
साखरेअंगी उटणे ।
लाविजे कोणते गोड पैं ।।" (अ. ४२-७)
भक्तकथा ही स्वर्धुनी । मुळीच आहे पावन जनी ।
तिच्या गायने मलिन वाणी ।
व्हावी पवित्र हेतू हा ।।" (अ. ४२–८)

सजलो देवा भक्तपूजनी :

पवित्र, पावन अशा भक्तकथेबद्दलची आदराची भक्तीची आणि श्रद्धेची भावना तुकारामशंभूंच्या ठिकाणी असल्यामुळे ह्या पावन पवित्र कथारचनेचे श्रेय ते स्वतःकडे न घेता परमेश्वरालाच देतात. परमेश्वरच प्रेरणा देणारा आणि आपल्याकडून लिहून घेणारा आहे, आपण निमित्तमात्र आहोत. आणि म्हणूनच ते पुन्हापुन्हा विनम्रपणे परमेश्वराला

"मन बुद्धयादि इंद्रिये ।
याचा स्वामी तूचि स्वये ।
काष्ठ बाहुल्या सूत्राश्रये ।
तेवि मम सूत्र तव हस्ती ।।" (अ. १०–४)
"तू जैसा बोलविशी ।
तैसाचि बोलेन यशोराशी ।।"(अ. १०–६)
"म्हणोनि गा देवराया ।
जिव्हास्थान बैसावया ।
देवोनि सजलो गावया ।
वैसे देवा कृपाला ।।" (अ १८–१२)
"जितुके स्फुरविसी मनी ।
तितुकेची लिही लेखणी ।" (अ. २५–३)
"तव–चरणांबुज वंदुनी ।
देशी तैशा वाक्पुष्पांनी ।
सजलो देवा भक्तपूजनी ।
समर्थ करीत दयाला ।।" (३७–२)
"हाती घेतलो लेखणी ।
साहित्य पुरवी शूलपाणी ।" (३९–५)
अशी विनवणी करतात.

ग्रंथातील कथावस्तु :

तुकारामशंभूंचे हे 'बसवपुराण' व्यासोक्त 'बसवपुराणा'च्या आधारे रचलेले असल्यामुळे यातील अध्यायाची संख्या त्रेचाळीसच आहे आणि प्रत्येक अध्यायाच्या शेवटी "इतिश्री बादरायणमहर्षिप्रणिते श्री बसवपुराणे कुमारगस्त्यसंवादे...तुकारामसुनुशंभु-कृत...अध्याय गोड हा" असा उल्लेख ते करतात. या ग्रंथाची ओवीसंख्या ५९५२ आहे. ग्रंथाची सुरुवात श्रीगणेश, सरस्वती, श्रीगुरु, कुदैवत आणि शिवगण यांच्या नमनाने झालेली आहे या देवतांच्या नमनातून आपल्याला भक्तकथा गायला स्फूर्ति मिळावी अशीच विनवणी त्यांनी या देवतांच्या चरणी केलेली आहे. "शिवकथोल्हास जाणसी पूता। म्हणोनि वाहिला पदी माथा" असे ते गणेशाला उद्देशून म्हणतात तर "करू सजलो ईशस्तवन । बोलविशी तैसे बोलेन" असे सरस्वतीला म्हणतात.

या ग्रंथातील त्रेचाळीस अध्यायातून येणारे कथा-विषय असे : अगस्ती प्रश्नकथन (१), नारदप्रश्न,

शिवाज्ञा (२), नंदीव्रतयुक्त मार्दबागर्भ वर्णन (३); बसवजन्म (४), कर्मनिरास, (५), ब्राह्मणमत–खंडण (६), कर्मनिरसन (७), बसवेश्वर गंगाम्बा विवाह आणि संगमेशदर्शन (८), बसवेश्वराला मंत्रीपद मिळते (९), बसवेश्वर बिज्जलाला नीती सांगतात (१०), चन्नबसव बसवेश्वरांची स्तुती करतो (११), प्रभुदेव बसव भेट (१२), प्रभुदेवप्रभावाख्यान(१३), बसवाने संगमेशांना ललाटाक्षि दिल्याची कथा, चोरांचे मनपरिवर्तन, बल्लेश–काटकूट कथा (१४), गोपीकथा (१५), पांड्य राजा–मंत्री यांची कथा, गंगांबिका वेश्येला लुगडे देते. (१६), मुग्धसंगय्या, रूद्रपशुपती आणि बिज्ज महादेवी यांच्या कथा (१७), कोळूर-कन्येची भक्ती (१८), कलियारू भक्ती (१९), नाट्यनमितंडी, कन्नपदेवकथा (२०), मादिराज–चरित्र (२१), मडिवाळ माचिदेवकथा (२२, २३), शंकरदासमय्या(२४), श्रीयाळ, निवांबा कथा (२५), निरुमिंडदेवकथा (२६), कडवलनंबी, गुग्गुलकलियारी' अरुवालु, अतिभक्त, एणाधिनाथ, चेदिराज, करयूर चौडार्य, कलियंब, इरुवदांडारि, दंगुलिमार, गणपाल, गुंडार्य, पूसल नैनारू यांच्या कथा (२७), किन्नरी ब्रह्मय्याची कथा (२८), कलकेत ब्रह्मदेव, मोळिगे मारय्या यांच्या कथा (२९), कन्नदब्रह्मय्या, मुपिणी चौडार्य–कथा (३०), सुरीय चौडार्य, आंध्रब्रह्मार्य कथा (३१), एकांतरामय्या, पिल्ल नयनारू, नमिनंद-कथा (३२), कोलुरी ब्रह्मा, देवरदासदेव यांच्या कथा (३३), नाचिदेव, वैजम्वा कथा (३४), सोड्डळ वाचय्या, अघर्मा, वीरशंकर यांच्या कथा (३५), मंचण्णापंडित कथा (३६), शिवनागभक्त, माचला-सुंदरी, नळराज, श्रीपतीपंडित, शिवचित, बिब्बबाच, श्वपच (३७), उद्‌भट, भोगभक्त यांच्या कथा(३८), बसवेश्वरांच्या सान्निध्यातील शिवशरणांची नावे(३९), एलेश केतार्य, नाचिदेव कथा (४०), अल्लम, मधुप यांचे डोळे काढले जातात (४१), बसवेश्वरानंतर शिवभक्ती वाढविणाऱ्यांची माहिती (४२), बसव-पुराणमाहात्म्य वर्णन (४३).

या सर्व शिवशरणांच्या, भक्तांच्या कथा बस-वेश्वरांच्या व्यक्तिमत्वाशी निगडित अशा आहेत. एका एका उपकथेतून बसवेश्वरांच्या जीवनातील एखादी घटना, प्रसंग किंवा स्वभावच्छटा साकार होताना दिसते ही कथागुंफण लक्षणीय अशी आहे.

श्रोता–वक्ता संवाद

व्यासोक्त बसवपुराणाची कथा कुमार–अगस्ती यांच्या संवादातून साकार झालेली आहे. कुमारस्वामी वक्ता आणि अगस्ती श्रोता. या दोघांचे भावबंधही मधून मधून व्यक्त झालेले आहेत. याच प्रमाणे तुका-राम शंभूही मधून मधून श्रोत्यांचा गौरव करतात, त्यांचे अवधान मागतात.

"ऐका हो ऐका सज्जन ।
भक्तकथा जी परम पावन ।।"
"यावरी श्रोतिये सावधान ।
कथा ऐकावी परमपावन ।।"
"श्रोतिये सादर व्हावे ।।
भक्तकथामृत पान करावे ।।"

अशा प्रकारे श्रोत्यांना सावध करून त्यांचे लक्ष कथे-वरून ढळू नये याची काळजी तुकारामशंभू घेतात. यासाठी मधून मधून कथेची महती सांगून पुढील अध्यायातील कथेची सूचनाही देतात आणि श्रोत्यांची उत्कंठा वाढवितात.

"पुढिलिया अध्यायी ।
नंदिश्वराची अवतार नवाई ।"
(अ. २–६३)

"बसवेश्वराचे जन्मकथन ।
ते पुढिलिया अध्यायी जाण
ते कथामृत परम पावन ।
करील संत सज्जना ।।"
(अ. ३–१५१)

याचप्रमाणे मागील कथानुसंधान साधून एखाद्या उपकथेचे सूत्र मुख्य कथेच्या ओघात जुळवून टाकतात. अशा प्रकारे श्रोत्यांचा गौरव करीत, त्यांचे अवधान मागत, मागील कथेचा संदर्भ जुळवीत जुळ-वीत आणि पुढील कथेची आकर्षकपणे सूचना देत देत देत तुकारामशंभू 'बसवपुराणा'ची कथा गुंफताना दिसतात.

तुकारामशंभूंनी आपल्या या ग्रंथातून मधून मधून कथश्रवणाची, कथागायनाची फलश्रुतीही सांगि-तलेली आहे.

"यापरि हे प्रभुचरित्र ।
ऐकती पुण्यात्मे परमपवित्र ।"
(१३–१२२)

"हे किन्नरीब्रह्मयाचे आख्यान ।
जे करिती श्रवणपठण ।
ते इहलोकीचे भोग भोगून ।
अंती जाती शिवपदा ॥"
(२८–११५)

ग्रंथाच्या शेवटी तर ही फलश्रुती अतिशय विस्ताराने सांगितलेली आहे.

ग्रंथरचनेचा काळ

तुकारामशंभूंनी आपल्या ग्रंथरचनेचा काळ शेवटच्या अध्यायात नोंदविलेला आहे.

"शके अठराशे एकोणचाळीस ।
विजयादशमी शुभ दिवस ।
गुरुवार दोन प्रहरास ।
ग्रंथ समाप्त जाहला ॥"
(अ. ४३–९४)

सोलापूर जवळील हरिणी नदीच्या काठी वसलेल्या काटगाव नगरीत शके १८३९ मध्ये दसऱ्याच्या शुभदिनी तुकारामशंभूंनी हा ग्रंथ पूर्ण केला. संत शिवदासांचे 'बसवपुराण' शके १७५४ मध्ये लिहिले गेलेले आहे. परंतु ते अद्यापी प्रकाशित झालेले नाही. यानंतर ८५ वर्षांनी लिहिले गेलेले तुकारामशंभुकृत 'बसवपुराण' मात्र प्रकाशित झालेले आहे. याचा प्रकाशन काळ इ. स. १९०५ ते १९११ पर्यंतचा असावा. मला अभ्यासावयाला मिळालेली छापील प्रत कव्हर पाने नसलेली आहे. हा ग्रंथ प्रकाशित होऊनही याकडे मराठी वाङ्मयाभ्यासकांचे, संशोधकांचे लक्ष गेलेले दिसत नाही. हा ग्रंथ अलिकडील असला तरी वीरशैव तत्त्वज्ञानाच्या आणि बाराव्या शतकात कर्नाटकात होऊन गेलेल्या म. बसवेश्वर आणि इतर शिवशरणांच्या चरित्रकथांच्या आकलनाच्या दृष्टीने महत्त्वाचा असा आहे. म. बसवेश्वरांच्या जन्मतिथीच्या शोधाच्या दृष्टीने संस्कृत बसवपुराणांचे संदर्भ महत्त्वाचे मानले जातात. कारण त्यात बारकाव्याच्या नोंदी आढळतात.[७] अशाच प्रकारच्या बारकाव्याच्या नोंदी तुकारामशंभूही आपल्या ग्रंथात करतात त्या अशा

"तव उदय झाला वेळेचा । शुक्र ग्रह होता मीनीचा ।
तैसाचि रवि मेषीचा । शनि तुळीचा होता तई ॥
गुरू कर्क राशीला । चंद्र रोहिणीचा वृषभी आला ।
मंगळ मकरी होता गेला । होय कर्क लग्नी जन्म पं ॥"
(अ. ४–४४, ४५)

अशाप्रकारे बसवेश्वरांचे चरित्र, तत्त्वज्ञान आणि कार्य यावर प्रकाश पाडणारा मराठीतील हा एक मौलिक ग्रंथ आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक यातील सांस्कृतिक संबंधाच्या दृष्टीनेही या ग्रंथाला महत्त्व आहे.

संदर्भ टीपा :

१. "शके १६४४ वर्षे शुभकृत संवत्सरे चैत्र शुद्ध ७ सोमवार तद्दिने समाप्त–" लीलाविश्वंभर : संपा. शं. घो. सादळे. अखिल भारतीय वीरशैव संघ बेळगाव आवृत्ती–१ ली. १९६४. पृष्ठ ४११.

२. "संत शिवदासकृत सिद्धेश्वरपुराण" प्रका. म. सं. देवमाले. पुणे–१९११.

३. "संत शिवदासकृत बसवपुराण" : शां. सं. स्वामी. मराठवाडा संशोधनमंडळ वार्षिक १९७५ राधाकिशन रामचंद्र प्रकाशन शिरूर (ता.) जि. उस्मानाबाद पृष्ठ २४२.

४. 'कपिलधार' त्रैमासिक : संपा. शां. सं. स्वामी (फेब्रु–मार्च–एप्रिल १९८२) पृ. ११

५. 'व्यासोक्त बसवपुराण' भाग १, भाग २. प्रका. म. ब. वारद सोलापूर इ. स. १९०५

६. Shri Basavesvara–Eighth Centenary Commomoration Volume Govt. of Mysore Bangalore 1967 P. 416.

७. Life–Sketch of Basaveshvara : T. N. Mallappa Basava Journal. (May 1978) Basava Samiti, Basava Bhavan Bangalore. P. 85.

△ △ △

'घाशीराम कोतवाल'

माणिक कानेड

'घाशीराम कोतवाल' हे नाटक अनैतिहासिक असले तरी त्याने मराठी रंगभूमीवर एक इतिहास घडविला यात संशय नाही. मराठी नाट्यसृष्टीतील तो एक मैलाचा दगड ठरावा. या नाटकाने, विशेषतः प्रयोगाने नाटक (Drama) आणि रंगभूमी (Theatre) या संबंधीची एक नवीन जाण दिली. नाट्याबद्दलच्या रूढ व सांकेतिक कल्पना बाजूला सारून वेगळ्या दृष्टिकोणातून या नवप्रयोगाकडे पाहता आले तरच त्याचा आस्वाद घेता येईल. नाहीपेक्षा– 'हे काय नाटक ? यापेक्षा तमाशा बरा !' यासारख्या तीव्र प्रतिक्रिया या नवकलाकृतीला अन्यायकारक ठरतील म्हणून प्रयोगात मला गवसलेला 'घाशीराम'– याची नोंद केली पाहिजे.

एका अर्थाने हे सांकेतिक नाटक नाही म्हणूनच ते रूढ अर्थाने फसले आहे असे वाटणे स्वाभाविक आहे. नाटकाचे आपले काही संकेत ठरलेले असतात. संविधानक–स्वभाव परिपोष–संघर्ष–रसनिष्पत्ति–या चौकटीत हे नाटक बसत नाही. आणि प्रयोग ? त्यातील संवाद व अभिनय–एकंदर सादरीकरणच-अवास्तव वाटून तोही आपल्या रंगभूमिविषयक वास्तवातील अनुभवात बसत नाही. आपल्या जीवनाचे–ऐतिहासिक जीवनाचे प्रतिबिंब (?) त्यात दिसत नाही. चवथी भिंत फोडून, रंगभूमीवरील पात्रांच्या वास्तव (खरं तर लुटूपुटूच्या) जगात आपण डोकावतो आहोत. घडिभर आपले वैयक्तिक अस्तित्व विसरून या पात्रांशी–घटनांशी आपण तादात्म्य पावतो आहोत आणि मग आपल्या भावभावनांचे विरेचन होऊन आपल्याला एक अलौकिक आनंद झाला आहे, किंवा रंगभूमीवरील घटनांचे आपण अलिप्त साक्षीदार आहोत आणि नाटकातील पात्रांच्या मूर्खपणाला आपण हसतो आहोत, – 'चला, आपण नक्कीच तसे नाही किंवा नसू' असा पाखंडी संतोष उराशी बाळगून आपण या माया नगरीतून वास्तव संसारात येत आहोत – काही खऱ्या-खोट्या समस्या आपल्यासमोर आल्या होत्या पण त्यांची सोडवणूकही सूचित झाल्याने आता मिथ्या मानसिक ताण हलका झाला आहे, अशा नाटकांच्या वा प्रयोगांच्या रांगेत हे नाटक बसत नाही. तेव्हा अशा तीव्र प्रतिक्रिया प्रगट होणारच.

आजचे नाटक बंदिस्त शोकान्तिका / सुखान्तिका / समस्याप्रधान / बोधजनक, वगैरे असत नाही. ते illusion of reality निर्माण न करता reality of illusions ची जाणीव देते. वास्तवतेच्या नावाखाली अवास्तवाला ते पारखे होत नाही. वास्तव (reality) कल्पनारम्यता (fantasy) यांचे ते अद्भुत रसायन असते. असे नाटक पाहताना भावनात्मक तादात्म्यापेक्षा (feeling) अलिप्त विचारांना (thinking) चालना देते. जीवनातील केवळ 'सुरूप' दाखविण्यापेक्षा कित्येकदा आपले 'कुरूप' दाखवून त्याला वाकुल्या दाखवून ते विदुषकी हसते. केवळ स्वस्थचित्त ठेवण्याची हमी न घेता ते अस्वस्थही करते. ते प्रयोग-शरण असल्याने शब्द बंबाळ असत नाही. निःशब्द अभिनय, आणि असलीच तर अभिनयरूप भाषा (Physical language) जेथे सर्व शरीरच बोलके होते, प्रतिकात्मक गीतनृत्यादि कलांचा आविष्कार आणि प्रेक्षकांचा प्रासंगिक सहभाग एकत्र आणून समुच्चयात्मक रंगभूमीची (Total Theatre) एक अभिनव कल्पना आज पुढे आलेली आहे. म्हणूनच आजचे नाटक आता केवळ लेखकाचे न राहता त्याला दृष्यश्राव्यरूप देणारा दिग्दर्शक व त्यात प्राण

ओतणारे कलावंत यांचे ते मानले जाते. त्यामुळेच आजचे नाटक रूढ नाट्यमीमांसेत बसत नाही. नाटक हा आता केवळ एक वाङमयप्रकार मानण्याबरोबरच प्रामुख्याने त्याच्या प्रायोगिक अंगांचा अधिक विकास झाला आहे.

नवनाट्याच्या या प्रायोगिक तंत्रविचाराने रंगभूमी व नाटक (Theatre Drama) यांचा साकल्याने अविभक्त विचार करावा लागतो. यात ब्रेख्त व आर्तो यांनी रंगभूमीकडे पाहण्याची एक नवी दृष्टी दिली–नवी जाण या संबंधात आणली. जगभर उमटलेले त्याचे पडसाद आज ऐकू येतात. मराठी रंगभूमीही याला अपवाद नाही. या नवनाट्याची वा रंगभूमिविषयक नवप्रयोगांची सहीसही नक्कल नसली तरी त्या प्रभावामुळे आपल्या रंगभूमिविषयक संकल्पनेत–परिमाणात क्रांतिकारक बदल झालेले आहेत. ते चांगले की वाईट हा भाग अलाहिदा, पण ते प्रथम जाणून घेतले नाहीत तर 'घाशीराम' सारखी प्रायोगिक नाटके आस्वाद्य ठरणार नाहीत. आणि कदाचित अशा नाटकांना अभिप्रेत असलेला प्रतिसाद न मिळाल्यामुळे आपण योग्य न्यायही देऊ शकणार नाही. एवीतेवी शेक्सपिअर–शॉ–इब्सेन इत्यादींच्या नाट्यसंकल्पना आपण आत्मसात केल्याच ना ? तेव्हा हे नवे आंग्लाळलेले खूळ म्हणून झटकून टाकण्यासारखे नाही. विशेष म्हणजे भारतीय नाट्यशास्त्रापेक्षा अरिस्टॉटल, इब्सेन, शॉ इत्यादी पाश्चात्य नाटकांच्या निकषावर, नाट्य–परिमाणांवर आपण मराठी नाटकांची समीक्षा करीत आलो आहोत. तेव्हा हा नवीन प्रवाह काय आहे हे पाहिले पाहिजे. तसेच प्रायोगिक नाटकांच्या संदर्भात ते अभिनित करण्याचे वा सादर करण्याचे स्टॅनिलोव्हस्कीपेक्षाही ग्रोटोव्हस्कीचे तंत्र कसे वापरले जाते हेही जाणून घेतले पाहिजे. तरच 'घाशीराम'ने मराठी रंगभूमीवर काही नवा चमत्कार केला किंवा कसे यातील मर्म कळेल.

ब्रेख्त् एकीकडे 'बुर्झ्वा' समाजावर टीका करतो तर दुसरीकडे मानवाच्या भग्न अस्तित्वाची वेदना बोलकी करतो. आजच्या अधोगतीला गेलेल्या समाजात पूर्वदिव्य–चांगुलपणा हे अर्थशून्य झाले आहे. म्हणून तो उपरोधाने–उपहासाने स्थापित मूल्यांचे विडम्बन करतो. Mother Courage' ही एका युद्धाची बखर. यातील माता कमालीची स्वार्थी असून आपल्या मुलांचाही ती बळी देते आणि तरी तिला Mother Courage ही उपाधी !

त्याचे नाट्यशास्त्र चिनी आणि जपानी रंगभूमीशी नाते सांगते. तिचे स्वरूप भारतीय 'कथाकली'शीही मिळते जुळते आहे. नाटकाचे अंतिम ध्येय माणसांची जाण वाढवून समाजक्रांतीची प्रेरणा देणे होय. म्हणून सामाजिकांनी नाटक समंजसपणे पाहिले पाहिजे. नाटकाशी तादात्म्य झालेला प्रेक्षक कर्मशून्य असतो. म्हणून हे तादात्म्य सतत भंग पावावे. निवेदन, संगीत इत्यादींनी त्यात विघ्न आणणे हे त्याच्या नाट्यतंत्राचे व्यवच्छेदक लक्षण. यालाच तो Theatre of Alienation म्हणतो. घाशीराममधील सूत्रधार/कोरस बामण हरि/भारूड–भूपाळी–लावणी–कव्वाली आदि संगीतप्रकार/यांचे प्रयोजन प्रेक्षकांच्या नाट्यसमाधीत असा विक्षेप आणते.

प्राक्कथा किंवा पुराकथा (myths) /लोककथा/दंतकथा/लोकगीते/लोकनृत्ये/ मूकाभिनय/कळसूत्री हावभाव (mimes) /धर्मप्रवचन, कीर्तन/ निर्मळ विडम्बन/रांगडी लोककला व नागरी सभ्यता/ऐतिहासिक बोधकथा व सामाजिक व राजकीय आशय/इत्यादींचे बेमालूम मिश्रण तो करतो. परिणामतः ही नाटके प्रयोगान्वित होताना एक आगळा अनुभव प्रेक्षकांना देऊन जातात. नागरी संस्कृतीने दुर्लक्षित केलेल्या या लोककलांचा रंगभूमीवरील आविष्कार घाशीराममध्ये जाणवतो आणि प्रयोग एक दृष्यश्राव्यकाव्य बनून जातो तो यामुळेच. घाशीराम हे नाटक देखणे तर आहेच पण लोकसंगीताच्या स्पर्शाने ते नादमयही झाले आहे. रंगभूमीवरील अवास्तवाची जाणीव सातत्याने 'घाशीराम'च्या प्रयोगात होत राहिली पाहिजे. नाना किंवा इतर घटनांशी तादात्म्य येथे अभिप्रेत नाही. हे नाटकच आहे आणि मग असलेच तर लौकिक वा ऐतिहासिक अर्थाने नव्हे तर वेगळ्या प्रतीकात्मक अर्थाने ते खरे असून बोध देणारे ठरावे. ही ब्रेख्तची (Epic reality) अभिजात रंगभूमीची कल्पना येथे अनुस्यूत आहे. यालाच तो V. Effect म्हणतो. वास्तवतेच्या मिथ्या कल्पना मोडून जाचक नेपथ्याच्या भिंती पाडून नाटक दिवाणखान्यातून रस्त्यावर व लोकात बसवून ते लोक-

जीवनाशी एकरूप झाले–कल्पक–काव्यमय झाले याची प्रचिती 'घाशीराम 'ने यावी.

रंगभूमी केवळ communication न राहता ती communion झाली पाहिजे. धार्मिक विधीप्रमाणे ती एक सामुदायिक अनुभूती बनली पाहिजे. या दृष्टीने दशावतारी खेळे, ललित, तमाशा, भारूड, कीर्तन इत्यादि साधनांनी या लोककला सन्मानाने पांढरपेशांच्या रंगभूमीवर आणण्याचे घाशीरामचे श्रेय नाकारता येणार नाही. याचे अवधान सुटले की घाशीरामचा आनंद घेता येणार नाही. यातील समूहांची स्थिरचित्रे, त्यांचे विविध पदन्यास, त्याचे हलणे डुलणे, लग्नाची धांदल, मिरवणूक यातील सामूहिक अभिनय याचे प्रयोजन उमगले तरच हा प्रयोग नवलाई देऊन जातो. कॅलिडिओस्कोपप्रमाणे हे नवेनवे आकृतिबंध किती बोलके आणि मनोहारी ठरतात !

ब्रेख्तच्या समवेतच नट व समीक्षक आर्तो याच्या Theatre of cruelty चाही निर्देश केला पाहिजे. रंगभूमीने स्वभावप्रधान आणि विचारप्रधान अशा वास्तववादी पांढरपेशा नाटकांच्या मागे लागून आपले मुक्त चैतन्यमय सामर्थ्य गमावले आहे अशी व्यथा त्याने 'Theatre and its double' या पुस्तकात व्यक्त केली आहे. अतिवास्तववाद व प्रतिकात्मता त्याच्या नाट्यविषयक विचारांचे सार आहे. मानवाच्या सहजप्रवृत्तीत त्याचे मानवीपण सामावले असल्याने मिथ्या नीतिकल्पना बाजूला सारून त्याकडे निर्लेप दृष्टीने पाहिले पाहिजे. समाजस्थैर्य, सामाजिक बांधिलकी, लोककल्याण, कलात्मक सौंदर्य इत्यादींचा बडेजाव माजवून कुरूप–घृणास्पद जीवन उघड्या डोळ्यांनी पाहण्यास धजावत नाही. या आत्मवंचनेतून माणूस मिथ्या मूल्ये कवटाळून बसतो व आपले बल आणि विजिगिषा गमावून बसतो असा इत्यर्थ आर्तोच्या विवेचनाच्या मुळाशी आहे. माणसाचे–त्याच्या समाजाचे हिडिस रूप आपल्यासमोर कित्येकदा ठेवणे आवश्यक असते. आपल्या थंडपणाला तेवढाच एक चटका. 'घाशीराम' च्या रूपाने असाच आरसा आपल्यासमोर धरला जातो. जणु बजावले जाते 'हे तुमचे स्वरूप–काल होतं–आज आहे–कदाचित उद्याही असेल. हे गलिच्छ जीवन आपले नाहीच..आमच्या श्रद्धास्थानांची उगाच नालस्ती होत, असे भ्रम तुमचे असतील तर go home...where everything–will be falser thou here.' असे तर 'घाशीराम' सांगत नसेल ना ? हा विचार आपल्या मनात आलाच नाही तर मग हे नाटक रुचणार नाही. सारांश Theatre of Cruelty म्हणजे Theatre of Senses असते. यातून दिव्य–भव्य असे उन्नयन साधण्याचा प्रयास नसतो.

या भूमिकेतून 'घाशीराम 'चा प्रयोग हा एक चमत्कृतिपूर्ण अनुभव आहे हे पटावे. प्रयोगाने प्रेक्षक या खेळात सहभागी होतो हे आणि मग नाटक अनुभवतांना नानाच्या ऐतिहासिक व्यक्तिमत्वाची काय हेळसांड झाली, घाशीराम किती उद्वेगजनक आहे किंवा दयनीय आहे हे प्रश्न त्या काळापुरते अप्रस्तुत ठरून एक देखणा मांडलेला खेळ पाहण्याचे–भोगण्याचे समाधान घेऊन जातो.

हे नाटक एका व्यक्तीचे नसून समूहाचे आहे. वातावरणनिर्मिती, सांघिक आकृतिबंध, चित्रसंगती, नटांनीच साकारलेले नेपथ्य, नेटकी प्रकाशयोजना, नृत्याची लय, गीतमय संवाद इत्यादि उपेक्षित गोष्टींचा चतुर वापर करून या एकंदर प्रयोगाला Magic Theatre चे स्वरूप प्राप्त होते. मग ते केवळ तेंडुलकरांचे नाटक राहत नाही. ते जब्बार पटेलांचे-सर्व कलाकारांचे–तुमचे आमचे होते.

या नाटकात संगीतिका (Opera), नृत्यनाट्य (Ballet) आणि मूकाभिनय व रेखीव, शिस्तबद्ध, निःशब्द हावभावात्मक हालचाली (mimes) आणि ब्राम्हणवृंद (Chorus) यांचा मेळ साधून एक नादमय लय साधण्याचा सफल प्रयोग केलेला आहे. नाटकालाही एक लय असते, शब्दांना एक लुब्धनाद असतो, संवादाच्या फेकीला एक ताल असतो, हालचालींना एक सुसंगत मेळ असतो याचे प्रत्यंतर येथे येते. या सर्वांची harmony साधली, या सर्वांचा समसूर लागला की कलाब्रम्हाची अनुभूती येते. म्हणूनच घाशीरामने मराठी रंगभूमीवर नवा इतिहास घडविला तो या प्रायोगिक अर्थाने ! पण एक प्रश्न उरतोच. हा रंजक प्रयोग हेच या नाटकाचे इप्सित आणि फलित मानायचे काय ? त्यासाठी ऐतिहासिक तेची कुचेष्टा आणि टवाळी याचे समर्थन कसे करणार ? त्याने मन व्यथित झाल्याविना राहत नाही. 'ते स्थलकालातीत आहे–यातून असलाच तर वेगळाच बोध आहे '–हे काय गौडबंगाल आहे ?

या नाटकाकडे म्हणूनच पारंपारिक दृष्टीने न पाहता हे एक उपरोध–उपहासात्मक विडम्बन आहे–प्रतिकात्मता येथे गृहित धरल्याविना हे आस्वाद्य ठरणार नाही आणि उद्‌बोधक तर नाहीच नाही.

या ओघात पिटर यूस्टिन्होव्हच्या Romonoff and Juliet या नाटकाची आठवण होते. शेक्सपिअरच्या शोकान्तिकेच्या आधाराने हेही असेच नृत्य संगीतमय रचलेले नाटक. एका कल्पनारम्य नगरराज्यातील सामान्य माणसाच्या स्वप्नांचे रंगभूमीवरील सर्व क्लृप्त्या वापरून केलेले हे रंजक उपहासगर्भ चित्र आहे. विडंबनात्मक गमतीदार संगीतिका सादर करणारी यातील कळसूत्री पात्रे एक आरसा आपल्यासमोर धरतात आणि त्यांना हसणारे, आपण आपसुखच त्या आरशात आपले प्रतिबिंब पाहून खजिल होतो. मग गंभीर विचार फुलू लागतो आणि वाटू लागते, 'सतत दुसऱ्याला आपण हसतो पण कधीकधी स्वत:लाही हास्यास्पद बनवून पाहिले पाहिजे. हीच नेमकी हास्यास्पद विसंगती विडम्बनकार पकडून अप्रत्यक्षपणे जीवनावर प्रतीकात्मक भाष्य करीत असतो. 'Tragic through Comic.' पिटर म्हणतो, 'Making people laugh is for me another way of being Serious...' कित्येकदा तर आपला अनाठायी गंभीरपणाच हास्यास्पद असतो. अशा नाटकात दृष्यपात्रे विनोदाचा मुखवटा धारण धरून आपल्याला वाकुल्या दाखवित असतात. त्या मुखवट्यांच्या आतील त्यांचा चेहरा ओळखण्याचे भान ठेवले नाही तर आपली फसगत होते. मग 'नाना नाचत येतो–सगळे बामण पुण्यातील बावन्नखणीतच जात होते काय?' वगैरे अप्रस्तुत प्रश्न उपस्थित करून अशा विडम्बनात्मक नाटकांची wave length आपण पकडू शकत नाही. या नाटकाचा घाटच mock-history किंवा mock-heroic अशा स्वरूपाचा असल्याने त्यात ऐतिहासिक निंदा शोधण्यापेक्षा त्या गमतीतून प्रतीकात्मक आशय अन्तर्मुख होऊन शोधणे श्रेयस्कर असते. तमाशातील कृष्ण–रामलीलेतील देवदेवता यांच्या बाबतीत असे प्रश्न सामान्य प्रेक्षक उपस्थित करीत नसेल तर मग पढिकांनाच हा प्रकार अप्रासंगिक का वाटावा? वास्तवात कोंडलेले आपले जीवन किती संकुचित करीत असतो आपण? जे वास्तवात नाही ते कल्पकतेने जाणून घेतले पाहिजे. सगळेच जीवन एकसुरी नसते. किंबहुना Phantasy चे अद्‌भुत जग जीवनाचे वेगळेच प्रत्ययकारी दर्शन घडविते. त्याकडे पाठ फिरवून चालणार नसते. एकाच घटनेकडे–व्यक्तीकडे विविध अंगांनी–विविध दृष्टींनी पाहता येते, तरच काही गवसेल. अरनॉल्ड वेस्करने ज्यूच्या दृष्टिकोणातून शेक्सपिअरच्या नाटकाचे 'Merckhnt' मध्ये विडम्बन केले. Mackbird असेच एक नाटक. किंग्जले अमीस ची कादंबरी Reformation असा इतिहास बदलण्याचा प्रयत्न करते. पिटरवेसचे Marah–Saade फ्रेंच राज्यक्रांतीकडे असेच टीकात्मक पाहते. यांनी आपणाला प्रगल्भ केले नाही तर आपण 'Adormouse in winter'!

△ △ △

पुस्तके

पहाटपक्षी : सुलभा हेर्लेकर

ना. बा. ठेंगडी

काही कविता अशा असतात की, ज्या नुसत्याच वाचून मनात साठवून घ्याव्याशा वाटतात. त्या जशाच्या तशा मनात साठवून घेतल्या तर साठवून घेणाऱ्याच्या जीवनाला एक आगळी समृद्धता येते. हे जसे काही कवितांच्या बाबतीत होते, तसेच इतरही काही कलाकृतींच्या बाबतीत होते.

अशा वेळी अशा कवितांची चिकित्सक समीक्षा हे एक महान धर्मसंकट असते. या कविता वाचून आपण जे आपल्यातच मग्न होऊन गेलेलो असतो, ते आपल्यातून बाहेर पडतो. असे बाहेर पडूनही पुन्हा आत्ममग्न होता येईल का, हा या संदर्भात उपस्थित होणारा प्रश्न.

सुलभा हेर्लेकर यांची कविता ही अशीच निव्वळ मनात साठविण्याची कविता आहे. त्यांच्या कविता जी एक आत्ममग्नता निर्माण करून जातात, तिच्यात जीवनाला समृद्ध करण्याचे आगळे सामर्थ्य असते. या आत्ममग्नतेतून आत्म्याच्या शोधाची वाट उमलून येते– कदाचित् परमात्म्याच्याही शोधाची !

मी इथे आत्मा–परमात्मा अशांसारख्या संकल्पना वापरून रसिक वाचकांच्या जाणिवेला क्लिष्ट तर करीत नाही ना, अशी मला भीती वाटते. कवितेच्या आकलनाची साधी–सरळ पद्धत सोडून देऊन प्रत्यक्ष कवीला किंवा कवयित्रीला केवळ धूसरपणे जे जाणवले आहे, त्यावरच आपण आपले लक्ष केन्द्रित केले, तर आपल्याला कविता अधिक स्पष्टपणे अनुभवता येते. हे काहीसे विचित्र आहे. तसा हा उलटाच प्रवास आहे. कवितेतील धूसरतेवर लक्ष केन्द्रित करून तिच्यातील अनुभव आपण आपल्या मनाशी अधिकाधिक स्पष्ट करीत जाणे.

सुलभा हेर्लेकर यांच्या कवितेत हे असे धूसरपणे जाणवण्यासारखे काय आहे ? त्यांच्या कवितेत ठिकठिकाणी जो 'तू' आलेला आहे, तो असा धूसर आहे. या 'तू' ची अनेक रूपे आहेत. एकेका ठिकाणी एकेक रूप स्पष्ट आहे, पण साऱ्या रूपांनी एकत्र येऊन मनावर बिंबू पाहणे हा एक अतिधूसर अनुभव आहे. ही आणखी एक गंमत आहे.

त्याच्या अस्तित्वातले हे अंतिम धूसरपण स्वत: कवयित्रीला जाणवले आहे आणि म्हणूनच त्याच्या अस्तित्वाला साद घालताना तिला नेहमीचे शब्द कमकुवत वाटायला लागतात. नेहमीच्या शब्दांमधून साद घातली तर ती भिडणार नाही, अशी कवयित्रीची अटकळ आहे. मग ती नकळत एक नवी शब्दकळा निर्माण करून जाते. 'सूर्यस्पर्श', 'गात्रलिपी', 'गात्रलय', 'पाखरसकाळ', 'पहाटझांजर', 'तरंगधून', 'स्पर्शशैली', 'राधाराग', 'उपासपोकळी', 'देहडोह', 'नभगर्जित', 'पाऊसचंदन' अशांसारखे शब्द सहजपणे कवितांमधून ओवले जातात.

असा हा धूसर, अनाकलनीय 'तो' आणि 'त्या'च्यासाठी तिच्या मनाची झालेली उलघाल. प्रतीक्षा, विरह, आठवणीची हुरहूर, एक अनाम उदासी, थोडे तत्त्वचिंतन, बरीचशी चरफड या साऱ्यांबरोबर मधूनमधून मीलनाचे संकेत. मीलनाच्या आठवणी आहेत त्याअर्थी मीलन आहेच. मीलनातून, स्पर्शातून उगवलेले एक तनामनाचे बदलतेपण आहे. हा बदल सामान्य नाही. हे ईश्वरत्वाकडे जाणाऱ्या वाटेवर एकेक पाऊल टाकून पुढे सरकणे आहे. इथे स्पर्शकिमया ही ईश्वरीकिमया ठरते.

मीलनाचे संकेत ठिकठिकाणी मिळत असूनही सार्वत्रिक रितेपण कशापायी ? यांचे कारण 'तो'. त्याला आकळण्याच्या प्रयत्नात तो अधिकाधिक अनाकलनीय होत जातो. म्हणून खराखुरा 'तो' आपल्या हाती लागलाच नाही, ही जाचक जाणीव मनाला व्यापून उरलेली असते. सरतेशेवटी प्रणयभावना ही नुसती प्रणयभावना रहात नाही. तिच्या सोबतीला त्याच्या खऱ्या स्वरूपाच्या शोधाचीही भावना असते.

या प्रणयाला मग नकळत एक उदात्तता येऊन जाते.

—अनादि काळापासून चालत आलेले
देहाचे शाश्वत रूपच
कसे बदलवून टाकलेस की,
माझे पहाटपण मी,
प्रसन्न मोगऱ्याच्या ओंजळीत टाकून आलेय्

या ओळी या दृष्टीने लक्षात घेण्यासारख्या आहेत.

तुझ्या आठवणीतून पाऊल टाकताना
दिशांचे पापुद्रे सुटत चाललेय्

किंवा

ही वाट कुठे जाणार ? असा,
सूर्यफुलांना आकाशगर्भात पडलेला प्रश्न
माझ्याही दिशाहीन वाटेवर सांडून जातो
आणि तुझ्या अस्तित्वाचे दान
पदरात घेतलेल्या 'मला'
हा सूर्यफुलांचा देश अनोखा अनोखा वाटू
लागतो

किंवा

माझ्या देहभर
तुझ्या आठवणींचा पाऊस
कुठल्या वाटेने निघावे
पाऊलपाखरे चिडीचिप

किंवा

काय, तू सूर्यकिरणांच्या बनातून तर
फिरून नाही आलास ?

अशा ओळींमधून त्यांच्या संदर्भात तिला पडलेली असंख्य कोडीच ती मांडून जात नाही काय ?

ही कोडी हे सुलभा हेर्लेकर यांच्या कवितेचे वैशिष्टच आहे, असे मला वाटते. "तो कसा आहे ?" "नेमका कसा आहे तो ?" हे अंतर्मनात सतत उमटणारे प्रश्न त्यांच्या कवितेला आगळेपण देऊन जातात. कोमल भावना, नाजुक आंदोलनं आणि तरल संवेदना या वरवर दिसणाऱ्या मानसिक घटनांच्या आड तीक्ष्ण बुद्धीचा खडा पहारा असल्याचे जाणवते. अतिउत्कटता, अतितरलता, अतिव्याकुळता हे सुलभा हेर्लेकर यांच्या कवितेचे गुण आहेत हे मला एकदम मान्य आहे, पण ही त्यांच्या कवितेची वैशिष्टये नव्हत. प्रियकराच्या संदर्भातली बौद्धिक पातळीवरची चिकित्सा प्रणयिनीच्या आर्ततेचे रूप घेऊन कशी अवतीर्ण होऊ शकते, हे पहावयाचे असेल, तर सुलभा हेर्लेकर यांच्या कवितेत पहावे, असे मी म्हणेन. त्यांच्या कवितेचे तेच वैशिष्टच आहे.

सुलभा हेर्लेकर यांच्या कवितेची लय शांत आहे. तिचा आविष्कार सौम्य आहे. अनुभव कितीही प्रचंड असो, कितीही वेगवान असो, कितीही तीव्र असो, तो कवितेत येताना कवितेची शांत लय आणि सौम्य आविष्कार सोडीत नाही. 'या नाजूक फुलांना' कवितेत भावनांचे प्रचंड धक्के आहेत, 'जन्मांतरीच्या या कविता'मध्ये कवयित्रीच्या कवितेचा प्रचंड कायापालट लक्षात येतो, 'उद्या मातीत मिळणाऱ्या आयुष्याचे मोजमाप मी करून ठेवले' हे निर्वाणीचे बोल उमटविणारी 'तडजोड' कविता वाचणाराला पार अस्वस्थ करून सोडते. 'नक्षीकाम' या कवितेतील अनुभव अत्यंत दारुण आहे—परंतु हे सारे कवियित्रीने अत्यंत शांतपणे सांगितले आहे.

रचनेचे कौशल्य आणि कल्पनेची चमत्कृती हे कवितेचे गुण मनाला मोहवून टाकणारे आहेत.

सूर्योदयापूर्वीचा काळोख
त्याने पिऊन टाकलाय्
लक्षवेधी स्पर्शकळांच्या जाणिवेने
माझे अंतरंग उजळण्यासाठी

किंवा

बरसावलेले आभाळ कसे
आज सुन्न झाले आहे
तुझ्या माझ्या भेटींसारखे

किंवा

श्वास श्वासात रुतल्यावर
उरते एकच लय
तीव्र दारुण दुराव्याची

अनुक्रमणिका

किंवा

मनाचे घरअंगण असे रेषान्तर
कधी करू नये
कारण कधीकधी पावसाळा
फक्त घरात बरसतो
मग उरलेल्या (सुरक्षित) मोकळ्या अंगणात
स्वप्नवेल्हाळाची झाडे लागतात

रचनाकौशल्य आणि कल्पनाचमत्कृती या दृष्टींनी या ओळी खरोखरच मनोज्ञ वाटतात.

मी आता माझ्या मूळ मुद्याला हात घालतो. कवितेतली 'ती' ज्या 'त्या' च्या शोधात निघाली आहे, त्याला कुठेतरी ईश्वरी चैतन्याचा स्पर्श झालेला आहे. तिला तो जाणवलेला आहे. हा स्पर्शापलिकडचा स्पर्श आहे. 'पहाटपक्षी' या कवितासंग्रहातील कवितांमध्ये जेथे जेथे स्पर्शाचे उल्लेख आहेत, तेथे तेथे आपण थांबले पाहिजे आणि ईश्वरी चैतन्याच्या व स्पर्शापलिकडल्या स्पर्शाशी असलेले या स्पर्शाचे नाते तपासून पाहिले पाहिजे.

तिच्या दृष्टीने तो एकदा असा आहे–
तू जवळ असताना ऐकू येतात
तुझ्या रक्तिम देहातून
सूर्योदयाचे अनाकलनीय नाद

किंवा

त्याच्यातला 'तो' कधीतरी
तेजाळून जातो
आणि–सुरानेच सूर पेटतात

अशा या 'त्या'च्यासाठी 'ती'

पूजेच्या आरतीत
एक एक चांदणी ठेवून जाते

तिचा शोधप्रवास संपलेला नाही, पण आज त्याच्याविषयीचे जे आकलन तिने मनाशी बांधलेले आहे ते असे आहे–

तुझ्या रूपाच्या छाया सरकतात
सांजावलेल्या क्षितिजी
जिथे
तुझी लय निर्गुण निराकार झालेली

हे असे आहे म्हणूनच 'दर्शन' या कवितेतला तो दाहक अनुभव आहे.

एकदा केव्हातरी मनगटातल्या ताकदीप्रमाणे
तुझ्या अंतस्थ जपलेल्या
मनातून अंगार सांडला
आणि
माझे आरासलेले गौरीहारी संदर्भ
राखेजून गेले
(आयुष्य वितळल्यावर)
तुझे दर्शन
फक्त अंगाऱ्यापुरते

हा अनुभव पेलायला लागणारी मनाची ताकद कवयित्रीपाशी आहे.

ही ताकद लक्षात आल्याशिवाय सुलभा हेर्लेकर यांची कविता समजणे कठीण आहे. तिला नुसतीच प्रेमकविता, प्रणयकविता किंवा विरहकविता म्हणणे म्हणजे तिच्या सामर्थ्याला मर्यादा घालणे होय. प्रेम आणि प्रणय यांच्या माध्यमातून ईश्वरी चैतन्याला आवाहन करणारी कविता, हे सुलभा हेर्लेकर यांच्या कवितेचे खरे स्वरूप आहे. त्यांची कविता वाचून माणूस आत्ममग्न होतो याचे खरे कारण हे आहे.

[पहाटपक्षी : कवयित्री–सुलभा हेर्लेकर; प्रकाशिका सौ. रेखा येरकुंटवार, राधेय प्रकाशन, २०५ पश्चिम उच्च न्यायालय मार्ग, धरमपेठ नागपूर ४४००१०]

△

तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा

विशाखा वडसकर

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या देशात कमालीची अस्थिरता आलेली आहे. राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनामध्ये ही अस्थिरता वेगाने पसरत आहे. त्यामुळे लोकजीवन गढूळ होत आहे. वरच्या वर्गामध्ये उदासीनता वाढत आहे. परंतु त्याच बरोबर कामगार, दलित, श्रमिक आणि स्त्रिया यांच्यात मात्र नवनवीन उर्मी सतत उफाळत आहेत. विशेषत: ग्रामीण भागातील युवकांच्या नव्या प्रकारे जगण्याच्या प्रेरणांची ताकद वाढत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गावकुसाच्या आतले व गावकुसाच्या बाहेरचे असे दोन्ही स्तर जागे झाले आहेत. त्यांचा दडप-

अनुक्रमणिका

लेला, दबलेला आवाज आपापले साहित्यरूप घेऊन अवतरत आहे, आणि साहित्यक्षेत्रातील आपल्या स्वतंत्र अस्तित्वासाठी झगडत आहे. त्यांच्या साहित्याची भाषा ही त्यांच्या अनुभवाची भाषा आहे. पण या नव्या प्रक्षोभाची दखल घ्यायला कोणीच तयार नाही. अशा-वेळी या ग्रामीण लेखकांना, त्यांच्या क्रांतिकारक अस्मितेला खतपाणी मिळणे व तिला प्रखर धार येणे याकरिता प्रयत्नांची गरज होतीच. ही गरज डॉ. आनंद यादव व बाबा पाटील यांनी संपादित केलेल्या 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा' या पुस्तकाच्या प्रका-शनाच्या प्रयत्नांनी खूपशी साध्य झाली आहे. या पुस्तकाची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे डॉ. आनंद यादवांची सहृदय आणि चिकित्सक प्रस्तावना. त्यांच्या समीक्षेतला विवेकी समतोल हा त्यांच्या कलावंत व्यक्तिमत्वाचा विशेष आहे. त्यांच्या विचा-रांच्या स्पष्टतेमुळे आणि भूमिकेतील असंदिग्धतेमुळे त्यांच्या विवेचनात मोकळेपणा आलेला आहे.

डॉ. आनंद यादव म्हणतात त्याप्रमाणे या कथा समाजाच्या सर्वात खालच्या थरात असलेल्या आणि स्वतःला समाजाच्या समपातळीवर आणण्यासाठी धड-पडू पाहणाऱ्यांच्या व्यथावेदनांच्या आहेत हे खरे, परंतु या संग्रहातील तीन कथा 'तुऱ्याचा ऊस' (विजया जहागीरदार), 'प्राक्तन' (विजयकुमार नांगरे), 'काजळरात' (प्रकाश विनायक कामत) या मात्र ग्रामीणकथा या संज्ञेस पात्र ठरत नाहीत. पैकी 'तुऱ्याचा ऊस' ही कथा सांकेतिक आणि प्रतिगामी दृष्टिकोन बाळगणारी आहे, तर 'काजळरात' ही कथा मनोविश्लेषणात्मक आहे. 'प्राक्तन' ही कथा रोमँटिक गूढ वातावरण निर्माण करते.

इतर सर्व कथा ह्या मात्र अस्सल ग्रामीण आहेत. ह्या सर्व कथांना आत्मानुभवात्मक वास्तवाचे एक वेगळे अधिष्ठान लाभले आहे. त्यांचे चित्रण वास्तव आहे आणि आशयपूर्ण तपशीलाने नटलेले आहे. या कथांचे विषय कुतूहलजनक व असामान्य समाजनिरी-क्षणाने हुडकलेले नाहीत. ते नित्याच्या परिचयाचे व सामान्यांच्या आवाक्यातले आहेत. व म्हणूनच एका-परीने ते अधिक हृदयग्राही व निकडीचे आहेत. खेड्या-तील भोळीभाबडी अगतिक माणसे, त्यांच्या व्यथा, वेदना, व्याकुळता, अगतिकता आणि या सर्वांमधून सुटण्यासाठी चाललेली त्यांची जीवघेणी धडपड हा यापैकी बहुतेक कथांचा विषय आहे. माणसातला माणूस त्याचे उध्वस्त रूप, त्यांच्या मनातले नेमके दुःख या कथा उलगडून दाखवितात. ह्या सर्व कथा जीवनसन्मुख आहेत. जीवनाचे निरीक्षण, निरुपण आणि उन्नयन करणारे हे कथावाङ्मय उपेक्षितांची बाजू घेणारे आहे. जीवनाचे विविधरंगी रूप ह्या कथा आपणास दाखवितात. या कथांमधून जीवनात अपरि-हार्य ठरलेले, अंतरात आग पेटवून देणारे दुःखभोग वाट्याला आलेली माणसे भेटतात. (श्रीराम गुंदे-करांच्या 'उचेल' मधील सखादा, रामचंद्र आव-टोंच्या 'कोप' मधील वा, म्हाद्या, दे. शि. दुधलकरांच्या 'काळोख' मधील रखमा) तसेच शहरी असो की ग्रामीण, या पुरुषप्रधान व्यवस्थेची शिकार असलेली स्त्री किती अगतिक 'जीवन' जगते! पुरु-षाला ही व्यवस्था चारी वाटा मोकळ्या ठेवते पण स्त्रीला मात्र घर, दार, मुले यापैको कशावरच सत्ता सांगण्याची मुभा नाही. स्त्रीचे हे निराधार केविलवाणे जिणे बा. ग. केसकरांच्या 'कानकोंडी' कथेत दिसते. पाच भाकरीतील दोन भाकरी चोरीला गेल्या हा देवाचाच 'कोप' समजून तो भोगायला तयार झालेला रामचंद्र आवटेंचा 'कोप' मधील 'वा' पाहून मन कसे विषण्ण होते. या लोकांचे सारे व्यथाभोग भोगून भोगून संवेदनशून्य बनलेले मन हाही भोग अटळ मानून भोगण्याइतके जणू बधिरले आहे. सर्वसामान्य मुला-प्रमाणेच शिक्षणाची जबर ऊर्मी असलेला 'टोपी' मधील 'शामराव' दरिद्री परिस्थितीमुळे कसा विवश होतो. आणि ही भांडवलप्रधान व्यवस्था त्यालाच अशी टोपी घालते याचे अत्यंत हृद्य चित्रण 'टोपी' या कथेत आहे. बावनकुळे यांनी हा अतिसामान्यांच्या जीवनात खोलवर उतरून घेतलेला दुर्लक्षित जीवनाचा वेध सहृदय मनाचा थरकाप उडवितो. शिवाय साध्या शब्दातून प्रखर वास्तव सांगण्याची पारदर्शी निर्मळ शैली या कथेला लाभलेली असल्यामुळे तिची हृद्यता अधिक वाढली आहे. वामन होवाळांच्या 'पाऊसपाणी' कथेत लोकांच्या गरजेचा, अंधश्रद्धेचा फायदा घेऊन त्यांना लुबाडणाऱ्यांच्या स्वार्थी मनोवृत्तीचे चित्रण आहे. या स्वार्थांध लोकांचे उपहासात्मक चित्रण लख-लखीत वास्तवाचा स्पष्ट ठसा आपल्या मनावर उमट-विते. वर्गीय समाजरचनेचे स्वरूप दलित बुद्धिमंतांना वैयक्तिक आमिषे, प्रलोभने दाखवून त्यांच्या विरोधाची

धार कशी वोथट करून टाकते याचे सुंदर चित्रण 'कायद्याचे बाप' या मा. कृ. ताम्हणकरांच्या कथेत दिसते. ह्या व्यवस्थेत आर्थिक गुंतवणूक फायदेशीर ठरते आणि श्रमांची गुंतवणूक मात्र नुकसानकारक कशी ठरते यावर बेतलेली श्रीराम गुंदेकरांची 'उचेल' ही कथा आहे. या कथेतील प्रत्यक्ष नातेवाइकांचा नाती न मानण्याचा निष्ठूरपणा आणि त्यातील व्यंजना रसिकांच्या मनात वादळे निर्माण करते. मोहन पाटलांची 'नवी बॉडी' कथा ग्रामीण नेतृत्वालासुद्धा ग्रामीण जनतेचा विकास कसा नको ,असतो याचा रहस्यस्फोट करते. शिक्षणाची जबर ऊर्मी असलेल्या हुशार मुलाच्या आशाआकांक्षेच्या ठिकऱ्या परिस्थिती अशा उडविते याचे करुण चित्र 'ताण' या शरद मुंजवाडकरांच्या कथेत आहे.

या सर्व कथांचा विशेष हा की या कथांमधील व्यक्ती आपत्ती निमूटपणे प्रतिकार न करता सोसतात. कुठेही विरोध वा बंड ती करीत नाहीत. ती सारी पात्रे अगतिक, बेजार, गांजलेली व आतल्याआत कुढणारी आहेत. या कथांचे लेखक ज्या वर्गात जगतात त्या वर्गाच्या जाणिवा या कथांत चित्रित होतात. पण या वर्गाच्या दु:खाचे मूळ ज्या समाजव्यवस्थेत आहे त्या समाजव्यवस्थेत परिवर्तन झाले पाहिजे अशी भूमिका कथाकार घेताना दिसत नाही. खरेतर सामान्य माणसेच आपल्या श्रमातून हे जग निर्माण करीत असतात, आपल्या हातावर पेलत असतात. आणि वाटले तर हे जग उलथेपालथे करण्याचीही ताकद त्यांच्यात असते पण या सामर्थ्याची जाणीव मात्र त्यांना नाही. खरे म्हणजे तेच इतिहास घडवीत असतात. पण आपल्या या इतिहास घडविण्याच्या आणि नवनिर्मितीच्या शक्तीचा विसर त्यांना पडला आहे. हा आत्मशक्तीचा प्रत्यय जाणतेपणाने त्यांच्यात–या सामान्य कष्टकरी वर्गात–यावा यासाठी अशा पुस्तकाच्या प्रकाशनासारख्या प्रयत्नांची फार जरुरी होती. ग्रामीण साहित्यिक चळवळीचे झुंजार सूत्रधार डॉ. आनंद यादव यांचे कार्य अमोल आहे. कारण नवा स्वयंशासित समाज या निर्माण करण्याकरिता चळवळीचे जिवाभावाचे नाते आहे.

तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा /डॉ. आनंद यादव-बाबा पाटील मेहतापब्लिशिंग /हाऊस, पेरुगेटजवळ / पुणे ३० मूल्य रु. २५ /– △

'अवस्था' निसर्गाचे आधुनिक अध्यात्म बनविण्याचा स्तुत्य प्रयत्न

श्री. प्र. कुळकर्णी

निसर्गाचे अपरिमित चमत्कार व साक्षात्कार उपयोगात आणून मानवी समाजाच्या समस्यांची उकल करण्याची परंपरा संत ज्ञानेश्वरांच्या मराठीला तरी नवी नाही. आनंदाची बाब म्हणजे आजही अनेक कवी निसर्गदर्शनातून प्रतिभासंपन्न रूपकें व प्रतीके आपआपल्या कुवतीनुसार साकार करीत आहेत. अशा प्रयत्नात श्रीपाद गंगाधर कावळे ह्यांना अग्रस्थान मिळावे. अवस्था हा ह्या वैदर्भीय निसर्गकवीचा दुसरा काव्यसंग्रह. ह्या संग्रहातील प्रत्येक कविता निसर्गातील विविध अनुभूतीचा वापर करून साकार करण्यात आली आहे. तीव्र निरीक्षणशक्ती, निरक्षेप दृष्टिकोन, रुजलेली शब्दसंपदा वापरून कवीने समाजाच्या दुरवस्थेच्या विविध पैलूंचे शब्दांकन करीत असताना निसर्गजीवन व मानवी समाज ह्यांच्यातील साम्य-भेदांचे सूचक दर्शन घडविले आहे. आणि दुरवस्थेचे निराकरण करण्यासाठी निसर्गाकडे डोळसपणे पहा असा संदेश सर्वत्र पेरला आहे. "ही घनदाट अरण्ये बघ, गळघात गळा घालून, प्रत्येकात प्रत्येक विलीन, तेथे कुणीच नसतात दूरस्थ" एकात्मतेचा हा संदेश खचितच अरण्याच्या प्रतीकाने पटून जातो. किंवा "प्रौढ वृक्ष वस्त्रहीन, झाकून घेत लतावेलींचे हात शैशवाने वार्धक्याला दिलेले अभयदान" ह्या पंक्ती एकाकी वृद्धाची अवस्था आणि त्यावरील उपायाचे एकाचवेळी दर्शन घडवतात. अवस्थेतील प्रत्येक कवितेत असेच संकेत, संदेश आहेत. जगण्याची कला निसर्गाकडून कशी मिळवावी ह्याचे ते अध्यात्मच आहे.

बांधिलकी नाही–असे असले तरी ह्या अध्यात्मात विशिष्ट मतप्रणालींची बांधिलकी नाही. आग्रही प्रचार नाही. ते केवळ विश्लेषण आहे. दिसणाऱ्या गोष्टींचे. त्यामुळे कवीचा कृतीवर भर नाही असा आभास निर्माण होतो. पण कवीची भूमिका लक्षात घेतली तर "जेथे प्रश्नातच उत्तरे सामावली आहेत" तेथे "वाद, वितंडवाद ! कांगावा" करण्याची जरूर नाही हे पटावे. निसर्ग आपल्या प्रश्नाची उत्तरे आपणच शोधतो ती मानवाला पुरेशी आहेत

नेत्रोन सिद्धान्ताची गरज नाही असे कवीला प्रामाणिकपणे वाटते. नवे सिद्धान्त हे केवळ दिशाभूल आहे "प्रयेक दीप उजेडाचे सोंग । प्रत्येक नव्या गुढीला नवे वस्त्र सिद्धांताचे पण तीच दारे तेच तोरण" ही कवीची मनोभूमिका त्यावद्दल वाद असू शकेल पण जोपर्यंत अनेक सिद्धान्त आदर्श जीवन घडवायला अपुरे पडले आहेत तोपर्यंत कवीचेही ऐकायला हरकत नसावी.

मनाची स्पंदने–खरे तर कवीने आपल्या मनाची स्पंदनेच तेथे मांडली आहेत व कवीच्या वदललेल्या अवस्थेबरोबर मनाची दोलायमानेच वस्तुस्थिती होऊन काव्यात उतरली आहेत. "कुठवर लावाव्यात बागा, कुठवर बहर जोपासावे." किंवा "बोल फुटत नाहीत तोच अक्षरे मोडून जातात" असे खेदाने म्हणणारा कवी वाळूच्याही डोंगरांना जपायला सांगतो आणि "आज ना उद्या मौक्तिके बाहेर येतील" म्हणून धीर देतो. बोधीवृक्ष दिसलाच नाही म्हणून तक्रार करतो तर निसर्गातच सर्वज्ञतेची कल्पनाही करतो. कवीची अवस्था अंधारात फिरणाऱ्या मनस्वी माणसासारखी आहे. रातराणीचा सुंगध येताच 'आहा' म्हणून तो दाद देतो ठेच लागताच 'हाय' म्हणून व्याकूळतो. दोन्हीही अनुभूती सत्य आहेत. उगाच आशावाद-निराशावादाची बिरुदे पाहिजेतच कशाला?

निसर्गन्याय–वास्तवात संवेदनाशील कवी मनाकडून एकांतिकता अपेक्षिणे चूकच आहे. किडे टिपणाऱ्या पांढऱ्या बगळ्यांचेही प्रयोजन त्याला पटले आहे म्हणून पांढरपेशाच्या ह्या प्रतीकालाही संग्रहात मानाचे स्थान आहे. जसे खपणाऱ्या हातांनाही आहे. येथे उगाच काळे-गोरे शोधू नये.

निवेदन–ते आहे केवळ जाणवलेल्या, वाटलेल्या, कल्पिलेल्या अनुभवांचे सरल निवेदन. लय, गेयता, काव्यत्मकता असे कोणतेही यान हेतुपुरस्सर येथे जोपासले नाहीत. प्रतिभेचा स्पर्श शब्दापेक्षा विचारांनाच जास्त आहे. विचार संघर्षात कवी तत्त्वचिंतकाप्रमाणे गुंतला आहे आणि ही गुंतागुंत शब्दात मांडत सुटला आहे गद्य-पद्याची चिंता न करता. पण तशी चिंता ही नसावी ही तर एक अवस्था आहे. विचार संघर्ष पूर्णतेला पोहचला की वेदान्त तयार होतील व वेदान्ताचे आपले स्वतःचेच रस असतात ते शब्दांना आगळेच सौंदर्य व सुस्पष्टता प्रदान करतात. श्रीपाद गंगाधर ह्या प्रक्रियेच्या अगदी जवळ पोहचले आहेत ह्याचे अनेक पुरावे 'अवस्था' संग्रहात आहेत. गझल प्रकारात त्यांचे काव्यही खुलले आहे. "काय मी मागू कुणाला या इथे सारे भिकारी./ भक्ष्य मी शोधू कुठे या इथे सारे शिकारी" किंवा "स्वप्न होते सोबतीला । आजवरती । संपले, मी किती बोलू स्वतःशी । शब्दही कंटाळले ह्या पंक्तींनी त्याची साक्ष पटावी.

खरे मूल्य–अध्यात्मिक पिंडाच्या ह्या कवीचे प्रदीर्घ चिंतन आपल्यालाही विचारप्रवृत्त करवणारे आहे मनात झोपलेल्या देवांना जागे करणारे आहे. हे ह्या काव्याचे माझ्या दृष्टीने महत्त्वाचे मूल्य आहे. संग्राह्य असाच हा काव्यसंग्रह आहे. निखळ मनोरंजन नसेल पण मेंदूला आणि मनाला व्यभिचाराच्या यातनाही येथे नाहीत. सोज्ज्वळ पुस्तक म्हणून ते जवळ असावे. नेटका आकार आणि आकर्षक मुखपृष्ठ ह्यांनी पुस्तकाचे मूल्य सुसह्य व्हावे. संजय धोतरकरांची स्तुती करू नये असे ठरवले तरी ते उत्तम चित्रे काढतच राहतील व तो प्रस्तुत लेखकाचा दोष होऊ शकत नाही.

अवस्था /श्रीपाद गंगाधर कावळे/वसुधा प्रकाशन, नागपूर/मूल्य १५/– रुपये/पृष्ठे ८०.

△

परिवर्तनाचे प्रवाह

म. ना. लोही

'सकाळ' दैनिकाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त 'परिवर्तनाचे प्रवाह' हा ग्रंथ दैनिकाचे एक आधार स्तंभ श्री. श्री. ग. मुगणेकर यांनी सिद्ध केला आणि कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने प्रसिद्ध केला आहे. 'दैनिक सकाळ'ची सुरवात दि. १ जानेवारी १९३२ रोजी झाली. तेव्हापासून गेल्या वर्षाअखेरपर्यंत महाराष्ट्राच्या राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक जीवनात जी परिवर्तने घडून आली त्यांचे सम्यक् दर्शन घडवणारे सोळा लेख या ग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहेत. संपादक श्री. मुगणेकर यांनी 'सहप्रवास' या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे कुस्ती आणि चित्रपट या दोन विषयांवरील लेखांचा अभाव ही एक उणीव सोडल्यास हा एक चांगला संदर्भग्रंथ आहे.

अर्थात पन्नास वर्षांतील परिवर्तने तपशीलवार टिपण्या-इतपत लेखन स्थलाभावी शक्य नसल्याने केवळ प्रमुख प्रवाहांचे दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न लेखकांना करावा लागला. तरीही आहे या स्वरूपातही हा लेखसंग्रह मौलिक आहे हे निःसंशय !

महाराष्ट्राचे पहिले वेड राजकारणाचे. सामान्यतः १९३१ पासून अखिल भारतीय राजकारणाचे केन्द्र गांधीजींच्या वास्तव्यामुळे महाराष्ट्र हेच होते. स्वातंत्र्यपूर्व काळात आजचा महाराष्ट्र अस्तित्वात नसला तरी भौगोलिकदृष्टया गांधीजींची या काळातील कारकीर्द आजच्या महाराष्ट्रातच होती. १९६३ साला अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्षही लोकनायक अणे होते. त्यानंतर अखिल भारतीय राजकारणात महाराष्ट्र मागे पडला तो कायमचा. 'राजकारणाचे बदलते रंगरूप' या लेखात डॉ. य. दि. फडके यांनी १९३२ ते ८१ या काळातील राजकारणाचा आढावा घेताना भीडमुर्वत न ठेवता काही विधाने केली आहेत ती विचारार्ह आहेत. उदाहरणार्थ जानेवारी १९८० नंतरच्या काळात अन्य राज्याप्रमाणेच महाराष्ट्रातील मुख्यमंत्री आणि पक्षसंघटना ही श्रीमती गांधींच्या हातातील कळसूत्री बाहुली बनली आहेत, 'सगळेच राजकीय पक्ष चोर आहेत' कारण त्यांनी आपली विश्वासार्हता गमावली आहे; धर्मांतरानेही दलितांच्या बाबतीतली कोंडी फोडली गेली नाही इ.

देशाच्या औद्योगिक परिस्थितीबद्दल सर्वसामान्य माणूस तर सोडाच पण सुरक्षित मध्यमवर्गीयांनाही वस्तुस्थितीची कल्पना नसते. किर्लोस्कर उद्योगांचे संचालक श्री. शंतनूराव किर्लोस्कर यांचा 'उद्योग का वाढत नाही?' हा लेख बरेच काही सांगून जातो. आपल्या विवेचनात ते म्हणतात, 'भारताच्या जागतिक निर्यातीतील वाटा १९५० मध्ये २ टक्के होता तो आज ०.४ टक्क्यावर आला आहे. त्या दृष्टीने औद्योगिक प्रगतीबद्दल मी असमाधानी आहे.' लेखकाच्या मते औद्योगिक नियोजन म्हणजे नियंत्रणे असे समीकरण भारतात झाले आहे. परिणामी सरकारी उद्योगांचे क्षेत्र वाढले तरी हे उद्योग तोटयात आहेत. हा तोटा भरून काढण्यासाठी करवाढ केली जात आहे. वीस वर्षात चौपट झालेल्या करवाढीपैकी फारच थोडा पैसा नवीन साधनसंपत्ती निर्माण करण्यासाठी वापरला गेला. नियंत्रणामुळे भ्रष्टाचाराला ऊत आला आहे. समारोप करताना ते म्हणतात, सर्वात महत्त्वाची गरज उद्योगधंद्यांचे मनापासून स्वागत करणारा (सरकारचा) दृष्टिकोण ही आहे.'

देशातील उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने सहकारी उद्योग आणि कुशल कामगार या बाबी महत्त्वाच्या. त्यासंबंधात विचार करणारे दोन लेख या संग्रहात आहेत. श्री. गुलाबराव पाटील यांनी सहकारी तत्त्वावरील कारखान्यांची तरफदारी केली आहे. पण ज्या साखर उद्योगाने ते प्रभावित झाले त्या साखर उद्योगाचा विकास गेल्या काही वर्षांत विशेष सरकारी वरदहस्ताने आणि दारूच्या उत्पादनामुळे झालेला आहे हे विसरता येणार नाही. सहकारी उद्योगांनी आपमतलबी, सत्तालोलुप आणि स्वार्थांध बनले आहे. 'कामगार संघटन' या विषयावरील श्री. बगाराम तुळपुळे यांचा लेख नि:पक्षपातीपणे व पूर्वग्रह न ठेवता लिहिला आहे. अलीकडील काही वर्षात कामगार संघटना हुल्लडबाजीचा व हिंसाचाराचा अवलंब करून आपल्या मागण्या पूर्ण करून घेत आहेत अशी एक व्यथा लेखकाने व्यक्त केली आहे. मात्र गेल्या पाच महिन्यापासून मुंबईत शांतपणे चाललेला गिरणी कामगारांचा संप पाहिला की, डॉ. दत्ता सामंतांच्या नेतृत्वाचे कोणीही कौतुक करील. पुष्कळदा योग्य नेतृत्वाच्या अभावी प्रमाद घडतात.

महाराष्ट्राच्या गेल्या पन्नास वर्षांतील सामाजिक परिवर्तनाचा मागोवा घेणारा डॉ. बाबा आढाव यांचा 'समता-संघर्षाचा अडखळत प्रवास' हा लेख उद्बोधक आहे. 'पुणे करारा'पासून नामांतराच्या चळवळीपर्यंतचा इतिहास या लेखात अंतर्भूत आहे. या संपूर्ण काळाचा आलेख काढताना लेखक एक गोष्ट प्रामुख्याने नमूद करतो आणि ती म्हणजे या काळात राजकारणाने समाजकारण सामावून घेतले. जीवन तसे स्वतंत्र नसते. राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा कितीतरी अंगात ते मिसळलेले असते. म्हणून अर्धशतकाच्या समता संघर्षाचा प्रवास हा राजकीय घटनांच्या आधारे निवेदन करावा लागला आहे. या प्रवासात गांधी आणि आंबेडकर यांचे कार्य लक्षणीय असूनही नेमका त्यांच्यात तात्त्विक विरोध अखेरपर्यंत कायम राहिला. मूलभूत परिवर्तनाचे प्रश्न कोणत्या

कारणांमुळे आणि परिस्थितीत मागे राहिले, याचे चित्र लेखातून काटेकोरपणे उभे केले आहे.

स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या संदर्भात श्रीमती कमल पाध्ये यांनी काही मूलभूत विचार मांडले आहेत. 'स्त्री-मुक्तीच्या चळवळीला नेमकी दिशा अजूनही सापडत नाही. दिशाहीनतेने ती कधी स्त्रियांच्या राजकीय प्रश्नात तर कधी स्त्रियांच्या आर्थिक प्रश्नात घोटाळते आणि तिथेच अडखळून पडते. स्त्रीमुक्तीच्या अंतिम ध्येयाकडे ती सरकतच नाही. ही आजच्या स्त्रीमुक्ती लढ्याची शोकांतिका आहे. हा त्यांनी काढलेला निष्कर्ष महाराष्ट्रातील महिला कार्यकर्त्यांनी विचारात घेतला तर आंदोलनास निश्चित दिशा मिळू शकेल.

महाराष्ट्रात गेल्या पन्नास वर्षांत जरी अनेक सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिवर्तने घडून आलीत तरी आदिवासींची स्थिती काही फार सुधारलेली नाही. 'आदिवासींचे प्रश्न तेव्हा आणि आता' या लेखात श्रीमती कुसुम नारगोलकर या सर्वोदयी, आदिवासीत काम करणाऱ्या बाईंनी त्यांच्या समस्यांवर प्रकाश टाकला आहे. आजही आदिवासींचे शोषण थांबलेले नाही, फक्त शोषक बदलले, शोषणाचे स्वरूप बदलले, हे विदारक सत्य त्यांनी निदर्शनास आणले आहे.

याशिवाय महाराष्ट्रातील विद्याव्यासंग, प्राथमिक व उच्च शिक्षण, साहित्य, नाटय, लोकनाटय आणि संगीत या सर्व विषयांचा आढावा घेणारे सन्माननीयांचे लेख या संग्रहात समाविष्ट करण्यात आले आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (विद्याव्यासंग), प्राचार्य देवदत्त दाभोळकर (उच्च शिक्षण), डॉ. मो. ह. पिंपळखरे (प्राथमिक व माध्यमिक शिक्षण), डॉ. मो. वा. चिपळूणकर (विज्ञान), प्रा. भालचंद्र नेमाडे (साहित्य), श्री. वामनराव देशपांडे (संगीत), प्रा. भालबा केळकर (नाटय), श्री. अशोकजी परांजपे (लोकनाटय), प्रा. दि. ब. देवधर (क्रिकेट) ही नावे लक्षात घेतली तरी या संग्रहातील लेखांची गुणवत्ता, परामर्षाचा उच्च दर्जा आणि निष्कर्षांचा निर्भीडपणा याची सहज कल्पना येण्यासारखी आहे. विशेषत: श्री. ना. ग. गोरे यांची ग्रंथाला लाभलेली प्रस्तावना उल्लेखनीय आहे. 'थोडे भूतकाळात, थोडे भविष्यात' या शीर्षकाच्या प्रस्तावनालेखात समग्र महाराष्ट्रीय जीवनावर साक्षेपी दृष्टिक्षेप टाकणाऱ्या या लेखाने ग्रंथाच्या गुणवत्तेत मोलाची भर टाकली आहे. त्यांचे सडेतोड विचार अनेकांना रुचणारे नसले तरी त्याचा अर्थ सत्य हे कटू असते असाच घेतला पाहिजे. उदाहरणार्थ, त्यांची काही विधाने पाहा. 'आपण जेव्हा महाराष्ट्राचा विकास झाला, त्यातली संपत्ती वाढली, त्याची भरभराट झाली अशासारखी विधाने करतो तेव्हा ती सबंध महाराष्ट्राच्या संदर्भात केलेली असतच नाहीत. काही आंब्याची झाडे जशी एकदोन फांद्यापुरतीच बहरतात आणि बाकीचे झाड वांझ राहते तसे महाराष्ट्राचे सध्याचे रूप आहे.' किंवा 'आपल्यासमोर आव्हाने नाहीत, आदर्श नाहीत अशी कुरकूर सतत करणारे तरुण माझ्या मते एक खोटे तरी बोलत असतात किंवा भ्याडपणामुळे पळपुटेपणा तरी करीत असतात.'

'सकाळ' दैनिकाच्या रौप्य महोत्सवानिमित्त एक सुंदर व सर्वांगपरिपूर्ण (मर्यादित अर्थाने) ग्रंथ प्रकाशित करून 'सकाळ पेपर्स' आणि 'कॉन्टिनेन्टल प्रकाशन' यांनी एक चांगला व उपयुक्त उपक्रम केला आहे. नवीन अभ्यासक त्यांना निश्चित धन्यवाद देतील व त्याचे हार्दिक स्वागत करतील यात शंका नाही.

परिवर्तनाचे प्रवाह : महाराष्ट्र १९३८ ते १९८१ /संपादक-श्री. ग. मुणेकर/प्रकाशक कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे. पृष्ठे. ३२६ + १६ / मूल्य चाळीस रुपये.

△

संशोधन मुक्तावलि : सर दहावा

गु. वा. पिंपळापुरे

म. म. नानासाहेब मिराशी यांच्या संशोधनपर लेखांचा दहावा संग्रह विदर्भ संशोधन मंडळाने नुकता प्रकाशित केला. प्रस्तुत लेखसंग्रहाचे विमोचन देखील नुकतेच महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री ना. डॉ. बळीराम हिरे यांच्या हस्ते ना. ऊर्जामंत्री श्री. जयंतराव टिळक यांच्या उपस्थितीत पार पडले. डॉ. मिराशींचा पहिला संशोधन लेख संग्रह १९५४ साली प्रकाशित झाला.

आज त्या घटनेला उणीपुरी तीन दशके होत आहेत. नानासाहेबांचे वय देखील आता नव्वदीला टेकत आहे. अशा स्थितीत हा दहावा लेखसंग्रह म्हणजे 'कलश–कृति' म्हणायला प्रत्यवाय असू नये. नानासाहेबांची भावना देखील प्रस्तुत लेखसंग्रहाकडे पाहताना त्याच स्वरूपाची दिसते. एरव्ही, प्रस्तुत लेखसंग्रहात आपल्या समग्र संशोधनकार्याचे सिंहावलोकन करण्याचा विचार त्यांच्या मनाला शिवला नसता. 'कुर्वन्नेवेह कर्माणि' या धारणेनुसार कदाचित् यापुढेही काही मौलिक लेख त्यांच्या लेखणीतून उतरतील. परंतु प्रस्तुत कलश–कृतीवरील ती फारच तर, बिल्वपत्रे मानावी लागतील. कारण, पहिल्या लेखसंग्रहापासून आजच्या दहाव्या लेखसंग्रहापर्यंत सुमारे पावणे दोनशे लेख प्रकाशित झाले आहेत. हा काही लहान टप्पा नव्हे.

म. म. मिराशींनी आपल्या प्रत्येक लेखसंग्रहाला 'मुक्तावलि' असे अत्यंत गोंडस नाव दिले आहे. सकृद्दर्शनी मला तरी ते नाव लेखाच्या स्वरूपाशी व लेखकाच्या स्वभावाशीदेखील प्रतारणा करून चुकीने येऊन गेले असे वाटे. परंतु तसे ते नसावे. नानासाहेबांच्या संशोधनी वृत्तीतूनच ते स्फुरलेले आहे. मुक्तावलीच्या सहाव्या सरात सोड्ढलाच्या उदयसुन्दरीचा मिराशींनी परिचय करून देताना त्यातील पुढील पद्य उद्धृत केले.

एकैकशः प्रकीर्णैः मुक्तामणिभिः किमेभिरेभिस्तु ।
यं सृजसि हन्त हारं तस्यान्यः कोऽपि परिभोगः ।।

[विखुरलेले मोत्ये काय कामाचे ? मोत्यांचा जर काही हार असेल तरच त्याचा काही आगळा उपयोग !]

प्रायः या सुभाषितातून 'मुक्तावलि' नावाची व त्यातही सर एक, दोन इ. क्रमाने लेखसंग्रह ग्रंथरूपाने प्रकाशित करण्याची कल्पना म. म. मिराशींनी घेतली असेल.

नाव कुठूनही उचललेले असो मिराशींच्या प्रत्येक लेखावर व्यासंगाचे 'पाणी' तरळताना आढळते हे मात्र खोटे नाही. पहिल्या सरातील पहिल्याच लेखावर नानासाहेब मिराशींनी 'नामूलं लिख्यते किंचित् नानपेक्षितमुच्यते' असे मल्लिनाथी घोषवाक्य टाकले आहे. डॉ. श्री. व्यं. केतकरांसारख्या मातब्बर लेखकांच्या विधानांचा समाचार घेण्यासाठी लिहिलेला तो पहिला लेख त्यामुळे प्रस्तुत घोषवाक्य मुद्दाम शीर्षभागी टाकण्याची मिराशींना आवश्यकता वाटली असेल. आतापर्यंतच्या सर्वच लेखसंग्रहातील लेख असे उत्तरादाखल लिहिलेले नसले तरी एकदा घेतलेली साधार लिहिण्याची प्रतिज्ञा मात्र आतापर्यंत नानासाहेबांनी काटेकोर पाळली आहे. त्यांचे काही निष्कर्ष इतरांना कदाचित मान्य होणार नाहीत. एवढेच काय, स्वतःचेच काही निष्कर्ष मिराशींनी पुढे बदललेही आहेत. 'वल्ख' हे रुद्रदास–स्वामीदास प्रभृती राजवंशाचे राजधानीचे ठिकाण जळगाव किंवा पूर्व खानदेशामधील 'वाघळी' असावे असा लेखकाचा तर्क होता. नवा पुरावा पुढे येताच ही राजधानी नर्मदेच्या दक्षिणतीरावर हलविण्यात आली आहे. [सर दहा : वल्खच्या महाराजांचे मनावर येथील तीन ताम्रपट पृ. ४३] प्रमाणशरण असणाऱ्या लेखकाला इतका निःसंकोचपणा ठेवावाच लागतो. प्रस्तुत लेखसंग्रहात दुसरीकडेही–'चारुदत्त नाटक भासाचे नव्हे' या लेखात असाच प्रांजळपणा मिराशींनी व्यक्त केला आहे. ते म्हणतात–

[सध्याच्या परिस्थितीत हे केवळ अनुमान आहे. भविष्याच्या उदरात काय आहे कोणी सांगावे ? पूर्वोक्त पृ. २२]

येथे ओघाने एक लहानशी शंका व्यक्त करावीशी वाटते. वल्ख–राजवंशीय लोक मांडलिक होते असे सांगताना लेखक 'परमभट्टारकपादानुध्यात' या, ताम्रपटावर कोरलेल्या बिरूदाकडे लक्ष वेधून त्याचा 'सम्राटाच्या पायाचे चिंतन करणारे' असा अर्थ देतात. 'अनुध्यात' हे भूतकालवाचक कर्मणि कृदन्त असल्याने 'सम्राटाच्या पायाच्या मागोमाग ज्यांचे चिंतन होत आले आहे' असा अर्थ केल्यास काय अडचण आहे ? या नव्या अर्थव्यवस्थेने 'मांडलिक' हा अर्थ ध्वनित व्हायलादेखील अडचण येऊ नये असे वाटते.

प्रस्तुत लेखसंग्रहात एकूण लेख बारा. आजवरच्या संग्रहात इतकी कमी लेखसंख्या असलेला हाच पहिला संग्रह. त्यातही बहुतांश लेख–आठ. लेख प्राचीन भारतीय इतिहासाला वाहिले आहेत. हा विषय नानासाहेबांचा खासच अधिकारातील विषय

असल्याने या प्रांतात ते अधिक रमताना आढळतात. किंबहुना, 'संस्कृत–वाङ्मय' व 'संकीर्ण विषय' असे लेखांचे दोन वेगळे स्वतंत्र वर्ग जरी लेखकाने उल्लेखिलेले असले तरी त्याही ठिकाणी वाङ्मयीन समीक्षणाऐवजी ऐतिहासिक दृष्टीचाच अधिक वापर म. म. मिराशींना अभिप्रेत असतो. या दृष्टीने 'रामायणातील कुशावतीचा शोध' हा लेख संग्रहातील पहिला लेख तर 'ज्ञानेश्वरीचे जन्मस्थान नेवासे याची पूर्वपरंपरा' हा शेवटच्या लेख अभ्यसनीय आहे.

प्रस्तुत लेखसंग्रहाच्या या आदि–अंतावरून केवढा विस्तृत काल-खंड अभ्यास विषय म्हणून मिराशींनी निवडला आहे हे लक्षात येते. रामायण–महाभारताचा काळ लक्षात न घेता विचार करायचा झाल्यास साधारणत: ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकापासून तर ख्रितोत्तर बारा तेरा शतकापर्यंतचा इतिहास धुंडाळायला मिराशी निघाले आहेत हे स्पष्ट दिसते. या प्रदीर्घ काळाचा मागोवा घ्यायचा म्हणजे अत्यंत जिकीरीचे काम. ताम्रपट–नाणी इ. सामग्री अजूनही जमिनीच्या पोटात किंवा कुठेतरी अडगणीत पडून असलेली. अशा स्थितीत दृष्टीत जणू काही सिद्धज्जन घालून जुने पुराने शोधून नवे नवे निष्कर्ष पुढे आणायचे व जुने निष्कर्ष सुधारून पुढे मांडायचे ही संशोधनाची संतत प्रक्रिया नानासाहेबांनी साक्षेपाने जोपासली आहे असे या दहाव्या सरावरूनदेखील आढळून येते. उदाहरणच द्यायचे झाल्यास 'गौतमीपुत्र सातकर्णीचे पुत्र किती व कोण' या लेखाचे देता येईल· वासिष्ठीपुत्र विजय सातकर्णी व वासिष्ठीपुत्र सातकर्णी या दोन व्यक्ती एकच होत अशी भूमिका म. म. मिराशींनी आपल्या, 'सातवाहन व पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख' या ग्रंथातही घेतली होती. परंतु या दोन व्यक्तींची चांदीची स्वतंत्र नाणी उपलब्ध होताच या दोन व्यक्ती म्हणजे दोघे भाऊ होते असा विचार मिराशींनी प्रस्तुत लेखसंग्रहात मांडला आहे–नानासाहेबांचे फुटकळ लेख व ग्रंथ एकाच विषयाला वाहिलेले असले तरी त्यातील निष्कर्ष नवीन आहेत हा या संदर्भातील महत्त्वाचा भाग या ठिकाणी ध्यानात ठेवला पाहिजे. फुटकळ लेखामुळे ग्रंथ किंवा ग्रंथामुळे फुटकळ लेख गतार्थ होण्याची इथे भीती नाही.

प्राचीन इतिहासाच्या पुराव्याची छाननी करताना देखील किती जागरूक असावे लागते याचाही सुंदर किस्सा प्रस्तुत लेखसंग्रहात मिराशींनी घालून दिला आहे. शिवस्वामी ब्राह्मणाला दिलेल्या दोन सारख्याच ताम्रपटावर 'त्रैकूटकानां' आणि 'कटच्चुरीणां' हेच तेवढे शब्द वेगळे का असावे या संबंधी म. म. मिराशींनी दिलेला तर्क (पृ. १५० सर दहावा) अथवा ह्यूएन्तंगसारख्या विश्वसनीय समजल्या जाणाऱ्या प्रवाश्याविषयी तो थापेबाज होता हे मिराशींनी केलेले साधार विधान किंवा पुलकेशीचा आंध्रप्रदेशाधिपती भाऊ विष्णुवर्धन याचा, तिम्पपुर ताम्रपटात 'महाराज' या बिरूदाशिवाय उल्लेख तर नंतरच्या चिपुरपल्ली ताम्रपटात 'महाराज' बिरूदाचा उल्लेख यासंबंधी मिराशींनी दिलेला तर्क (पृ. ११२ सर दहा) या दृष्टीने अभ्यासकांनी अभ्यासण्याजोगे आहेत.

साधारण वाचकाला असले संशोधकी लेख शुष्कचर्यारूप वाटतात. परंतु संशोधक, सत्यान्वेषणाच्या उदात्त हेतूने प्रेरित होऊन इतिहास काळातील व्यक्तीला आणि वस्तूला न्याय द्यायला निघालेला असतो हे आम्ही लक्षात घेत नाही. निदान, मिराशींची तरी तशी शुद्ध भूमिका आहे. म्हणूनच, हूणविजेता यशोधर्मन्‌विषयी ते स्पष्टच म्हणतात–

'हूणावरील त्याच्या विजयाच्या श्रेयात दुसरा कोणीही भागीदार नव्हता हे सविस्तर व साधार दाखवून मी यशोधर्मन्‌ला न्याय मिळवून दिला आहे.' [पृ. १७५ सर दहा]

न्याय संपादनासोबत मिराशींच्या लेखनामागील दुसरी बलवत्तर प्रेरणा आहे ऋण फेडण्याची. मिराशींचा जन्म कोकणातील. शिक्षण कोल्हापुरला व कर्मभूमी विदर्भ. या तीनही प्रदेशाशी निगडित असणारे प्राचीन राजवंश, साहित्य आणि घटना यांचा सतत व सखोल अभ्यास करून पुन: त्यांना उजेडात आणून आपण ऋणमुक्त झालो आहोत ही मिराशींची धारणा आहे. या त्यांच्या प्रयत्नाने विदर्भभूमी तर विशेषच उजळून निघाली यात शंका नाही. आज म. म. मिराशींचे नाव निघताच राष्ट्रकूट–वाकाटक ही राजघराणी फिरून विदर्भात प्रवासाला आली आहेत आणि गुणाढ्य, सर्वसेन, प्रवरसेन, दण्डी–राजशेखर.

प्रभृती साहित्यिक साहित्यसंसेलनानिमित्त विदर्भात आले असून राजमंचावर अगोदरच विराजमान असलेल्या कालिदास–भवभूतीशी साहित्यसंवाद करण्यात गुंतले आहेत असा भास होतो.

हे सारे 'पुनर्वसन' घडवून म. म. मिराशी स्वतः ऋणमुक्त झाले असले तरी त्यांनी एक नवे ऋण येथील अभ्यासकांवर आणून टाकले आहे. म. म. मिराशींच्या इतिहास–संशोधनाचा वारसा पुढे चालविणे हाच त्या ऋणातून मुक्त होण्याचा पर्याय होऊ शकतो.

विदर्भ संशोधन मंडळाने म. म. मिराशींचा हा दहावा लेखसंग्रह प्रकाशित करून अभ्यासकांना ऋणाईत करून ठेवले आहे यात शंकाच नाही. ज्यांना थोरले ग्रंथ हाताशी घेऊन इतिहासकाळात शिरण्याचे अवघड जात असेल त्यांना म. म. मिराशींच्या दहाही मुक्तावली सरातील 'मुक्तके–' हाती घेऊन तेच काम सुखाने करता येईल.

संशोधन मुक्तावलि : सर दहावा /लेखक : डॉ. वा. वि. मिराशी /प्रकाशक : विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर /मूल्य रुपये ८

△ △ △

आपल्या साहित्यसहकार्याचे आम्ही स्वागत करतो. संशोधनलेख, कथा, कविता, नोंदी, लेखांवरील प्रतिक्रिया. प्रदीर्घ लेख पाठविण्यापूर्वी विषयाचा आवाका कळवावा.

प्राचीन–अर्वाचीन वाङ्मय, शिल्प, चित्र, संगीत, नृत्य, नाटक, साहित्यातील नव्या वाटा, अन्य भाषांमधील वाङ्मयप्रवाह इत्यादींचे गंभीर संशोधन युगवाणीला हवे आहे.

लिखाण कागदाच्या एका बाजूने, पुरेसे पोस्टेज हवेच. कविता परत पाठविता येणार नाहीत. स्थळप्रत जवळ ठेवावी.

संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, सीताबर्डी, नागपूर–१२

वणी येथील आदिवासी साहित्य संमेलन

वणी येथे दि. २३ व २४ मे १९८२ रोजी आदिवासी साहित्य संमेलन थाटात पार पडले. प्रथम आदिवासी साहित्य संमेलन चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती येथे दि. १० व ११ नोव्हेंबर १९७९ रोजी झाले होते. पुढील संमेलन भंडारा येथे १९८३ मध्ये व्हावयाचे आहे.

वणी संमेलनाची दखल वृत्तपत्रीय दृष्टीने हवी तशी घेतली नसली तरी जाणकारांनी दखल घ्यावी अशा अनेक गोष्टी या संमेलनात घडल्या. रावसाहेब कसबे, प्रा. वडस्कर व वामन इंगळे या दलित वा जन-साहित्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वक्त्यांनी या वेळी प्रभावी भाषणे केली. तरीही ह्यांच्यापैकी कुणीही आदिवासी साहित्याचे प्रवक्तेपण करू शकत नाहीत, हे शंकातीत रीतीने सिद्ध झाले. याउलट सर्वश्री ऋषी मसराम, व्यंकटेश आत्राम, विनायक तुमराम व नेताजी राजगडकर यांच्या भाषणांमधून मात्र आदिवासी मन आपल्या व्यथा, वेदना निःसंकोचपणे व्यक्त करीत आहे याची जाणीव पदोपदी होत होती. यापैकी पहिल्या तिघांनी आपल्या विषयांची तयारी इतकी कसून केली होती व इतकी माहिती (data) जमा केली होती की तिच्या जोरावर ते एकएक शोध-निबंध सहज वाचू शकले असते. आवेशी व लफ्फेबाज भाषणे ऐकण्याची सवय असलेल्या मनांना ही अनोखी वस्तुस्थिती धक्का देऊन गेली.

दलित साहित्य, जनसाहित्य वा पुरोगामी साहित्य यासारख्या वाङमयीन चळवळींचे बोट धरूनच आदिवासी साहित्य चळवळीची वाटचाल सुरू झालेली आहे असा निर्वाळा संयोजकांनी पुनःपुन्हा दिला आणि तरीही या सर्व चळवळींना त्यांनी गुन्हेगारांच्या पिंजऱ्यात उभे केले व तुम्ही आमच्यासाठी काय केले ? असा रोकडा सवाल केला. अन्य राष्ट्रीय चळवळींच्या वा उपक्रमांच्या संदर्भातसुद्धा त्यांनी हाच प्रश्न विचारून सर्वांना निरुत्तर केले. महात्मा फुले, महात्मा गांधी व डॉ. आंबेडकर या महात्म्यांचे महत्व कमी न लेखताही त्यांनी आदिवासींसाठी मात्र काहीच केले नाही, असे ठणकावून सांगितले व आमची वाट आम्हालाच शोधावी लागेल अशी ग्वाही दिली.

दलित साहित्य इतिहास नाकारते. भविष्य घडविण्याची उज्ज्वल स्वप्ने पाहते. आदिवासी मनाला मात्र आपल्या गौरवशाली इतिहासाचा खूप अभिमान वाटतो. परकीय आर्य आक्रमकांनी आपल्याला वन-वासी केले व त्यातून बाहेर पडण्यासाठी सर्वकष स्वरूपाचा संगर आपल्याला करावयाचा आहे, याचे पूर्ण भान संमेलनात व्यक्त झाले.

आदिवासी साहित्यिक क्रांतीची भाषा बोलत असले तरी ती एकांगी वाटत नाही. प्रस्थापित व्यव-स्थेवर प्रहार करीत असतानाच आपल्या उज्ज्वल परंपरांचे जतन व्हावयास हवे, अशी दुहेरी जाणीव त्यांच्या साहित्यातून व्यक्त होते.

या संमेलनाच्या निमित्ताने एक स्मरणिका व 'मोहोल' नावाचा आदिवासी कवींचा एक प्राति-निधिक संग्रह ह्यांचे प्रकाशन करण्यात आले. स्मर-णिकेचे स्वरूप जाहिरातींच्या मार्फत निधी जमा करणाऱ्या पारंपारिक स्मरणिकेचे नव्हते. तो एक महत्त्वाचा दस्तावेज ठरावा अशा तोलामोलाचे लेख तीत समाविष्ट आहेत. संपादक श्री. बाबुराव आडे यांचे प्रास्ताविक तसेच नेताजी राजगडकर (आदि-वासी साहित्य : जाणीव आणि प्रेरणा), व्यंकटेश आत्राम (गोंडांचे कलाजीवन), प्रा. श्री. रा. भिलव-डीकर (भिल्ल–खरी आंतरराष्ट्रीय आदिवासी जमात) यांचे लेख आदिवासी साहित्याचे संदर्भसाहित्य म्हणून नेहमीसाठी उपयोगी पडावेत एवढ्या मोलाचे आहेत.

'मोहोळ' या कवितासंग्रहातील प्रतिभेचे दर्शनसुद्धा असेच चकित करणारे आहे. यापैकी काही कवितांवर दलित कवितेची छाप जाणवत असली तरी ती सोबतच तिची पृथगात्मतासुद्धा स्पष्टपणे

दृग्गोचर होते. यांपैकी भुजंग मेश्राम, अमित गिरडकर, प्रभु राजगडकर व डॉ. नीलकांत कुलसंगे ह्यांच्या कविता खूप अपेक्षा वाढविणाऱ्या वाटल्या.

संमेलन प्रसंगी आयोजिण्यात आलेले 'पोस्टर पोएट्री 'चे प्रदर्शनसुद्धा असेच धक्का देऊन गेले. अमित गिरडकरांच्या बोलक्या चित्रांनी नटलेल्या उपरोल्लिखित तीन कविंच्या कविता खूप प्रभाव पाडून गेल्या.

आणखी एका अतिशय महत्त्वाच्या गोष्टीची नोंद इथे घ्यावयास हवी. हे संमेलन यशस्वी करण्यासाठी राजाभाऊ राजगडकरांनी जिवापाड श्रम घ्यावेत ही गोष्ट अपेक्षितच होती. परंतु बाबूराव कोवळे व प्रा. चिंतामणी ताकसांडे या दलित कार्यकर्त्यांनी हे कार्य आपलेच समजून आपल्या आदिवासी बंधूंइतकेच परिश्रम घेतले. आमदार बापूराव पानघाटे व प्राचार्य राम शेवाळकर यांनीही संमेलनासाठी सक्रिय सहकार्य दिले. परंतु आदिवासी व दलित बंधूंनी हे संमेलन जसे काही भावाभावांचे आहे असे समजून कार्य केले.

या मुद्याचे महत्त्व सामाजिक दृष्टीने फार मोठे आहे. राष्ट्रीय जीवनात सीमारेषांवर असलेल्या या दोन घटकांना एकमेकांबद्दल खूप जिव्हाळा वाटावा यात आश्चर्य काहीच नाही. परंतु पुरोगामित्वाचे दावे करणाऱ्या अन्य जनांनी मात्र या सबंध हालचालींकडे सुरवातीला patronising पद्धतीने व नंतर विरोधी भावनेने पाहावे हे एकंदर राष्ट्रीय जीवनाच्या सोडाच पण त्यांच्या स्वत:च्याही हितसंबंधाच्या दृष्टीने फारसे इष्ट नाही.

ह्याला आणखी एक कारण आहे. दलित साहित्य, जनसाहित्य, ग्रामीण साहित्य वा आदिवासी साहित्य यासारख्या चळवळी समाजातील उपेक्षित वर्गांच्या केवळ आत्मप्रकटीकरणाच्या चळवळी नाहीत तर संस्कृतीकरणाच्या चळवळी आहेत. उपेक्षित वर्गांचे आत्मप्रकटीकरण अनादी कालापासून लोकसाहित्याच्या माध्यमातून अव्याहतपणे सुरू आहे. परंतु ही अभिव्यक्ती आपल्या पृथगात्म संस्कृतीचा जाणीवपूर्वक ठसा उमटवावा या भावनेतून होत नव्हती. आधुनिक प्रबोधनयुगाच्या उदयानंतर उपेक्षित समाजघटकांना जसजसे आत्मभान येऊ लागले तसतसे संस्कृतीचे खरे निर्माते आपणच आहोत ही जाणीव त्यांना होऊ लागली. समाजातील बलदंड वर्ग तीवर आपले लेबल चिकटवतो व संस्कृतीचा ठेकेदार म्हणून मिरवतो. ही गोष्ट नवजागृत वर्गांना आता सहन होत नाही. मराठीतील या नवीन वाङ्मयीन चळवळी म्हणजे आपल्या संस्कृतीची वेगळी निशाणे उभारण्याचा प्रयत्न होय.

परंतु यातून काही अडचणी निर्माण होतात. सुधाकर गायधनींच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कवी संमेलनात ह्याचा ठळक प्रत्यय आला. गायधनी व वामन इंगळे ह्यांच्या कविता सबंध शोषित समाजाची व्यथा व्यक्त करतात. आणि तरीही दलित व आदिवासी समाजांना ती कविता पूर्णांशाने आपली वाटत नाही. याउलट दलित–आदिवासी कविता आपल्या विशिष्ट परिघात खूप प्रभावी वाटत असली तरी सबंध शोषित वर्गाच्या व्यथा–आकांक्षा व्यक्त करण्यास असमर्थ ठरते.

हे अपयश या विशिष्ट कवींचे नसून या व्यवस्थेचे आहे. प्रस्थापित वर्गांकडून ज्या महाभागांची भलावण राष्ट्रीय साहित्यिक म्हणून होते त्यांच्याबद्दलही वंचित वर्गांना काहीच आपुलकी वाटत नाही. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो तो व्यवस्था बदलण्याचा. आपल्या पृथगात्म संस्कृतींचा पुकार करीत असतानाच परिवर्तनाकांक्षी व्यासपीठावर एकत्र येण्याची गरज वणी संमेलनाने अधोरेखित केली.

या संमेलनाने किमान २०–२५ कवी–लेखकांना समोर आणले. ही मंडळी आदिवासींमधील उच्च स्तरातली आहेत. या स्तरात आणि आदिवासींच्या वनवासी स्तरात खूप मोठी दरी अस्तित्वात आहे. प्रस्थापितांच्या मोहमयी दुनियेला ही मंडळी भुलली नाहीत तर ही दरी त्यांना कमी करता येईल. सर्वांना समानसंधी देणाऱ्या नव्या व्यवस्थेची निर्मिती ही फार दूरची गोष्ट झाली. तूर्तास आदिवासींची दु:स्थिती राष्ट्रीय संवेदनशीलतेच्या परिघात आणता आली तरी आदिवासींच्या स्वतंत्र वाङ्मयीन चळवळीने खूप काही साध्य केले असे म्हणता येईल.

वणी संमेलनाने या अपेक्षा निश्चितच निर्माण केल्या आहेत.

या. वा. वडस्कर

△

कार्यवृत्त

अ. ल. लिमये

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ

मे–जुन–जुलै १९८२

दि. १–५–१९८२ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त प्रा. सुरेन्द्र देशपांडे रचित व श्री. पुरुषोत्तम सामंत दिग्दर्शित शिवगीत गायनाचा कार्यक्रम सकाळी ९ वाजता टिळक सभागृहात पार पडला. कै. नाना जोग स्मृती दिनानिमित्त विदर्भ साहित्य संघातर्फे विदर्भाचे विख्यात गायक व संगीत दिग्दर्शक श्री. विनायकराव अंभईकर यांचा सत्कार व गायनाचा कार्यक्रम रात्री ९ वाजता धनवटे रंगमंदिरात पार पडला.

दि. १०–५–१९८२ रोजी विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष कविवर्य आ. रा. देशपांडे उर्फ अनिल यांच्या निधनाबद्दल सायंकाळी ६–३० वाजता गडकरी सभागृहामध्ये शोक सभा घेण्यात आली. ह्या प्रसंगी डॉ. वि. भि. कोलते, प्रा के. ज. पुरोहित, डॉ. द. भि. कुळकर्णी, भाऊ समर्थ ह्यांची भाषणे झालीत.

कै. साने गुरुजी, आचार्य अत्रे, अच्युतराव कोल्हटकर, कै. अण्णासाहेब खापर्डे यांचे स्मृतिदिन साजरे करण्यात आले. दादासाहेब ओगले यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस श्री. मदन गडकरी यांनी पुष्पहार घालून त्यांचा जन्मदिन साजरा करण्यात आला.

दि. २–६–१९८२ रोजी विदर्भ साहित्य संघ व महाराष्ट्र मराठी नाटय परिषद नागपूर शाखेच्या वतीने मराठी रंगभूमी व सिनेसृष्टीतील विख्यात नट, नागपूरचे श्री. गणेश सोळंकी यांच्या दुःखद निधनानिमित्त शोकसभा बुधवार दिनांक २–६–८२ रोजी सायंकाळी ६–३० वाजता घेण्यात आली. या सभेचे अध्यक्षस्थानी वि. सा. संघाचे अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर हे होते. सर्वश्री दिनकर देशपांडे, मदन गडकरी, भाऊसाहेब सप्रे, अ. ल. लिमये व राजा पाठक ह्यांनी ह्या प्रसंगी आपल्या शोक संवेदना व्यक्त केल्या.

दि. १२ व १३ जुलै १९८२ रोजी एम. फिल्‌च्या विद्यार्थीनींसाठी 'ज्ञानेश्वरी' या विषयावर सौ. नीलाताई जोशीराव यांचे १२ व १३ जुलै रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

एम. फिल्‌च्या विद्यार्थीनींना अभ्यास करण्यासाठी संदर्भ ग्रंथांची व १२ तास ग्रंथालय उघडे ठेवण्याची विशेष व्यवस्था यंदा करण्यात आली होती.

दि. १७–७–८२ रोजी कै. वीर वामनराव जोशी यांच्या प्रतिमेचा अनावरण समारोह दि. १७ जुलै ८२ रोजी ६–३० वाजता धनवटे रंगमंदिरात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध नाटककार आणि दै. लोकसत्तेचे संपादक श्री. विद्याधर गोखले यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

दि. २५–७–८२ रोजी विदर्भ साहित्य संघ कार्यकारी मंडळाची दुसरी सभा वि. सा. संघाचे अध्यक्ष डॉ. मधुकरराव आष्टीकर यांचे अध्यक्षतेखाली सकाळी ९–३० वाजता अध्यक्षांचे कक्षात संपन्न झाली.

वि. सा. संघाच्या सभासदांची वार्षिक आम सभा सायंकाळी ४–३० वाजता दिनांक २५–७–८२ रोजी गडकरी सभागृहात डॉ. मधुकरराव आष्टीकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

शाखावृत्त

(मे-जून-जुलै १९८२)

शाखा लाखनी दि. ३० व ३१ मे १९८२

वि. सा. संघ शाखा लाखनीच्या तर्फे 'रामायणातील व्यक्तिरेखा' या विषयावर प्राचार्य राम शेवाळकरांची तीन व्याख्याने झालीत. त्यांनी रामायण हे मानवी मूल्याचे आदर्श असल्याचे सांगितले. आदर्श राजा राम, आदर्श पत्नी सीता व आदर्श बंधू लक्ष्मण या तीन व्यक्तिरेखा आपल्या व्याख्यानातून त्यांनी प्रत्यक्षात उभ्या केल्या.

दि १७-५-१९८२

वि. सा. संघ शाखा लाखनी तर्फे सभा घेण्यात आली व तीत मराठीचे सुप्रसिद्ध साहित्यिक व प्रयोगशील कवी आ. रा. देशपांडे उपाख्य कवी अनिल यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण करून दुखवटयाच्या प्रस्ताव पारित करण्यात आला.

शाखा आकोट १७-५-१९८२

वि. सा. संघ शाखा आकोट तर्फे आ. रा. देशपांडे उपाख्य कवि अनिल ह्यांच्या निधनाबद्दल शोकसभा घेऊन दुखवटयाचा ठराव पारित करण्यात आला.

शाखा ब्रह्मपुरी १३-५-१९८२

वि. सा. संघ शाखा ब्रह्मपुरी तर्फे आ. रा. देशपांडे उपाख्य कवि अनिल यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ह्या सभेच्या अध्यक्षस्थानी श्री. ओ. न. शिनखेडे हे होते.

प्रारंभी कै. अनिलांनी लिहिलेल्या दोन गीतांच्या कॅसेटस् ऐकविण्यात आल्यात. डॉ. नरेन्द्र पोफळी यांचे अनिलांच्या जीवनकार्यावर भाषण झाले. याप्रसंगी डॉ. पोफळी यांनी अनिलांची निरनिराळी प्रकाशित पुस्तके, चित्रे, हस्ताक्षर इत्यादींची माहिती उपस्थितांना दिली. ह्यानंतर एक शोकप्रस्ताव पारित करण्यात आला.

दि २-५-१९८२

वि. सा. संघ ब्रह्मपुरी शाखेची आम सभा रविवार दिनांक २ मे १९८२ रोजी सकाळी लो. टि. वाचनालयात पार पडली. अध्यक्षस्थानी शाखाध्यक्ष श्री. वसंत भाई हे होते. या सभेत शाखेचे मार्च १९८२ अखेरचे 'हिशेब' हिशेब तपासनीस प्रा. श्री. ना. बा. कोरान्ने यांनी तपासून समाधानकारक शेरा दिला. ताळेबंदासह सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

ह्या सभेत साहित्य व सांस्कृतिक चळवळीत स्थैर्य प्राप्त होण्याकरिता ब्रह्मपुरीस जिल्ह्याचा दर्जा प्राप्त व्हावा ही मागणी करणारा ठराव एकमताने पारित करण्यात आला.

१८-७-१९८२ रोजी विदर्भ साहित्य संघ शाखा नेरची सभा झाली व १९८२-८३ करित पुढील कार्यकारणीची निवड करण्यात आली.

अध्यक्ष : श्री. ना. द. मिसाळ
उपाध्यक्ष : श्री. दादासाहेब चिलजवार

सरचिटणीस : श्री. श्रीरंग मोळे
सहचिटणीस : श्री. विलास राखडे
,, : श्री. एस. आर. मोहोड
खजीनदार : श्री. सुधीर कुळकर्णी
सदस्य
१. श्री. ब. दि. पांडे
२. सौ. सुधा कुळकर्णी
३. सौ. वत्सला बनसोड
४. श्री. राजाभाऊ कोरडे
५. श्री. मा. वि. उपाख्य बापू पाटील
६. श्री. अजित बापट
७. डॉ. मोहन शर्मा
८. श्री. प्रकाश दर्णे
९. प्रा. पंडितराव पांडे
१०. श्री. दत्तात्रय बिजवे
११. श्री. भैया साहेब देशमुख
१२. सौ. शालिनी बुराडे
१३. सौ. सुधा नेवतीकर

वि. सा. संघ शाखा मुलची वार्षिक सभा दि. २८–७–८२ ला घेण्यात आली. १९८२–८३ वर्षासाठी कार्यकारिणीची निवड करण्यात आली. अध्यक्ष–प्राचार्य श्री. वि. ना. धोटे, उपाध्यक्ष–श्री. धनजीभाई शाह व श्री. डॉ. रा. ग. बोकारे, चिटणीस–श्री. शशिकांत धर्माधिकारी, सह-चिटणीस–श्री. नरेन्द्र उपलप, कोषाध्यक्ष–गो. पो. कोंडेकर, संचालक परिक्षा समिती–श्री. प्रा. ते. क. कापगते. शिवाय श्री. द. का. नागोशे, श्री. हि. रा. येरोजवार, श्री. वामन अंबूलकर, प्रा. जगनाडे, श्री. प्रा. आपटे व श्रीमती करुणा वोडखे यांची कार्यकारिणी सदस्य म्हणून बिन-विरोध निवड झाली.

△ △ △

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

विक्रीस तयार असलेली प्रकाशने

	पुस्तके	किंमत
१	कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह, भाग २	६–००
२	दि. वेदस्थान ऑफ दि एन्शन्ट होम ऑफ दि इन्डो आर्यन्स : ले. कै. डॉ. तु. ज. केदार	६–००
३	प्रयोगक्षम मराठी नाटके : डॉ. मु. श्री. कानडे	३०–००
४	मराठी वर्णोच्चार विकास : डॉ. द. ह. अग्निहोत्री	३२–००
५	लोकसाहित्य संपदा : ना. रा. शेंडे	१२–००
६	केशवसुत वाङ्मय सूची : सौ. उज्ज्वला अयाचित	२–००

कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध

१	सतारीचे नव्हे एकतारीचे बोल : व. पि. तेंडूलकर	१–००
२	गडकऱ्यांची नाट्यशैली : प्रा. रु. पां. पांजणकर	१–२०
३	गडकऱ्यांची खरी भूमिका : प्रा. भ. श्री. पंडित	१–००
४	गडकऱ्यांची नाट्यप्रकृती व नाट्यसृष्टी : वसंत वरखेडकर	१–२०
५	आणखी गडकरी : डॉ. मधुकर आष्टीकर	१०–००

अमराठी भाषिकांना मराठी व्याकरणाचा अभ्यास करण्याकरिता सहज सोपे पुस्तक

१	हिंदी मराठी भाषा प्रवेशिका द्वितीयावृत्ती : श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	४–००
२	तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७ (प्र. आ.) डॉ. र. श. केळकर	४–००
३	'प्रातिभ' लघुकथा संग्रह १९८०	२०–००
४	समग्र बजावा	२०–००

रसिकांनी ह्या ग्रंथांकरिता सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर १२ यांना त्वरित लिहावे.

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

१९८१-८२ या वर्षाचे कार्यवृत्त

(दिनांक १-४-१९८१ ते ३१-३-१९८२)

श्रद्धांजली

साहित्यिक रा. अ. काळेले, पत्रकार दादासाहेब घोरपडे, दि. वा. मोकाशी, के. ना. वाटवे, वा. भ. पाटील, द. रा. बेन्द्रे, डॉ. शंकर शेष, नाटककार बबन प्रभू, संगीत दिग्दर्शक सी. रामचंद्र, साहित्यिक श्रीमती सुमती देवस्थळे, वि. सा. संघाचे आजीव सदस्य सौ. प्रभावती सगदेव, प्र. ना. खोडे, बाबुराव देशपांडे, कर्नल भा. त्र्यं. परांजपे, नासिकचे श्री. वि. मा. दि. पटवर्धन, बालकवींच्या पत्नी पार्वतीबाई ठोंबरे, शामराव ओक, शरदश्चंद्र सिन्हा, पां. ब. गडकरी, अॅड्. आठल्ये अकोला, प्रा. नरहर कुरुंदकर ह्या दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

स्मृतिदिन व जयंती

कविवर्य 'बी', कै. श्री. व्यं. केतकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती श्री शिवाजी महाराज, कै. नाना जोग, राम गणेश गडकरी, साने गुरुजी, आचार्य अत्रे, अच्युतराव कोल्हटकर, दादासाहेब ओगले, अण्णासाहेब खापर्डे, अण्णाभाऊ साठे, पु. भा. भावे, कविवर्य अण्णासाहेब बोबडे, पू. महात्मा गांधी, ए. श्री. पटवर्धन, वि. रा. हंबर्डे, ग. त्र्यं. माडखोलकर, महात्मा ज्योतीबा फुले, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, ना. के. बेहेरे, बा. सी. मर्ढेकर, पंडित शंकरराव सप्रे, पद्माकर डावरे ह्यांचे स्मृतिदिन साजरे करण्यात आले.

माननीयांच्या भेटी

केंद्रीय मंत्री ना. वसंतराव साठे, नामदार जयंतराव टिळक, साहित्यिक श्री. दया पवार, श्री. वसंत देशमुख, श्री. श्रीकृष्ण खडपेकर, तरुण भारतचे संपादक श्री. मा. गो. वैद्य, डॉ. द. भि. कुळकर्णी, डॉ. वसंतराव वऱ्हाडपांडे, न्यायमूर्ती श्री. भवानीशंकर नियोगी, श्री. बा. मा. दिवे, थोर विचारवंत श्री. दादासाहेब धर्माधिकारी, सौ. मधुवंती मिराशी, सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. शंकरराव खरात, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू श्री. गुलाबराव कदम, सुप्रसिद्ध कवी श्री. शंकर बडे, सुप्रसिद्ध गायक प्रा. प्रभुदेव सरदार, सिने व नाट्य कलावंत श्री. मोहन आगाशे, श्री. श्रीधर राजगुरु, सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. धों. वि. देशपांडे (अश्मसार), मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. त्र्यं. कृ. टोपे, लोकसत्तेचे संपादक श्री. विद्याधर गोखले, न्यायमूर्ती श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी, अॅड्. प्र. रा. देशमुख आदि मान्यवरांनी संस्थेला भेटी दिल्या, कार्याचा गौरव केला व सदिच्छा व्यक्त केल्या.

सत्कार

दि २२-१२-८१ रोजी ५६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे निर्वाचित अध्यक्ष प्रा. गंगाधर गाडगीळ यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. मधुकर आष्टीकर होते. नागपुरातील निरनिराळ्या संस्थांनी याप्रसंगी पुष्पहार घालून प्रा. गाडगीळ यांचे स्वागत

केले. याप्रसंगी डॉ. द. भि. कुळकर्णी, डॉ. वसंत वऱ्हाडपांडे, डॉ. सौ. आशाताई सावदेकर यांची गौरवपर भाषणे झालीत.

स्वातंत्र्य / प्रजासत्ताकदिन

दि. १५-८-१९८१ रोजी स्वातंत्र्यदिन व २६-१-१९८२ रोजी प्रजासत्ताकदिन साजरा करण्यात आला. वि. सा. संघाचे अध्यक्ष डॉ. आष्टीकर ह्यांचे हस्ते ध्वजारोहण झाले.

वर्धापन दिन

दिनांक १४-१-१९८२ रोजी वि. सा. संघाचा ५९ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. ह्या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू मा. श्री. गुलाबराव कदम होते. अध्यक्षस्थानी डॉ. आष्टीकर होते. ह्याप्रसंगी नागपूर विद्यापीठाचे मराठी विषयात पीएच. डी. पदवी प्राप्त केलेले मानकरी डॉ. सौ. कल्पना दिगंबर परांजपे, डॉ. शेषराव मारोती हुराळे, डॉ. विठ्ठल महादेव पागे, डॉ. सौ. ललीत दाभोळकर, डॉ. रामदास शामराव घोडे, डॉ. सुरेश वासुदेवराव पदवाड, डॉ. दामोदर गोविंद बोरसे व वि. सा. संघाची साहित्याचार्य पदवी प्राप्त केलेले श्री. विजयकुमार इंगळे ह्यांचा सत्कार करण्यात आला,

वरील सत्कार समारंभानंतर महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी श्री. शंकर वडे ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत वऱ्हाडी कवींचे संमेलन आयोजित करण्यात आले. ह्या संमेलनात विशेष निमंत्रित म्हणून सर्वश्री गौतम सुत्रावे वणी, कलिमखान आर्णी, सुरेश गांजरे यवतमाळ, व मिर्झा रफी अहमद बेग धनज (माणिकवाडा), तसेच सर्वश्री प्रल्हाद सोनेवाने लाखनी, बाबाराव गं. मुसळे, पार्डी, टक्कामोरे जि. अकोला; प्रभाकर कोलखेडे तेल्हारा, सौ. प्रतिभा इंगोले दर्यापूर, सौ. गोदावरी पाटील सावरगाव डुकरे, जि. बुलढाणा व नागपूरचे सर्वश्री सुनिल शिनखेडे, दिलीप इंगोले, शिवदास भोंडेकर हे स्पर्धक म्हणून हजर होते.

सांस्कृतिक समिती

कै. इंदिराबाई खरे स्मृति वक्तृत्व स्पर्धा दि. १९ व २० सप्टेंबर १९८१ रोजी आयोजित करण्यात आल्या. अध्यक्ष श्री. दिनकर देशपांडे होते. कै. सत्यभामाबाई सगदेव स्मृति कथाकथन स्पर्धा दि. २६ व २७ सप्टेंबर १९८१ रोजी घेण्यात आली. अध्यक्ष दै. लोकमतचे श्री. श्रीपाद डोंगरे हे होते.

दिनांक १९-४-१९८१ रोजी श्री. निरंजन उजगरे ह्यांच्या "५ दिनार" ह्या काव्य संग्रहाचे वाचन झाले. सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. दया पवार ह्यांनी कै. शिवदास कृष्ण वार्शिंगे 'शिव सावित्री' ट्रस्ट तर्फे आयोजित व्याख्यानमालेतील ३ रे पुष्प "मी आणि बलुतं" ह्या विषयावर दि. १२-७-१९८१ रोजी गुंफले. डॉ. द. भि. कुळकर्णी ह्यांचे अध्यक्षतेखाली नवोदित कवींचे संमेलन झाले. ह्या संमेलनाचे संयोजन श्री. वसंत वाहोकर ह्यांनी केले. दि. ५-८-१९८१ रोजी सुप्रसिद्ध नाटककार श्री. आत्माराम भेंडे ह्यांचा सत्कार करण्यात आला. ५-८-१९८१ रोजी कवयित्री कल्याणी इनामदार यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम झाला. कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाले अंतर्गत श्री. वसंत देशमुख ह्यांची दि. २५ व २६ ऑगस्ट रोजी व्याख्याने झाली. तसेच २७-८-८१ रोजी श्री. श्रीकृष्ण खडपेकर, नवी दिल्ली ह्यांचे व्याख्यान झाले. ५ व ६-१०-८२ रोजी कै. ए. श्री. पटवर्धन-स्मृती व्याख्यानमाला आचार्य दादा धर्माधिकारी यांनी गुंफली. दि. १० व ११ ऑक्टोबर १९८१ रोजी डॉ. मधुकर आष्टीकर ह्यांचे गुलाबराव महाराज जन्मशताब्दी निमित्त "श्री गुलाबराव महाराजांचे साहित्यशास्त्र" ह्या विषयावर दोन व्याख्याने झाली. दि. १, २ व ३

मार्च रोजी अभिव्यक्ती ह्या संस्थेच्या सहकार्याने सुप्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक श्री. श्री. वि. देशपांडे (अश्मसार) ह्यांची व्याख्याने, "महाभारताचे रूप व त्यांचे नीतिसूत्र" ह्या विषयावर झाली. विदर्भ साहित्य संघ आयोजित "श्री गणेश व्याख्यानमाला" मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. त्र्यं. कृ. टोपे ह्यांनी दि. ५ व ६ रोजी गुंफली. १३-३-१९८२ रोजी ॲड. श्री. प्र. रा. देशमुख, यवतमाळ ह्यांचे "शास्त्रीय दृष्टिकोनातून मराठी भाषा" या विषयावर व्याख्यान झाले. दि. २० व २१ मार्च १९८२ रोजी पुसदचे श्री. आपामार्जने ह्यांची नारदीय कीर्तने झाली. दि २६ व २७ मार्च १९८२ रोजी कै. शिवदास कृष्ण वार्लिंगे व्याख्यानमालेच्या अंतर्गत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांची व्याख्याने झाली.

संगीत समिती

७ जून १९८१ रोजी पुण्याच्या सौ. भारती वडवे यांच्या शास्त्रोक्त गायनाचा कार्यक्रम झाला. ९-८-८१ रोजी डॉ. वर्णेकर यांनी रचलेल्या गीर्वाण गीतांचा कार्यक्रम झाला. दि. २४-१-१९८२ रोजी पंडित शंकरराव सप्रे स्मृति दिनानिमित्त मुंबईच्या प्रा. प्रभुदेव सरदार ह्यांचे गायन झाले. दि. २०-२-८२ रोजी बा. सी. मर्ढेकर स्मृतिदिनानिमित्त "या गंगेमधी गगन वितळले" ह्या संगीत काव्यस्मृतीचा कार्यक्रम अभिव्यक्ती ह्या संस्थेच्या वतीने श्री. गोपाळ कौशिक ह्यांचे संयोजनाखाली सादर करण्यात आला.

चित्रकला समिती

कला दालनात "बसोली ग्रुप"च्या सहकार्याने बाल चित्रकारांच्या चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन श्री. कृष्णराव साऊरकर ह्यांच्या हस्ते झाले. हे प्रदर्शन दि. २६ ते ३० ऑगस्टपर्यंत सुरू होते. श्री. चंद्रकांत चन्ने ह्यांनी ह्या प्रदर्शनाचे आयोजन केले होते. दि. १४-३-१९८२ रोजी चित्रकार श्री. अरुण मोरघडे ह्यांच्या पोर्ट्रेट प्रात्यक्षिकाचा कार्यक्रम झाला. त्यांनी वि. सा. संघाचे एक पदाधिकारी श्री. प्रकाश देशपांडे यांचे पोर्ट्रेट चित्र रसिकांच्या उपस्थितीत काढले.

नाट्य समिती

दि. १३ जुलै ते १८ जुलै १९८१ ह्या दरम्यान महिला एकांकिका स्पर्धा व दि. २७ ऑगस्ट ते १ सप्टेंबर १९८१ पर्यंत कै. रघुनाथ आष्टीकर स्मृति विनोदी एकांकिका स्पर्धा व दि. १२-१०-१९८१ ते १७-१०-१९८१ पर्यंत बालनाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. दि. १५-२-१९८२ रोजी थिएटर ॲकेडेमीच्या कलाकारांशी स्थानिक नाट्य रसिकांशी चर्चा घडवून आणली. कै. वीर वामनराव जोशी जन्म शताब्दी समारोहानिमित्त सुप्रसिद्ध नाटककार व दै. लोकसत्तेचे संपादक श्री. विद्याधर गोखले ह्यांचे दि. २३-३-१९८२ रोजी व्याख्यान झाले.

अनुदान

महाराष्ट्र शासनाकडून १९८१-८२ सालाकरिता वि. सा. संघ मेन्टेनंस ग्रँट रु. १५,०००/- शिवाजी संदर्भ ग्रंथालय रु. २,५००/- युगवाणी रु. १२,०००/- नाट्यसमिती रु. ६००० /- अनुदान प्राप्त झालेले आहे.

युगवाणी

ह्या वर्षी एकूण चार जोड अंक काढण्यात आले. त्यांत दिवाळी अंक अतिशय प्रशंसनीय ठरला. त्याला महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे सर्वोत्कृष्ट दिवाळीअंक म्हणून विविध ज्ञान विस्तारकर्ते कै. रा. र. मीरमकर पारितोषिक देण्यात आले. या संपूर्ण कालखंडात युगवाणीचा दर्जा वाढावा आणि नवोदितांनाही संधी मिळावी असे डोळस प्रयत्न करण्यात आले.

युगवाणीला सप्रेम भेटीबद्दल खालीलप्रमाणे दैनिके, मासिके, आणि पाक्षिके येतात.

दैनिके

तरुण भारत, लोकमत, नागपूर पत्रिका, नागपूर टाईम्स, हितवाद.

साप्ताहिके

साधना, विवेक, आर्वी टाईम्स, मराठवाडा, तरुण भारत पुणे, सोबत, प्रज्वलंत, लोकराज्य, नागरिक जीवन.

पाक्षिके

रुद्रवाणी, सोव्हिएट देश.

मासिके

लोकशिक्षण, वाचनालय, कुमार, किर्लोस्कर, पूर्वा, प्रतिष्ठान, प्रसाद, सत्यकथा, मराठी विज्ञान परिषद, अमृत, कविता, स्पॅन, जीवन विकास, पुरुषार्थ, तत्त्वज्ञान, एकता, ललित, माय मराठी, संतकृपा, तात्पर्य, सन्मती, बायजा, भरतशास्त्र, सुगावा, नवभारत, कथांशु.

द्वैमासिक

अस्मितादर्श, महानुभाव, अभिरुची.

त्रैमासिके

प्रेरणा, मराठी संशोधन पत्रिका, पंचधारा.

याशिवाय समाज प्रबोधन पत्रिका, लोकराज्य, विश्वविद्यालयीन वार्ता, धर्मभास्कर, छंद चर्चा.

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयात दरवर्षीप्रमाणे यंदाही मराठीचा पदव्युत्तर अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच साहित्य पारंगत, साहित्याचार्य, मास्टर ऑफ फ़ाईन आर्टस् व पीएच्. डी. चा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना संदर्भ, मार्गदर्शनाची अद्ययावत् व विशेष व्यवस्था करण्यात आली. नागपूर विद्यापीठात नुकत्याच सुरू झालेल्या 'मास्टर ऑफ फिलॉसॉफी' या परीक्षेला बसणाऱ्या अभ्यासकांनीही संदर्भ ग्रंथालयाचा फार मोठा फायदा घेतला. नागपुरातील वृत्तपत्रांना तसेच आकाशवाणीला संदर्भ सहाय्य देण्यात आले.

ग्रंथ खरेदी–१९८१–८२ या कालात संदर्भ ग्रंथालयात एकूण १९५ ग्रंथ खरेदी करण्यात आले. ग्रंथ विकत घेताना डॉ. द. भि. कुळकर्णी, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, डॉ. म. रा. जोशी, डॉ. वसंत वऱ्हाडपांडे इ. साहित्यिकांचे अमूल्य सहाय्य झाले. मार्च १९८२ अखेर ग्रंथालयात ८७५५ ग्रंथ आहेत.

उपस्कर खरेदी–श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाने दर्शनी भागात एक डिस्प्ले तयार करून घेतली, ह्यात नवीन–नवीन ग्रंथ तसेच साहित्यिकांचे ग्रंथ लावण्यात येतात.

साहित्यिक कार्यक्रम–'नवे ग्रंथ नवे समीक्षक' हा विशेष कार्यक्रम संदर्भ ग्रंथालयात चालू केला. या मालितील आतापर्यंत ६ कार्यक्रम झाले असून जवळ–जवळ २० नवीन समीक्षकांनी २५ ग्रंथांचे समीक्षण केले.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे निघणाऱ्या 'निशांत' या हस्तलिखिताचे उद्‌घाटन डॉ. मधुकरराव आष्टीकर यांच्या हस्ते झाले. हा हस्तलिखिताचा अंक लावण्यासाठी त्यांना एक डिसप्ले देण्यात आली.

२१-६-८१ रोजी कै. दादासाहेब ओगले स्मृतीदिनानिमित्त "पत्रकारांची सामाजिक बांधिलकी-सत्य आणि आभास" हा परिसंवाद झाला.

व्याख्यान व परिसंवाद-श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयातील अभ्यास मंडळातर्फे व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. या मालेतील पहिले व्याख्यान दि. १४-३-८२ रोजी डॉ. सौ. आशा सावदेकर यांनी 'स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षा' या विषयावर दिले. दुसरे व्याख्यान प्रा. डॉ. अक्षयकुमार काळे यांनी 'स्वातंत्र्योत्तर मराठी कविता' या विषयावर दिले. व्याख्यान मालेतील तिसरे पुष्प प्रा. डॉ. मधुकर आष्टीकर यांनी 'स्वातंत्र्योत्तर मराठी रंगभूमी' या विषयावर गुंफले.

दि. २०-३-८२ रोजी मर्ढेकर स्मृतिदिनानिमित्त "मर्ढेकरांचे काव्य दोन दृष्टिकोन' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. वक्ते डॉ. वि. भा. सावदेकर ह्यांनी "मर्ढेकरांच्या काव्यातील विज्ञानविषयक दृष्टिकोन" आणि प्रा. सौ. संध्या अमृते ह्यांनी "मर्ढेकरांच्या काव्यातील परंपरा भंजन" ह्यावर भाषण दिले. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. अक्षयकुमार काळे होते.

रायपूर येथे भरलेल्या ५६ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. गंगाधर गाडगीळ तसेच श्री. द. मा. मिरासदार यांनी ग्रंथालयाला भेट दिली.

आभार-महाराष्ट्र शासन ग्रंथालय संचलनालय, स्थानिक व बाहेरगावची वृत्तपत्रे यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे जे सहाय्य केले. त्याबद्दल मनःपूर्वक आभार.

परीक्षा समिती : वार्षिक प्रतिवृत्त १९८१-८२

सप्टेंबर १९८१ आणि फेब्रुवारी १९८२ या दोन्ही सत्रात मिळून ६८९ + ५,५०० = ६,१८९ परीक्षार्थी सम्मीलित झाले, गत वर्षी पेक्षा ही वाढ ६८० ने अधिक आहे.

गत वर्षीचे उत्पन्न रु. २१,५६४-६० तर यावर्षी सुमारे ४१,३६७-७८ चे उत्पन्न आहे. गतवर्षीचा व्यय २२,६११-७९ तर या वर्षीचा व्यय रु. ३१,४६२-२५ झाला आहे.

यावर्षी दोन्ही सत्र मिळून ८७ केंद्रात परीक्षा घेण्यात आल्या.

१ नोव्हेंबर १९८० रोजी सौ. शोभा उबगडे यांनी संचालक पदाची सूत्रे हाती घेतल्यापासून २० नवीन केंद्रे सुरू करण्याचे उद्दिष्ट होते त्यापैकी १० शाळांत ही केंद्रे सुरू करण्याच्या कामी यश आले.

१९-१०-१९८१ रोजी परीक्षा समिती कार्यकारिणी सदस्य, श्री. बा. मा. दिवे, संचालिका सौ. शोभा उबगडे, व परीक्षा सचिव श्री. देश यांनी मिळून केलेल्या प्रचार दौऱ्यात स्थानिक शाळांना भेटी देऊन समितीच्या उपक्रमाची माहिती दिली.

सप्टेंबर ८१ सत्रातील उत्तीर्ण व पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम संघाध्यक्ष डॉ. मधुकरराव आष्टीकर यांच्या अध्यक्षतेखाली सी. पी. अॅण्ड बेरार रविनगर शाखा हायस्कूलचे प्रधानाध्यापक श्री. बा. मा. दिवे यांच्या हस्ते संपन्न झाला.

१४ जानेवारी १९८२ रोजी वि. सा. संघाच्या वर्धापन दिनी नागपूर विद्यापीठाचे नव-निर्वाचित कुलगुरू मा. गुलाबराव कदम यांच्या हस्ते व संघाध्यक्ष, डॉ. मधुकरराव आष्टीकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमात, श्री. विजयकुमार नारायण इंगळे यांना वि. सा. संघाची साहित्याचार्य ह्या पदवीसह कै. मामा वरेरकर स्मृती पुरस्कार पारितोषिक रु. १०१ रोख आणि श्रीफळ व शाल देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

१८-२-१९८१ च्या परीक्षेत इयत्ता नववी समकक्ष सा. विनीत खंड-१ ही परीक्षा नव्याने सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येऊन सा. विनीत (दहावी समकक्ष) या परीक्षेचे नाव सा. विनीत खंड-२ असे नामकरण करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे जानेवारी १९८१ पासून ही परीक्षा सुरू करण्यात आली व या परीक्षेला चांगला प्रतिसाद मिळाला.

या वर्षात परीक्षा समितीच्या तीन सभा आयोजित करण्यात आल्या होत्या. कागद, मुद्रण, व स्टेशनरीच्या वाढत्या किंमती लक्षात घेता समितीच्या ५-५-८१ रोजी झालेल्या सभेत विद्यालयीन, महाविद्यालयीन व स्नातकपर्यंतच्या परीक्षा शुल्कात प्रत्येकी एक रुपया, सा. पारंगत व शासकीय प्रवीण, प्राज्ञ परीक्षेच्या परीक्षा शुल्कात प्रत्येकी पाच रुपये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

जाने. ८२ मधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्रे व पारितोषिक वितरण समारंभ प्रा. सौ. नीला जोशीराव यांच्या हस्ते संपन्न झाला.

धनवटे रंगमंदिर (वि. सा. संघ)

या वर्षी धनवटे रंगमंदिरात खालीलप्रमाणे कार्यक्रम झाले.

कार्यक्रमाची वर्गवारी	कार्यक्रम संख्या	प्राप्त भाडे
१. व्यावसायिक नाट्यप्रयोग	३८	१९,३५० /-
२. हौशी नाट्यप्रयोग	९१	३१,९५० /-
३. ऑर्केस्ट्रा	४१	२५,५५० /-
४, संगीत कार्यक्रम	१७	९,५०० /-
५. नृत्य कार्यक्रम	१२	७,३५० /-
६. बाल नाट्य प्रयोग	३०	३,९४० /-
७. स्नेह संमेलन	१७	८,४२५ /-
८. सांस्कृतिक कार्यक्रम	१९	८,५०० /-
९. सभा /भाषण	२९	५,७५३ /-
१०. जादूचे प्रयोग	१६	७,८५० /-
११. तालीमी	२१	१,८०० /-
एकूण कार्यक्रम	३३१	१,२९,९६८ /-

विदर्भ साहित्य संघाची वातानुकूलित व्यवस्था जरी मागेच पूर्ण झाली असली तरी महाराष्ट्र विद्युत मंडळाकडून अजून कनेक्शन प्राप्त होऊ शकले नाही. कारण त्यांनी जी विना अनुमती जास्तीची जागा ट्रान्स्फॉर्मरच्या बांधकामाकरिता व्यापली त्यावर कार्यकारिणीने आक्षेप घेतला आहे. हा प्रश्न परस्पर सामंजस्याने सुटावा म्हणून दोन्ही बाजूने मध्यम मार्ग काढून कोंडी फोडण्याचे प्रयत्न चालू आहेत.

रंगमंदिराकरिता जे दोन वॉटर कूलर विकत घेण्यात आले आहेत त्यापैकी एकाची रंगमंचाच्या बाजूला कलावंत व संघाकरिता व्यवस्था करण्यात आली असून दुसरा प्रेक्षक व श्रोत्यांकरिता कॅन्टीनच्या बाजूला अजून बसवायचे आहे. ह्या वॉटर कुलरमधून स्वच्छ व मुबलक पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून पाण्याची टाकी बसविण्याचे काम अजून पूर्ण व्हायचे आहे. ते पूर्ण होताच ह्या दोन्ही वॉटर कूलरचा उपयोग सुरू करता येईल.

रंगमंदिरातील एकूण सर्वच प्रसाधनगृहाची व्यवस्था जुनाट झाली होती व तेथील सामान मोडकळीस येऊन निकामी झाले होते. ह्या प्रसाधनगृहांची फेर रचना करून त्याठिकाणी नवे सामान बसविण्यात आले आहे.

रंगमंदिराच्या परिसरात प्रवेश करण्याकरिता पूर्वी वि. सा. संघ व रंगमंदिर ह्यांच्यासाठी एकच लोखंडी फाटक असल्याने गैरसोय होत होती, आता रंगमंदिराकरिता नवीन स्वतंत्र लोखंडी फाटक तयार करण्यात आले असून त्याद्वारे पूर्वीची गैरसोय दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

रंगमंदिराचा पोर्च, कॅन्टीनकडील बाजू व सायकल स्टॅंडच्या जागेवर बराच अंधार असल्याने जा–ये करण्यास अडचण जाणवत होती. त्याठिकाणी मर्क्यूरी दिवे लावून जास्त प्रकाशाची सोय करण्यात आली आहे.

रंगमंदिरातील खुर्च्यांच्या नूतनीकरणाचे काम हाती घेतले असून ते जवळजवळ पूर्ण होत आले आहे. मात्र ह्या नवीन झालेल्या खुर्च्यांची नासधूस काही विघ्नसंतोषी लोक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यावर काय उपाययोजना करता येईल याचा विचार चालू आहे.

सध्या रंगमंदिरातील द्वारपाल सेवा ही वि. सा. संघाच्या अधिकारात नसल्याने त्यावर कंत्राटदार आयोजकांचे नियंत्रण असते. परिणामी प्रेक्षागृहातील मालमत्तेचे संरक्षणादी काम ते करीत नाही. त्यामुळे तूर्त ही द्वारपाल सेवा वि. सा. संघाने जुलै महिन्यापासून आपल्या अधिकारात घेतली असून आता त्यांच्यावर वि. सा. संघाचे नियंत्रण राहील.

वाढते विजेचे व कार्पोरेशनचे कर, व्यवस्थापन खर्चात करावयाची वाढ व रंगमंदिरात आज ज्या सोयी नाहीत त्या करावयाच्या असल्याने त्यास येणारा जास्तीचा संभाव्य खर्च, याचा विचार करता तीन वर्षापूर्वी निर्धारित केलेले रंगमंदिराचे दर यात मेळ बसत नसल्याने हे दर वाढविणे अत्यावश्यक झाले आहे. ह्याबाबतचा विचारविनिमय येत्या कार्यकारिणी सभेत करण्याचे ठरले आहे.

रंगमंदिराचे यंदा जवळ जवळ ४ लाखाचे तुटीचे अंदाजपत्रक आहे. त्यात रंगमंदिरातील ध्वनिदोष काढणे, अंतर्गत सजावट व प्रकाश व्यवस्था व नाट्य संचासाठी सर्व सोयींनी युक्त निवास व्यवस्था, रंगकाम आदी कामे आर्थिक उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने करावयाची आहेत. त्यासाठी वरील तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आली आहे,

अनुक्रमणिका

शाखा—३१-३-८२ अखेर विदर्भ साहित्य संघाच्या एकूण २२ शाखा खालीलप्रमाणे- अमरावती, अकोला, आकोट, अचलपूर, नेरपरसोपंत, यवतमाळ, वणी, पांढरकवडा, बोरीअरब, खामगाव, चंद्रपूर, ब्रम्हपुरी, मुल, पुलगाव, भंडारा, गोंदिया, लाखनी, नरखेड, आष्टी, वर्धा, बुलढाणा, हिंगणघाट. या शाखांचे कार्यवृत्त वेळोवेळी युगवाणीतून देण्यात आले आहे. सर्व शाखा कार्यरत आहेत.

सभासद—३१-३-८२ अखेर सभासद संख्या २२२७ असून यापैकी एकूण ४७४ आजीव सभासद आहेत.

८१·८२ सालातील नवीन आजीव सदस्य—

नागपूर—सौ. आठवले संजीवनी मनोहर, श्री. उमगडे अरुण नारायणराव, श्री. खांडवे राजीव दत्तात्रय, सौ. गोडसे मीना आनंद, श्री. चटर्जी अजितरकुमार, सौ. जोशी अनुराधा केशव, श्री. तेजींदरसिंग, श्री. दामले श्री. ज., कु. देशपांडे सुधा बळवंतराव, श्री. देवतळे दे. ब., श्री. देशपांडे दिनकर निळकंठराव, सौ. धर्माधिकारी शिला सुबोध, सौ. निवसरकर अनुराधा प्रवीण, श्री. पेंडसे सतीश राजाभाऊ, सौ. डॉ. पटोरीया कुसुम, सौ. बाभुळकर शिवलिनी सुधाकर, सौ. भुरे कल्पना सुरेश, श्री. म्हैसाळकर दिलीप त्र्यंबक, श्री. म्हैसाळकर वसंत अनंत, सौ. म्हैसाळकर अनघा अरुण, सौ. म्हैसाळकर संयोगिता अशोक, श्री. लाडकर हरीहर, सौ. वडनेरकर अलका प्रमोद, श्री. वाडेगावकर सुधीर विश्वनाथ, श्री. सोमलवार विष्णु गोविंद, श्री. सिरास प्रभाकर.

चंद्रपूर—श्री. कळसकर महादेव पंकूजी, श्री. खजांची राजेंद्रकुमार, श्री. गर्गेलवार कैलास रामभाऊ, श्री. तोटावार नीरज सदानंद, श्री. मदनकर रामकृष्ण गुलाबराव, श्री. मुनघाटे रमेश जीवनराव, श्री. रामगिरवार सुधाकर व्यंकटराव, श्री. स्वान शा. वा., ॲड्. श्री. हस्तक रा. गो.

आभार

विदर्भ साहित्य संघाच्या प्रगतीत अनेक व्यक्ती, हितचिंतक महाराष्ट्र शासन, ग्रंथालय संचलनालय, साहित्य संस्कृति मंडळ, सांस्कृतिक कार्य संचलनालय, स्थानिक व बाहेरगावची वृत्तपत्रे यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे जे सहकार्य दिले, त्याबद्दल वि. सा. संघ त्यांचा आभारी आहे.

अनेक कार्यकर्ते नागपूर व नागपूरच्या बाहेर वि. सा. संघाचे कार्य उत्साहाने करतात, या सर्वांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार.

सिमेंट, लोखंड, आदि आवश्यक वस्तूंची चणचण सतत आहे व त्या मिळण्यास कठिण जात आहे. परंतु हे मिळविण्यास ज्या व्यक्तींचे सहकार्य लाभले त्यांचे आभार.

नवीन योजना, आर्थिक सहाय्य आदि सर्व गोष्टी समाजाच्या व जनतेच्या सहकार्यावरच अवलंबून आहे. संस्था प्रगतीपथावर आहेच. आणखी सहकार्य मिळाल्यास संस्थेच्या प्रगतीस वेग येईल.

सर्वांचे सहकार्य लाभो, ही सदिच्छा !

डॉ. मधुकर आष्टीकर
अध्यक्ष
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

अ. ल. लिमये
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ नागपूर

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ
व
धनवटे रंगमंदिर
जमा–खर्च १९८१–१९८२
व
अंदाजपत्रक १९८२–८३

अनुक्रमणिका

अ. क्र.	बाब	आय १९८०-८१ अंदाज	आय १९८०-८१ आय	आय १९८१-८२ अंदाज	आय १९८१-८२ आय	आय १९८२-८३ अंदाज
१	केंद्रीय कार्यालय व्यवस्थापन					
१.१	साधारण सभासद वर्गणी	१५,०००-००	१९,३९०-००	२०,०००-००	१७,६३५-००	१८,०००
१.२	आजीव सभासद वर्गणी	५,०००-००	७,८५२-००	८,०००-००	५,२८५-००	४,०००
१ ३	संलग्न संस्था वर्गणी	७०-००	६०-००	६०-००	४०-००	६०
१.४	शासकीय अनुदान	१५,०००-००	१५,०००-००	१५,०००-००	१५,०००-००	१५,०००
१.५	व्याज से. बँक खाते क्र. १८४६० वि. सा. संघ	५००-००	७-५०	५००-००	९९३-३०	५००
	व्याज महा. राज्य विद्युत मंडळ	१०-००	-	१०-००	—	१०
१.६	व्याज मुदती ठेव					
	१) रु. २,००० /- हुंवर्डे स्मृती	२००-००	२७३-००	२००-००	५०-००	२००
	२) रु. ५,००० /-	५००-००	६२५-००	६००-००	१२५-००	५००
	३) रु. २,००० /- विश्वस्त निधी	२००-००	१९९-१७	१००-००	१८०-४०	२००
	४) रु. ४,००० /- आजीव सभासद वर्गणी ठेव	४००-००	३६०-००	३००-००	३६०-००	४००
	५) रु. २०,००० /-	२,०००-००	२,०००-००	२,०००-००	२,०००-००	२,००
	६) रु. ५,००० /- आजीव सभासद वर्गणी	—	४९५-८४	४००-००	४९५-८४	५००
	७) रु. ३,००० /-	३००-००	२९८-९५	२००-००	३००-००	३००
					४२,४६४-५४	४१,६७०

संघ नागपूर

अंदाजपत्रक

अ. क्र.	बाब	१९८०–८१ अंदाज	१९८०–८१ व्यय	१९८१–८२ अंदाज	१९८१–८२ व्यय	१९८२–८३ अंदाज
				व्यय		
(१)	केंद्रीय कार्यालय व्यवस्थापन					
१.१	वेतन /मजुरी	१४,५००	१२,१२७-१५ १,७७५–००	१५,०००	११,६९७-०० ५८७–५०	१५,०००
१.२	कर्मचारी वाहन /पोषाख	३००	२५०–००	३००	४१–५०	५००
१.३	पदाधिकारी वाहन /प्रवास खर्च	५००	३९०–७१	५००	६२०–९०	७००
१.४	कर्मचारी भविष्य निधी	१५०	१७४–००	२००	१५९–५०	२००
१.५	वीज खर्च	१,२००	१,६६२–८५	२,०००	१,४८१–७१	२,०००
१.६	दूरध्वनी खर्च	४,५००	६,४५२–१५	६,०००	५,१९५–८०	६,५००
१.७	अ) कार्यकारी मंडळाच्या सभासदांचा प्रवास	१,४००	१.३५०–१०	१,५००	१,७९६–१५	१,५००
	ब) कार्यकारी मंडळ सभा	३५०	३०३–५५	३५०	६७८–७५	४००
१.८	साधारण सभा	२००	१२८–००	२००	९१७–५५	५००
१.९	डाक व्यय	१,०००	८०७–६५	१.२००	१,०४९–७५	१,२००
१.१०	अ) उपस्कर खरेदी	२,०००	५,९०७–११	३,०००	५,३५२–००	१५,०००
	ब) उपस्कर दुरुस्ती	१००	६५५–२०	५००	८१–००	१,०००
१.११	संघमंदिर वास्तु दुरुस्ती	२,५००	६,४७८–०३	५,०००	३४८–८५	२९,२००
१.१२	शाखा अंशदान	१,५००	२८८–६०	१,५००	४४८–०५	१,५००
१.१३	शाखा अनुदान (विशेषकार्यासाठी)	२,०००	२,१६७–५०	२,५००	१,९६०–००	२,०००
१.१४	लेखन / सामग्री मुद्रण	१,५००	४,३१९–१५	५.०००	४,०२५–७१	५,०००
१.१५	मराठी साहित्य महामंडळ वर्गणी	१२५	१२५–००	१२५	—	१२५
१.१६	मराठी साहित्य महामंडळ प्रवास	१,२००	३५५–००	१,२००	१,५३४–४०	१,२००
१.१७	अधिकोष वर्तन (Bank Comm.)	१००	४८–००	१००	६९–९०	१००
१.१८	माननीयांच्या भेटी इ. संबंधी आतिथ्य	१,०००	२,५९८–६५	२,५००	१.८७४–१०	२,५००
१.१९	संमेलन भाषण छपाई इ.	१,५००	—	१,५००	—	१,५००
१.२०	अंकेक्षण शुल्क (Audit fee)	६००	३–१०	६००	१,२००–००	१,२००
१.२१	किरकोळ / प्रासंगिक खर्च	१,५००	४,३३९–७०	८,०००	४,३३१–४३	६,०००
१.२२	कोर्ट / कचेरी (निवडणूक इतर)	—	१००–००	२००	—	४,५००
१.२३	नवीन विद्युतीकरण पंखे, दिवे इ.	१,०००	४,८५२–५०	५,०००	५२०–५०	५,०००
१.२४	विद्युतीकरण दुरुस्ती	२००	२१८–७५	२००	३५४–००	१०,०००
१.२५	मराठी सा. मंडळ	—	—	—	३५१–१५	—
१.२६	जाहिरात	—	—	—	—	८००
					४६,७५७–२०	१,१५,५२५

विदर्भ साहित्य
१९८१–८२ सालाचे

		आय				
		१९८०–८१		१९८१–८२		१९८२–८३
अ. क्र.	बाब	अंदाज	आय	अंदाज	आय	अंदाज
				B/F	४२,४६४–५४	४१,६७०
१.७	संघातील दालनाचे भाडे	१५,०००	११,०२६–००	५,०००	१२,६४७–००	१२,०००
१.८	दूरध्वनी वापराचे उत्पन्न	२००	७९०–९५	२००	१,२०६–८०	१,०००
१.९	किरकोळ उत्पन्न	२००	१०,१७९–४५	२००	१५,१२१–१५	२,०००
१.१०	पुस्तके विक्री	३,०००	५६६–५०	३,०००	४०६–४०	३,०००
१.११	देणग्या (सर्वसाधारण कार्यासाठी)	—	१५०–००	२००	—	२००
